IRBK-0100257

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र २५७

IRBK-0100257

वा. क्र. २५६

13 DEC 1974

म. ग्रं. सं. ठाणे ग्रंथालय शाखा:
वा. क्र. २५६ ता. दि. ..........
वि. ... जा१६ ..........

२५८

# पेशवाईचा मध्यकाल

## ( ऐतिहासिक नाटक. )

लेखक,

**दत्तात्रय बाळकृष्ण करकरे**

" हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य "

या पुस्तकाचा कर्ता,

जळगांव, ईस्ट खानदेश.

प्रकाशक,

**हिंद एजन्सी, माधवबाग, मुंबई.**

मुंबई.

सन १९१८.

किंमत बारा आणे.

IRBK-0100257

प्रस्तुत नाटकाचे प्रयोग करण्यासंबंधीचे सर्व प्रकारचे हक्क
लेखकानें आपणाकडेस राखून ठेविले आहेत.

प्रकाशक—श्रीयुत **नारायण नरसो केतकर,**
मालक, हिंद एजन्सी, बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,
माधवबाग, नंबर ४, गिरगांव–मुंबई.

मुद्रक—रा. **चिंतामण सखाराम देवळे,** मुंबईवैभव प्रेस,
सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड,
गिरगांव–मुंबई.

# दोन शब्द.

Here are men who fought in gallant actions;
As gallantly as ever heroes fought!
But buried in the heap of such transactions;
Their names are rarely found nor often sought!

Byron.

श्रीमंत प्रौढप्रतापी पहिले **माधवरावसाहेब पेशवे** यांची कारकीर्द–मराठा साम्राज्याचे पंत–प्रधान या नात्याची कारकीर्द–पुष्कळ दृष्ट्या अत्यंत महत्वाची आहे; परंतु सदरहू पुस्तक हें तत्कालीन परिस्थितीचें काल्पनिक चित्र असल्यानें ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाच्या अशा बऱ्याच गोष्टींचें त्यांत विषद रीतीनें विवेचन करतां येणें शक्य नाहीं.

तथापि, श्रीमंतांच्या ठायीं वसत असलेल्या अलौकिक सद्गुणांची–राजकारण, कर्तृत्व, करामत आणि नडफ यांची–त्यावेळच्या राजकारणाची व पेशव्यांच्या घरांतील भाऊबंदकीची–कांहींशी कल्पना करतां यावी, अशा दृष्टीनें प्रस्तुतच्या पुस्तकांत प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत महायुद्धामुळें उद्भवलेल्या अडचणींच्या परिस्थितींतहि माझ्या इच्छेकरितां–निव्वळ माझ्या "मरजीचा मान" ठेविण्याकरितांच–सदरहू पुस्तक माझे बालमित्र आणि प्रसिद्ध "हिंद एजन्सी" चे प्रवर्तक श्री. रा. रा. **नानासाहेब केतकर** यांनीं प्रसिद्ध केलें असल्यामुळें त्यांचा–माझे स्नेही व कादंबरीकार व नाटककार रा. रा. **नाथ माधव** यांनीं "सहा" करून "प्रुफें" तपासून दिलीं, आणि त्यांनीं व माझे दुसरे स्नेही व "इंदिरा" नाटकाचे कर्ते रा. रा. **अण्णासाहेब सोनाळकर** यांनीं मला योग्य सूचना केल्या त्याबद्दल त्यांचा–मी अत्यंत आभारी आहें.

**श्रीमंत छत्रपति शिवाजी महाराज** यांनीं जन्मास घातलेल्या मराठा–साम्राज्यानें "लोक संग्रह" केलेला आहे; त्याचप्रमाणें प्रस्तुतच्या महायुद्धांत आपल्या साम्राज्यसरकारास यश-प्राप्ति होऊन त्यांनीं "लोक-संग्रह" करीत रहावें—आणि उदार व स्वातंत्र्यप्रिय अशा आपल्या **ब्रिटिश-साम्राज्य-सरकाराच्या** अमलाखालींच हिंदुस्थानची दिवसेंदिवस अधिक आधिक प्रगति होत जावी, एवढेंच **परमेश्वराजवळ** नम्र मागणें आणि प्रार्थना आहे.

मुंबई ता. १० फेब्रुवारी सन १९१८ इ.

**दत्तात्रय.**

सदरहू नाटकाची संगीत रंगावृत्ति एखाद्या
नाटक कंपनीस करून पाहिजे
असल्यास
अथवा कोणतेंही एखादें गद्य अथवा पद्य
नाटक लिहून पाहिजे
असल्यास
त्याबद्दल लेखकाकडेस पत्रव्यवहार करावा.

# पेशवाईचा मध्यकाल.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

**स्थळ**—पुणें शहर, शनिवारचा वाडा, पेशव्यांचा दरबार.

( शिंदे, होळकर व कानडे एका बाजूस व नाना फडणवीस, सखाराम बापू, हरिपंत फडके दुसऱ्या बाजूस अशी मंडळी बसली असतांना पडदा उघडतो; इतक्यांत श्रीमंत माधवरावसाहेब पेशवे प्रवेश करतात. त्यांना सर्वजण उठून खडी ताजीम देतात व पेशवे बसल्यावर सर्व आपापल्या जागीं बसतात. )

**माधवः**—सरदारहो, आजच्या दरबारांत कांहीं नाजूक गोष्टीसंबंधानें मला तुमचें खरें मत हवें आहे; पानपतच्या धक्क्यानें मराठयांची—मराठी साम्राज्याची झालेली नुकसानी भरून निघावी अशी माझी इच्छा व महत्त्वाकांक्षा आहे आणि ती सफल करणें हें सर्वस्वीं तुम्हांवरच अवलंबून आहे; पानपतच्या लढाईत पेशवाईचा भावी हकदार वारस नाहींसा झाला ! साम्राज्याचे आधारस्तंभ आमचे काका—भाऊसाहेब आपणास कायमचे अंतरले, दक्षिणेची एक लाखपर्यंत बांगडी फुटून गेली; त्या धक्क्यानें तीर्थरूप नानासाहेबांनीं देह ठेविला, आणि पेशवाईचा सर्व भार अल्प वयांतच माझ्यावर येऊन पडला ! हा भार सहन करण्यांत मला तुम्हीं सर्वांनीं एकदिलानें मदत केली पाहिजे; ह्या साम्राज्याची अब्रू आणि इभ्रत संरक्षण करणें आतां सर्वस्वीं तुमच्यावर अवलंबून आहे, आणि सातारकर छत्रपति हर्षनिधान शाहू महाराज यांचें पुण्य, व आजोबा रावसाहेब पेशव्यांपासूनचे आमचे गुरु-

महाराज ब्रह्मेंद्रनाथ स्वामी धावडशीकर यांचा आशीर्वाद, यांच्या जोरावर तुमच्या कर्तबगारीनें आपल्या साम्राज्याचा पुन्हां लवकरच जयजयकार होईल अशी मला आशा आहे.

**शिंदे:**—( काठीच्या आधारानें उभें राहून ) सरकार, श्रीमंत पेशव्यांच्या कृपेनेंच आम्हाला हे दिवस आलेले आहेत; शिंद्याचें घराणें गादीशीं आजपर्यंत एकनिष्ठपणें वागत आलेलें आहे, आणि दौलतीच्या संरक्षणाकरितां आम्ही आमचें सर्वस्व अर्पण करण्यास केव्हांहि तयार आहोंत.

**माधव:**—पाटीलबुवा, शिंद्यांच्या घराण्यांतील कर्ते पुरुष दौलतीच्या संरक्षणाकरितां सारखे कसे बळी पडत गेले हें मनांत आलें म्हणजे खरोखरच मन कसें अगदीं भडभडून येतें; तरी पण त्यांतल्या त्यांत पानपतच्या अस्मानी सुलतानींतून प्राणाचें पायावर जाऊन शिंद्यांच्या वंशांतील शेवटचा तंतु तुमच्या रूपानें जिवंत राहिला, यावरून साम्राज्याचा दरारा आणि शिंदे घराण्याची कीर्ति तुमच्या हातून वृद्धिंगत व्हावी असाच ईश्वरी संकेत आहे असें दिसतें.

( शिंदे बसतात. )

**होळकर:**—( उभें राहून ) सरकारांनीं बेफिकीर असावें; गादीच्या पुण्यप्रतापानें साम्राज्याकरितां नर्मदेच्या पलीकडील क्षिप्रानदीपर्यंतचें हिंदुस्थान मी सर करतों आणि हिमालयाच्या पायथ्याजवळील गंगानदीपर्यंतचें हिंदुस्थान शिंदे सर करतील; आम्हा उभयतांनां सरदार कानडे यांची मदत आहेच. ( बसतात. )

**माधव:**—घोरपड्यांनीं मद्रासपर्यंत दौड मारावी; फडक्यांनीं कर्नाटकला शह देऊन हैदरला तंबी द्यावी आणि भोंसल्यांनीं खानदेश व वऱ्हाड बगलेंत मारून निजामाच्या राज्याचे लचके घेत घेत बंगालवर रोंख धरावा; पुण्यासह मधल्या दक्खनचा बंदोबस्त ठेवून मामा, बापू व नाना यांच्या मदतीनें साम्राज्यांतील व साम्राज्याबाहेरचीं सर्व अंतर्बाह्य कामें मी स्वतः सांभाळतों; इतकेंच नाहीं तर तुम्हा सर्व सरदारांना प्रत्येक प्रकारची लागेल ती मदत देण्यालाहि मी तयार आहें.

**नाना:**—ईश्वराच्या कृपेनें श्रीमंतांच्या इच्छेप्रमाणें बरकत होईल, पण दौलतीला आधींच पुष्कळसें कर्ज असल्यानें व्यापक प्रमाणावरील या दिग्विजयांच्या स्वाऱ्या तडीस नेण्यास काय उपाय योजावे याबद्दलहि या दरबारांत विचार व्हावा, अशी या सेवकाची नम्र विनंति आहे.

**माधव**:—नाना, दौलतीच्या कर्जाचें कोडें आपण पुढें फावल्या वेळीं सोडवून घेऊं हो. पण आज तुम्हीं सर्व मिळून साम्राज्याच्या काळजीचें कोडें सोडविण्यांत मला एकदिलानें मदत करा; सरदारहो, मी किनई आतांशा अगदीं उदास झालेलों आहें; आमच्या घराण्यांत भावाभावांत चुरस वाढून आईची आणि नानांची मर्जी मोडून भाऊकाका उत्तर हिंदुस्थानांत गेले आणि पायगुंता म्हणून त्यांनीं आग्रहानें बरोबर दिलेल्या माझ्या विश्वासदेवासह पानपत येथें गारद झाले; पेशव्यांच्या घराण्यांत भाऊबंदकीचें भूत भाऊकाकाच्या वेळींच पहिल्यानें शिरलें; सख्खा आणि चुलत या भेदभावाच्या संशयानें हट्टास पेटून भाऊसारखा मोहरा पानपत येथें गारद झाल्यानंतर हें भाऊबंदकीचें भूतहि तेथेंच गाडलें जाईल अशी मला फार आशा होती, पण ती माझी आशा साफ खोटी ठरली ! दादा, दादा, तुमच्या ह्या असुरी राज्यतृष्णेनें मराठेशाहीचें वाटोळें होईल हो वाटोळें होईल ! ( इतक्यांत एक हुजऱ्या येऊन श्रीमंतांस मुजरा करतो आणि श्रीमंत दादासाहेब यांचा पकडलेला पत्रव्यवहार नानाजवळ आणून देतो व मुजरा करून जातो. )

**नानाः**—( तो वाचून ) श्रीमंत, रघुनाथराव दादासाहेब यांचीं कारस्थानें आतां जगजाहीर झालीं ! उत्तरेस स्वारी करून रजपूत व जाट लोकांपासून साम्राज्याचे हक्क वसूल करणाऱ्या राघोभरारीची साम्राज्यासंबंधींची इमानी नियत पार बदलून गेली; आणि आतांच हातीं आलेल्या गुप्त पत्रव्यवहारावरून ते निजाम व भोंसले यांचे दरबारांत मराठा साम्राज्याविरुद्ध पेशवाई आपल्या घरांत घालण्याकरितां फंदफितुरी, कारस्थानें आणि कारवाई करीत आहेत असें उघड उघड सिद्ध झालें आहे; मराठ्यांच्या जुटीच्या वळांतून भोंसल्यांना फोडावें, इकडे हैद्राबादच्या निझामाला लांचाची लालूच दाखवून आपलासा करावा, सखाराम बापूंच्या मदतीनें पुण्यांतल्या पुण्यांत दरबारांतच आपल्यासंबंधीं सहानुभूति उत्पन्न करून त्यामुळें फुटतील तितके लोक फोडून होणाऱ्या दुफळींत आपला पक्ष प्रबळ करावा, मराठे मंडळांतील जुटीचें बळ फोडून त्यांना आपल्या पक्षाचे करून घेण्याकरितां, शिंदे, होळकर व गायकवाड, यांनां आपापले सवते सुभे निर्माण करण्यांत मदत देण्याची हमी घ्यावी, आणि इतकेंहि करून नच जमलें तर टोपीवाल्या कंपनीचा एक वकील नुकताच आपल्या या दरबारांत येऊन गेल्या वेळेपासून मराठा सरदारमंडळाशिवाय पेशव्याला पालथा घालण्यास प्रसंग पड-

त्यास मुंबईकरांचीही मदत घ्यावी, असा दादासाहेबांचा मनसुबा आहे; सरकार, मराठेशाहीविरुद्ध इतका धोक्याचा व दग्याचा घाट घडवूं पाहणाऱ्या या दादासाहेबांचे बाबतींत सक्तीचे इलाज योजावे लागले तरी बेहेत्तर, पण पेशवाईच्या अस्तनीतील हा निखारा आतां पार विझविल्याशिवाय गत्यंतरच नाहीं, अशी स्थिति सांप्रत प्राप्त झालेली आहे. ( नाना पत्रव्यवहार श्रीमंतांजवळ देतात. )

**माधवः**—( तो पाहून ) नाना, तुमचें म्हणणें अक्षरशः खरें आहे; तरी पण ही घरांतील भाऊबंदकी असल्यानें सक्तीचे उपाय योजतांनाही आपल्या माणुसकीस व लौकिकास कमीपणा न येईल याबद्दल आपणास अत्यंत खबरदारी घेतली पाहिजे; ( सखाराम बापूकडे वळून ) बापू, आजच्या दरबारांत तुम्ही हजर अहांत हें एकपरी बरेंच झालें; तुम्ही काकांच्या—दादासाहेबांच्या पक्षांतले अहांत ही गोष्ट अगदीं उघड आहे; त्यामुळें तुमच्या मनाचा ओढा त्यांच्याकडे असणें स्वाभाविक आहे, आणि हें सर्व मला माहीत असूनहि मी तुम्हांस मुद्दाम आजच्या दरबारास बोलावून तुमच्या समक्ष या विषयाची वाटाघाट होऊं दिली, इतकेंच नाहीं तर योगायोगानें याच वेळीं दादासाहेबांचें कारस्थान चव्हाट्यावर आलें असल्यानें प्रत्यक्ष तुमचेंच मत या बाबतींत काय आहे, हें कळविण्याची मी तुम्हास आतां संधि देत आहें, ही गोष्टहि तुम्ही मनन करण्यासारखी आहे. बापू, हल्लींच्या काळच्या साडेतीन शहाण्यांपैकीं आपण एक आहांत; दौलतीवर गुदरलेल्या गंडांतराची तुमची आठवण अजून ताजी आहे, आणि भाऊबंदकीच्या क्षुद्र दृष्टीपेक्षां साम्राज्याच्या उदात्त ध्येयाला मान देण्याइतपत तरी सारासार विचार न करण्याइतक्या तुमच्या मनोवृत्ति सडून गेल्या नसतील अशी माझी खात्री आहे; म्हणून म्हणतों, बापू, या बाबतींत तुमचें काय म्हणणें आहे तें मला स्पष्ट कळवाल काय ?

**बापूः**—या बाबतींत माझें स्पष्ट मत श्रीमंतांनीं विचारलें नसतें तर बरें झालें असतें; तरी पण आतां आज्ञाच झाली आहे तर मीहि तें स्पष्टपणें सांगतों, याबद्दल क्षमा असावी. सरकार, हक्काच्या दृष्टीनें पेशवाईचे खरे वारस आपण आहांत, ही गोष्ट मलाच काय तर प्रत्यक्ष श्रीमंत दादासाहेबांना सुद्धां नाकबूल करतां यावयाची नाहीं, पण—

**माधवः**—पण म्हणून थांवतां कशाला ? तुम्ही काय म्हणणार हें अगाऊ ठरल्यासारखेंच असलें तरीं तें तुमच्याच तोंडून एकदां ऐकलेलें वरें. वोला; वापू , लौकर वोला.

**वापूः**—श्रीमंत, दादासाहेव कर्ते व कारभारांत मुरलेले आहेत; अटकेपर्यंत त्यांनीं भरारी मारलेली आहे, आणि वयाच्या व अनुभवाच्या मानानेंहि ते श्रीमंतांहून निदान लौकिकदृष्ट्या तरी पुष्कळच अधिक असल्यानें राज्यसूत्रें प्रत्यक्ष नसलीं तरी त्यासारखीं त्यांच्या हातीं ठेवून त्यांच्या मनांत वडील घराण्या-संवंधानें आलेलें वैषम्य काढून टाकावें एवढाच एक सरळ व न्यायाचा मार्ग आहे, असें मला वाटतें.

**माधवः**—वापू , इतक्या दिवसांच्या निकट सहवासानेंहि तुम्हास दादांचा स्वभाव चांगला ओळखतां येऊं नये हें आश्चर्य नव्हे काय ? दादासाहेव मनाचे खंवीर नाहींत; स्वतःत पांचपेंच नसून दुसऱ्यांचे ओळखण्या इतका त्यांच्यांत खोलपणा नाहीं; ते स्वतः भोळे असून दुष्ट मनाचे नाहींत ही गोष्ट मला माहीत आहे, पण आमच्या आनंदी काकींना आम्हास पाण्यांत पाहण्याची संवय् झालेली असून त्यांची तशी वागणूक प्रत्यक्ष पाहूनहि त्याला आळा घालण्याची त्यांच्यांत धमक नाहीं. अशा स्थितींत वापू , तुम्हीच सांगा वरें, त्यांच्या हातीं पेशवाईचा कारभार आम्ही कसा द्यावा तो ?

**वापूः**—श्रीमंतांची इच्छा असेल तर मी एक तोड सुचवितों.

**माधवः**—वापू ,तुम्ही तुमच्या मनांत असेल तें सर्व वोला; कांहीं सुद्धां मनांत ठेवूं नका. तुमचें म्हणणें योग्य आहे, अशी माझी खात्री झाल्यास मी त्यावद्दल निःसंशय विचार करीन.

**वापूः**—भारतीय युद्धाच्या पूर्वी कौरव-पांडवांमधील युद्धाचा प्रसंग टळून आपसांत समेट व्हावा, म्हणून, भगवान् श्रीकृष्ण शिष्टाई करण्याकरितां कौरवेश्वराच्या दरवारांत गेले, त्यावेळीं त्यांनीं उभयतांमधील समेट होण्याला आवश्यक अशी जी अगदीं निदानिची अट सांगितली तसल्याच अटींवर आपणहि श्रीमंत दादा-साहेवाशीं दिलजमाई करून घ्यावी, असें माझें मत आहे.

**माधवः**—म्हणजे ?

**बापू:**—पांडवांनां निदान पांच गांवें तरी द्या म्हणजे ते समेट करण्यास तयार आहेत, असें श्रीकृष्णांनीं कौरवेश्वरास सांगितलें. श्रीकृष्णाच्या ह्या म्हणण्याला रुकार देण्यास कौरव तयार झाले असते तर पुढील भारतीय युद्ध आणि मानवी संहार टळला असता; पण सुईच्या अग्रावर राहण्याइतकी माती सुद्धां मी पांडवांना स्वसंतोषानें केव्हांहि देणार नाहीं, असें दुर्योधनानें साफ सांगितल्यामुळें समेटाची सर्व आशा निष्फळ होऊन नाइलाजानें पांडवांनां कौरवांविरुद्ध हातीं शस्त्र धरावें लागलें.

**माधव:**—बापू, तुमच्या म्हणण्याचा भावार्थ आतां मी पुरा पुरा समजलों; पण पांडवांचा पक्ष खरा होता ही मुख्य गोष्ट मात्र तुम्ही विसरलांत ! ठीक आहे; दादासाहेब पेशवाई मिळविण्याकरितां साध्या नाहीं तर निदान सक्तीच्या मार्गाचें अवलंबन करतील, प्रसंग पडल्यास कोणाहि तिऱ्हाइतांच्या मदतीनें पेशव्याच्या मानेवर तरवार ठेवतील, असेंच ना तुमचें म्हणणें ?

**बापू:**—माझें खरें मत मी श्रीमंतांना स्पष्ट शब्दांत सांगितलें, याबद्दल मला माफी असावी; शिवाय, माझ्याप्रमाणेंच होळकरांचेंहि मत आहे. श्रीमंत थोरल्या रावसाहेबांपासून आजपर्यंत दौलतीवरील बरे वाईट प्रसंग सुभेदारानीं पाहिलेले आहेत. साम्राज्यांतील प्रत्येक महत्त्वाच्या बाबतींत त्यांनीं भाग घेतलेला आहे आणि दौलतीसंबंधीं खस्ता खात खातच त्यांचे केंस काळ्याचे पांढरे झाले आहेत; म्हणून म्हणतों, श्रीमंतांनीं होळकरांचाहि या बाबतींत सल्ला घ्यावा.

**माधव:**—मल्हारराव काका, सखाराम बापूंचें आतांचें बोलणें आपण ऐकलेंच आहे. आपण रावसाहेब पेशव्यापासूनचे बुद्धक सरदार असल्यानें पेशव्यांची तरुण पिढी आपणास पूज्य समजते, ही गोष्ट विचारांत घेऊन आपणहि या बाबतींत आपलें स्पष्ट मत मला द्या, अशी मी आपणास विनंति करतों.

**होळकर:**—( उठून ) सरकार, शास्त्रदृष्ट्या वारसदारीचा हक्क वडील घराण्याकडेसच चालत येण्याची परंपरा लक्षांत घेतां न्यायानें आपणच हक्कदार पेशवे आहांत, ही गोष्ट मला मान्य आहे; पण व्यवहार दृष्ट्या वस्तुस्थिति आणि परिस्थिति लक्षांत घेऊन भावी आपत्तीला तोंड देण्याची तयारी करण्याऐवजीं सुरवातीलाच तशा आपत्ति न उद्भवण्याची तजवीज करणें जास्त श्रेयस्कर होतें, असा माझा

अनुभव असल्यानें दादासाहेबांना संतुष्ट न ठेवण्यांत दौलतीला खात्रीनें धक्का बसेल या गोष्टीचा श्रीमंतांनी अवश्य विचार करावा, एवढींच प्रार्थना आहे. ( बसतात. )

**माधवः**—सुभेदार, तुमच्या ह्या अशा दुटप्पी वागणुकीमुळेंच पानपतची बाजू आमच्यावर उलटली ! यावेळीं मला तुम्ही उपदेश करतां, पण त्यावेळीं तुम्ही स्वतःच वस्तुस्थिति आणि परिस्थिति कितपत ध्यानांत घेऊन वागलांत ? ठीक आहे; दादासाहेबांना आमच्या मानेवर तरवार ठेवूं द्या; तुम्ही आणि बापू, भोंसले व निझाम यांनां मिळवून घेऊन त्यांनां मदत करा; आणि तेवढ्यानेंहि नच भागलें तर ह्मैसूरकराची आणि मुंबईकराचीहि मदत घ्या; पण-पण लक्षांत ठेवा, कीं पेशव्यानी हातांत बांगड्या भरल्या नाहींत !

**होळकरः**—श्रीमंतांनीं माझ्या म्हणण्याचा अर्थ विपरीत केला ! कुंभेरीच्या वेढ्यांत माझा खंडू मला सोडून गेल्या दिवसापासून मी सर्व सुखाला कायमचा अंतरलों आहें. नातू मालेराव वेडसर, माझी अहिल्या तर बोलून चालून बायको माणूस, आणि मी तर काय, आज उद्यां गळून पडणारें पिकलें पान ! तरी पण अशा स्थितींत सुद्धां निव्वळ श्रीमंतांनीं मला अंतर दिलें नाहीं, एवढेंच समाधान मानून मी आजपर्यंत आपलें आयुष्य कंठीत आलों आहें, पण सरकारच्या तोंडचे हे शब्द ऐकून माझी हिंमत तर पार खचूनच गेली ! सरकार, खंडोबाची आण घेऊन सांगतों कीं, होळकराचें घराणें पेशवाईच्या खऱ्या हक्कदार वारसाशिवाय त्या घराण्यांतील इतर कोणालाहि पेशवा होण्याला मदत करणार नाहीं.

**माधवः**—माफ करा, होळकर, मला माफ करा; हल्लींची वस्तुस्थिति आणि परिस्थितीच खरोखर इतकी नाजुक झाली आहे कीं, मला स्वतःलाच माझ्या इच्छेविरुद्ध पुष्कळ वेळां वागणें भाग पडतें; पण त्याच्या मुळाशीं स्वतःच्या स्वार्थाची बुद्धि, किंवा हुकमतीचा ताठा, हीं कारणें नसून साम्राज्याच्या दौलतीची काळजी व इभ्रतीचा अभिमान हीं कारणें आहेत. मला मराठ्यांच्या जुटीचें बळ पुन्हां घट्ट करावयाचें आहे–साम्राज्याचा दरारा पुन्हां कायम करावयाचा आहे–मराठ्यांच्या कपाळीं दुर्दैवानें पानपत येथें आलेलें अपयश धुवून काढावयाचें आहे–पेशव्यांच्या नशिबीं आलेल्या घरांतल्या घरांतीलच भाऊबंदकीच्या आगलावी चाळ्यांना मला आळा घालावयाचा आहे–आमच्या आपत्तीचा फायदा घेऊन आम्हास पायबंद लावूं पाहणाऱ्या म्हैसूरकराला मला नरम करावयाचें

आहे; आमच्याशीं नेहमीं दुटप्पी वागणूक ठेवणाऱ्या निझामाचा मला नकशा उतरावयाचा आहे; आणि—आणि मुंबईवाल्याचा चंचूप्रवेश मराठा दरबारांत न होण्याला आवश्यक असलेल्या तजविर्जांचीहि मला आज पासूनच तरतूद करून ठेवावयाची आहे; पण ह्या माझ्या सर्व इच्छा मला तुम्हा सर्वांच्या मदतीचें पूर्ण पाठबळ मिळेल तरच फलद्रूप होणार !

**नानाः**—पानपतच्या युद्धांत " दोन मोतीं गळून पडलीं, सत्तावीस मोहोरा हरपल्या, आणि रुपये व खुर्दा किती नाहींसा झाला याची तर गणतीच नाहीं ! " ही अनर्थकारक बातमी श्रीमंत नानासाहेब पेशव्यांना समजतांच त्यांचे मनास धक्का बसला ! आपण मारलेली राजकारणाची मूठ आपणावरच उलटली, आपल्या इभ्रतीच्या वर्मी घाव बसला, आणि आपण संसारसुखांसहि कायमचे अंतरलों, ह्या भावनेनें होणाऱ्या दुःखांतच त्यांचा अंत झाला ! आणि मुत्सद्दी व राजकार्य-धुरंधर पंतप्रधानाच्या अभावीं पेशवाईची तळी आतां लवकरच उचलली जाऊन तिला उचलतांना होणाऱ्या येळकोटाच्या जयघोषांत आपणासहि भाग घेतां येईल, या आशेनें साम्राज्याचे हितशत्रु आणि पेशवाईचे पक्के हाडवैरी आनंदानें नाचूं बागडूं लागले; तथापि, मराठा साम्राज्य, औट घटका कां होईना, पण जिवंत राहून मराठ्यांनीं अजूनहि पंतप्रधानाच्या प्रमुखत्वाखालीं, आपली मर्दुमकी व करामत जगाच्या निदर्शनास आणि आमच्या हितशत्रु व हाडवैऱ्यांच्या पडताळ्यास आणून द्यावी, अशीच ईश्वरी इच्छा असल्यानें श्रीमंतासारखी विभूति पेशव्याच्या रूपानें पुण्याच्या गादीवर विराजमान झाली. सरकार, आपणासारखा करारी, करामती व कर्तबगार मोहरा साम्राज्याच्या नशिबानें दीर्घकाल जिवंत मात्र रहावा, म्हणजे मराठ्यांच्या अंगांत किती धमक व चिकाटी आहे, हें जगाचे निदर्शनास ते लवकरच आणून दिल्याशिवाय रहावयाचे नाहींत.

**माधवः**—नाना, आयुष्याचा सौदा मानवाधीन नाहीं, पण आयुष्यांतील कृतीची दिशा ठरवून त्याप्रमाणें कीर्ति मिळविण्याचा सौदा मात्र मानवाधीन आहे. कृतकर्मांचीं फळें ज्याचीं त्यालाच भोगावीं लागतात; पण पापाचें प्रायश्चित्त पिढ्यानपिढ्या भोगावें लागतें, ही गोष्ट लक्षांत घेऊन, आपल्या आयुष्यक्रमांत ईश्वराची भीति व नीतीची चाड बाळगून, जर मनुष्यप्राणी या नश्वर जगांत आपलें आचरण ठेवील, तर, तो अल्पायुषी असला तरीहि त्याचा आयुष्यक्रम सुरळीत व सुखाचा

झाल्याशिवाय सहसा राहणार नाहीं, असा सिद्धांत आहे. आपल्या प्रत्येक कृतीला जग काय म्हणेल, आणि आपल्या प्रत्येक आचरणाचा जगाच्या मनावर काय परिणाम होईल, या दोन गोष्टींबद्दल विचार करीत जा, म्हणून आमचे नानासाहेब आम्हांस नेहमीं उपदेश करीत असत; आणि, काय सांगूं फडणीवीस, ईश्वर साक्षी आहे, पेशव्याच्या वडील घराण्यानें धाकट्या घराण्यास कधींहि "चुलत" या भेदभावानें वागविलें नसूनहि, सख्या भावास घरीं ठेवून चुलत भावास लढाईच्या तोंडीं देऊन यमसदनाची वाट दाखविली, आणि अशा रीतीनें पाव्हण्याच्या हातून सांप मारविण्याप्रमाणें परभारेंच कांट्यानें कांटा काढला, हा जनापवाद टाळावा म्हणूनच मुद्दाम आमच्या नानासाहेबांनीं आपला सर्वांत वडील छावा—माझा विश्वासदेव भाऊसाहेबांच्या हवालीं केला, ही गोष्ट माझ्या लक्षांत असूनहि, मी होऊन आगळीक करून, दादासाहेबांचा उपमर्द होईल, अथवा त्यांच्या इतमामांत कमीपणा पडेल, असें अयोग्य वर्तन चुकून सुद्धां कधीं तरी करीन, असें तुम्हां सर्व दौलतीच्या हितचिंतक मंडळाला तरी निदान खास वाटणार नाहीं. वापू, ऐकलेंत का माझें म्हणणें ?

**वापूः**—श्रीमंतांची ही राजकारणांतील दूरदृष्टि खरोखरीच अभिनंदनीय आहे. श्रीमंतांची मी तोंडापुरती स्तुति करतों अशांतला भाग नव्हे, पण हिंदुस्थानांतील साडेतीन शहाण्यांचें एकवटलेलें शहाणपणहि सरकारच्या मुत्सद्दीगिरी पुढें फिकेंच पडेल. मी काय करावें अशी श्रीमंतांची इच्छा आहे ?

**माधवः**—वापू, दादासाहेबांनीं संतुष्ट रहावें, आणि आमच्याविरुद्ध कारस्थानें करूं नयेत, म्हणून आम्ही आपल्यापरीं आजपर्यंत अगदीं शिकस्त केली आहे; इतकेंच नव्हे, तर प्रत्येक वेळीं त्या बाबतींत आमची निराशाच होत गेली, असा आमचा अनुभव आहे. तरी पण आजपर्यंतचे आमचे सर्व प्रयत्न तुमच्या मदतीच्या अभावीं फसले, असें मानून, आणि, यावेळीं तुमची मदत घेऊन, कडक उपाय योजण्यापूर्वी, पुन्हां एकवार शेवटचा प्रयत्न करून पहावा, अशी माझी इच्छा आहे. नाना, तुम्ही व वापू दादासाहेबांकडे जा. हल्लींची एकंदर वस्तुस्थिति आणि माझी कळकळीची नम्र विनंति त्यांनां कळवा; आणि माझ्यासंबंधीं त्यांची दिलसफाई, व खातरजमा करून हे भाऊबंदकीचे धिंडवडे आतां तरी थांबतील अशाबद्दल प्रयत्न करा. वापू, दादासाहेबांच्या या आसुरी महत्त्वाकांक्षेनें साम्रा-

ज्याच्या व पेशव्याच्या अब्रूचें सर्व जगांत झालें तेवढें प्रदर्शन पुरे, अशी त्यांनां तुम्ही माझ्या वतीनें प्रार्थना करा. नाना, अन्यायानें पापी इच्छेच्या जोरावर उठावणीनें हुराळून जाऊन उभारलेल्या इमारतीचा पाया, हा नेहमीं डळमळीतच रहाणार, हें तत्त्व त्यांनां स्पष्ट समजावून सांगा. तुम्हांस भिऊन म्हणून नव्हे, पण पेशव्यांच्या घराण्यांत झालेल्या बेकीची पुन्हां एकी व्हावी, याच पवित्र हेतूनें, तुमचा दिवसाढवळ्या चाललेला नंगानाच बंद व्हावा म्हणून मी हा अखेरचा प्रयत्न करीत आहें, अशी तुम्ही त्यांनां माझ्यातर्फे विनंति करा; आणि इतक्यावर-हि जर दादासाहेब आपला हेंका सोडण्यास तयार नसतील तर अखेर काय परि-णाम व्हावयाचा असेल तो होवो, अथवा मला जग काय म्हणावयाचें असेल तें म्हणो, पण कोणाचीहि भीडमुर्वत न ठेवतां अगर त्यांच्या वडिलकीच्या माना-संबंधानें कोणतीहि दरकार न बाळगतां नीतीच्या दृष्टीनें आणि साम्राज्याच्या सुरक्षिततेस आवश्यक अशा न्यायाच्या धोरणानें जरुरीचे असे कोणतेहि सख्तीचे उपाय योजण्यास मी केव्हांहि यत्किंचितसुद्धां माघार घेणार नाहीं, असें त्यांनां माझ्यातर्फे खडखडीत वजावून सांगा.

**नाना:**—सरकारच्या आज्ञेप्रमाणें दादासाहेबांकडे मी व बापू जाऊन बेकीची एकी व्हावी म्हणून आपली पराकाष्ठा करतों.

**माधव:**—तुम्हा उभयतांच्या प्रयत्नांना यश येवो, असें माझें परमेश्वराजवळ हात जोडून मागणें आहे. नाना, आजच्या दरबारांत आणखी कांहीं महत्त्वाच्या कामाची वाटाघाट होणें अजून बाकी आहे काय?

**नाना:**—सरकार, शिंदे, होळकर व कानडे उत्तरेकडेस शह देणार आहेत, पण हैद्राबादकरावर व म्हैसूरकरावर मोहीम पाठविण्याची दिरंगाई केल्यास दौलतीच्या दृष्टीनें ती अपायकारक होण्याचा संभव असल्यानें त्या बाबतींत काय तजवीज करावयाची याबद्दलचे अखेरचे हुकुम देणें अजून बाकी आहेत; तसेंच नागपूरकर भोंसले दादासाहेबांच्या पक्षाकडे न वळतील अशाबद्दल काय उपाय योजावे, या विषयींचा निर्णय होणें बाकी राहिलेला आहे; या दोन महत्त्वाच्या गोष्टींबद्दल श्रीमंतांच्या मर्जीनुरूप आज्ञा झाली म्हणजे आजच्या दरबारचें काम खलास झालें.

**माधवः**—ठीक आहे; निझामच्या व भोंसल्यांच्या दरबारीं एक एक शहाणा आहेच; नाना, विठ्ठल सुंदर व देवाजीपंत चोरघडे यांनां पत्रें लिहा; शिवाय दरबार तर्फेचे खलितेहि आजच्या आजच रवाना करा. फडके, तुम्ही हैदरवर चाल करून जाण्याची तांतडीनें तयारी करा; निझाम बाहेरचा म्हणून आत्तांच्या आत्तां त्याचे बरोबरील लढाईच्या तयारीस लागा. मी स्वतः हैद्राबादकरावर चाल करून जाणार आहें; पण नाना, लक्षांत ठेवा कीं, भोंसले हे आपले असल्यानें हरप्रयत्न करून युक्तीनेंच त्यांच्याशीं आपणाला सलोखा करून घेऊन, साम्राज्याचीं महत्त्वाचीं कामें त्यांच्यावर सोंपवून, तीं पूर्णतेस न्यावयाचीं आहेत. घोरपड्यांशिवाय हैद्राबाद, कर्नाटक, म्हैसूर आणि मद्रास या व्यापक प्रदेशांतील आमच्या विरुद्धच्या हालचाली व कारस्थानें यांनां दडपण म्हणून आम्ही निर्माण केलेल्या पटवर्धन सरदार मंडळाला हल्लींची वस्तुस्थिति कळवून तयारीनें राहण्यास हुकूम द्या, आणि पुण्यांतील व बाहेरच्या आपल्या इतर सर्व सरदार दरकदारांनां आजच्या दरबारची ही हकीकत कळवून दिग्विजयाच्या व्यापक मनसुब्यांत झाडून सर्वांनीं सामील होण्याकरितां तावडतोब पुण्यास येऊन हजर व्हावें, अशाबद्दल आजच्या आज चोहोंकडे सांडणीस्वार रवाना करा. (बापूकडे वळून) बापू, आजचा दरबार खलास होण्यापूर्वी मी पुन्हां विनंति करतों कीं, तुम्ही दादासाहेबांना माझा निरोप स्पष्ट शब्दांनीं कळवा, आणि इतक्यावरहि पेशवाईवर भाऊबंदकीचे निखारेच फेंकावयाचे, असा त्यांचा हट्ट दिसल्यास तुमच्या प्रत्येक आगलावीच्या आगाळिकीस तोंड देऊन तुम्हांस पेशव्याचा कैदी करण्याइतकी धमक या माधवांत आहे, असें त्यांनां खडखडित रीतीनें त्रिवार बजावा. नाना, आटोपलें का दरबारचें काम?

**नानाः**—होय सरकार! (पडदा पडतो.)

# प्रवेश ] अंक पहिला. [ दुसरा.

स्थळ—दादासाहेबांचा उपाध्या विठ्ठलशास्त्री याचें घर.

**विठ्ठलः**—काय करावें बुवा ! मोठ्या लोकांचें अनुकरण गरीब लोक करतात अशी एक आपल्यांत म्हण आहे, पण मोठ्या लोकांच्या बायकांचें अनुकरण गरीब लोकांच्या बायका करीत असतात, अशी ह्या म्हणीची सुधारलेली आवृत्ति काढल्या शिवाय आतां अगदीं कसें गत्यंतरच नाहींसें झालें आहे वेटें! आमची हीच पहाना; पूर्वी किती पण गोगलगाय होती हो! पण ह्या दादासाहेबांचा आश्रय घेतल्या-पासून आमची ही " अग " तर आतां कशीं अगदीं आनंदीबाईसारखी दुसरी " आग " च बनून गेली आहे न काय ! पण म्हणावें, याद राखून ठेव या विठ्ठल शास्त्र्याशीं गांठ आहे. ( पडद्याकडे पाहून ) अरे, इतका नट्टापट्टा करून ही धिंडका आतां निघाली कोठें ? ( हांक मारून ) अग ए-( तीन वेळां पहिल्याहून मोठ्यानें अशा हांका मारतो, त्याची नटलेली बायको बाहेर येते. तिच्याकडे पाहून रागाचा अविर्भाव आणून ) कान फुटले वाटतें.

**रखमाः**—काय झालें आहे काय माझ्या नांवानें सारखें कोंकलायला ? एखादी हुडळबिडळ मानगुटीवर बसली होती कीं काय ?

**विठ्ठलः**—अग तूं एक हुडळ माझ्या घरांत शिरलीस तर माझ्या संसाराला हा रंग आला; आणखी दुसरी एखादी मानेवर बसली कीं, मग काय कडेलोटच होणार!

**रखमाः**—कुणाला-कुणाला हुडळ म्हणतां ? कुणाचा-कुणाचा होणार कडे-लोट ? तुमचा का तिचा ? का माझा कडेलोट करणार तुम्ही ! कडेलोट करणारांचें तोंड तर पहा काय लागून गेलें आहे तें ! लाज नाहीं वाटत मला हुडळ म्हणाय-याला ! कडेलोट करतात म्हणे कडेलोट!

**विठ्ठलः**—वाऱ्यावरोबर सुद्धां भांडण्याची तुला संवयच होऊन गेली आहे; पण हें पहा, हें असें कांहीं बुवा फार दिवस निभणार नाहीं.

**रखमाः**—असें म्हणजे कसें ? निघूं द्या कीं, मुखसांतून एकदाचीं काय तीं स्पष्ट वाकसें ! चावत असते कीं काय मी तुम्हाला ?

**विठ्ठल:**—अग तुला जर तशी दररोज एक दोन वेळां नियमितपणें मला चावण्याची खरोखरीच संवय असती, तर किती तरी बरें झालें असतें. तुझी ही संवय चांगली म्हणून तुला उत्तेजन देण्याकरितां मी होऊन सुद्धां कदाचित् तिसऱ्यानें तुझ्याकडे येऊन मला चाव, म्हणून विनंति केली असती; पण बाबा, एकदां का हा तुझ्या तोंडचा पट्टा सुरू झाला-( तोंड वेडें वांकडें करीत आणि भीतीचा आविर्भाव दाखवीत ) आणि तुझ्या ह्या मुलुखमैदान तोफेंतून एकदां का गोळे सुटूं लागून त्यांचा सारखा भडीमार सुरूं झाला, कीं हें माझें घर कसे सारखें हादरूं लागतें, आणि त्याचा धक्का पेशव्यांच्या वाड्यांतील दादासाहेबांच्या निवासस्थानालाही लागेल कीं काय अशी भीति वाटूं लागते.

**रखमा**—हो, हो, हो, तर, तर, हदरेल तर; भीति वाटायचीच ! अहाहा, काय मेला बोलावयाला जसा ताळच नाहीं कांहीं ! तोंडांत येईल तें सारखें भरकटत सुटण्याची संवय लागली आहे न् काय ! पण काहो, हें आपलें घर आणि तें दादासाहेबांचें निवासस्थान अजून जमीनदोस्त होत नाहीं; याला कारण मला वाटतें आपल्यासारख्या सिद्ध पुरुषाच्या कृपादृष्टीचा फेरा, हेंच असेल; नाहीं बरें ?

**विठ्ठल:**—नाहीं, त्याला दुसरेंच कारण आहे आणि तें पूर्वपरंपरेचे ठोकताळे व ठरींव अनुभव यांनीं अगदीं निश्चित झालेलें आहे.

**रखमा:**—आपल्या डोंबल्याचें आलें आहेत ठोकताळे आणि अनुभव !

**विठ्ठल:**—आतां कसें अगदीं बरोबर बोललीस; आपलें डोकें शांत असतांना मी ज्या ठोकतोळ्यांची व पूर्वानुभवाची तोंडमिळवणी केली, त्यावरून मला वाटतें, हें आपलें चंद्रमोळी घर, दादासाहेबांचें निवासस्थान, आणि मराठा साम्राज्याच्या पेशवाईची इमारत केव्हां जमीनदोस्त होणार, हें अगदीं ठरून चुकल्यासारखेंच आहे.

**रखमा:**—( वांकडें तोंड करीत व माना हलवीत ) केव्हां ? केव्हां ?

**विठ्ठल:**—ऐक; एकदां तूं निर्वाणीनें तुझ्या तोंडाची तोफ डागून तिचा सारखा भडीमार सुरूं केलास कीं हें आपलें चंद्रमोळी घर, खास जमीनदोस्त होणार. त्या नंतर तिचें तोंड फिरून तिची दृष्टि दादासाहेबांच्या निवास-स्थानाकडे निःसंशय वळणार; आणि पुढें, तुझ्या तोंडचा तोडा शिलगत असतांनाच त्याच्या मदतीनें आनंदीबाईनें आपली महाकाली तोफ डागली कीं, दादासाहेबांचें निवासस्थान आणि त्याबरोबर मराठा साम्राज्याची आणि पेशवाईची इमारत पार जमीन दोस्त होणार !

**रखमा:**—वाहवा, वाहवा, काय पण सुतानें स्वर्गाला जाण्याची दूरदृष्टि ही! दिवे ओंवाळा दिवे तोंडावरून!

**विठ्ठल:**—हें पहा, तुझ्या तोंडावरून दिवे ओंवाळले जाण्याला अजून थोडासा अवकाश आहे. आनंदीबाईनें एकदां दिवे पाजळले कीं, तुझ्याहि तोंडावरून तेंच ओंवाळलें जावयाचे आहेत. जरा थांब, अशी फारशी उतावीळ होऊं नकोस.

**रखमा:**—मेला, जिभेला हाड ना शेंडा! इतके अकलेचे बृहस्पति असतां तर दादासाहेबांच्या देवघरांत कां माशा मारीत बसला असतां?

**विठ्ठल:**—मग आपल्या घरांत तुलाच मारीत वसूं वाटतें? वेडी रे वेडी!

**रखमा:**—( अंगावर उसळल्यासारखें करून ) मारा बघूं–मारा बघूं–काय ताप लागली आहे माझ्या अंगावर हात टाकण्याची; कुणाला–कुणाला वेडी म्हणतां?

**विठ्ठल:**—तुला–तुला वेडी म्हणतों; वेडी नाहीं तर काय? अग, अंगावर हात टाकण्याला ताप यावा लागत नाहीं, पण ताप व्हावा लागतो, एवढी साधी गोष्ट ही तुला समजत नाहीं?

**रखमा:**—नाहीं; नाहीं समजत मग? काय पण मेले अकलेचे तारे तुटताहेत जसे!

**विठ्ठल:**—पाहिलेंस; तुझ्या वेडेपणाचें हें दुसरें प्रत्यंतर; तारे अकलेंतून तुटत नाहींत पण आकाशांतून तुटतात, ही साधी गोष्टहि तुला समजत नाहीं? काय म्हणावें तुझ्या ह्या अज्ञानपणाला!

**रखमा:**—पुरे कराहो तुमचें हें पुराण; अचरटपणाचा कळस होण्याला आतां कितीशी बाकी उरली आहे?

**विठ्ठल:**—अग, अगदीं थोडी; फक्त एक दोन दिवसांची! आज रावसाहेब पेशव्याकडून बापूसह नानाफडणवीस दादासाहेबाकडे येऊन पेशवाईतील ह्या गृहकलहाचा शेवट व्हावा म्हणून आपली पराकाष्ठा करणार आहेत, पण त्यांत त्यांनां अपयश आलें कीं, झालाच बघ अचरटपणाचा कळस. ( तिच्या जवळ जाऊन तिच्या अंगाला हात लावण्याचा प्रयत्न करतो. )

**रखमा:**—( त्याचा हात झिडकारून रागानें फणफणत ) इश्श मेलें! मनाची नाहीं तर जनाची तरी थोडीशी? बत्तिशीं हलण्याची वेळ येत चालली, तरी अजून कांहीं पांचटपणाची संवय जातच नाहीं मेली!

**विठ्ठलः**—अग नकोग अशी रागावून दूर उभी राहूंस; हें पहा, तुला ही अशी रागावलेली पाहिली कीं, मला वघ अगदीं कसेंसेंच होऊं लागतें. नकोग मला अशी दूर लोटूस; येग ये जवळ येग माझी मैना-( तिच्याजवळ जातो, व पुन्हां हात पुढें करतो. ती त्याला पुन्हां झिडकारते. ) कां ? ( रागानें ) फारशा गमजा लावल्या आहेस नाहीं ? चवदाव्या रत्नाचा प्रयोग हवा आहे वाटतें व्हायला !

**रखमाः**—( रागानें ) अहो जा; माझें पाणिदान होऊन मी या घरांत आल्या दिवसांपासूनच ठाऊक झालें आहे मला आपल्यांत कितीसें पाणी आहे तें !

**विठ्ठलः**—( रागानें ) मला कितीहि पाणी असो पण तुझ्या डोळ्यांतून पाणी काढण्या इतकें माझ्यांत पाणी आहे हें खास.

**रखमाः**—पण आनंदीवाईसाहेबांच्या घरचें पाणी पिऊं लागल्यापासून माझ्यांत किती पाणी आलें आहे, हें ओळखण्या इतकें पाणी आपणांत नाहीं हेंही खास !

**विठ्ठलः**—वरें पण तुला थोडें पाणी पाजूं का ?

**रखमाः**—अहो जा; पाणी पाजणाऱ्यांची सुरत तर पहा काय लागून गेली आहे ती ! आपण का मला पाणी पाजणार ? आतां म्हणूं नये एवढेंच; पण अशा आपल्या सारख्या छपन्नांना मी पाणी पाजीन, समजलांत.

**विठ्ठलः**—पाहिलेंस, लागलीस ना पुन्हां वाऱ्या वरोवर भांडायला; माझ्या म्हणण्याचा अर्थ ध्यानांत घेत नाहींस, कांहीं नाहींस, आणि आपलें तोंडांत येईल तें भरकटत सुटतेस; हें काय वरें असें करावें ? ( जाउ ज.त ) जे आहेत्ते माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा आहे कीं, आपराणीसाहेवांची टकळी दोन तास सारखी सुरू असल्यानें आपल्या घशाला कोरड लागली असेल, म्हणून ह्या सेवेशीं निरंतर तत्पर असलेल्या आपल्या कृपाभिलाषी नम्र दासानें आणून दिलेलें पाणी पिऊन आपराणीसाहिवांनीं आपल्या घशाची नळी जे आहेत्ते ओली करावी, आणि पुन्हां तकवा आल्यावर वाटल्यास ह्या चरणारविंदीं मिलिंदायमान असलेल्या दासावर आपल्या अमृततुल्य वाणीप्रसादाचा पुन्हां वर्षाव करावा.

**रखमाः**—हा कुठला हो मेला वाणीप्रसाद येथें मरायाला आला ?

**विठ्ठलः**—पाहिलेंस तुझ्या वेडेपणाचें हें तिसरें उदाहरण; वाणीप्रसाद म्हणजे तुमच्या सारख्यांच्या मुखांतून जीं शेलकीं व वेंचक मुक्ताफळें वाहेर पडलीं तीं, पडतात तीं, आणि पडणार तीं.

**रखमा:**—लागलां वरें का तुम्ही पुन्हां रंगांत येऊं; फळें झाडावेलाला लागतात कीं माणसाच्या तोंडांतून बाहेर पडतात?

**विठ्ठल:**—तूंच अकलेची खंदक आहेस नी काय? अग, तुझ्या तोंडांतून पडलेलीं मुक्ताफळें म्हणजे तूं आतांपर्यंत जें बोललीस तें; अगदींच मूर्ख आहे हो शिंची!

**रखमा:**—खबरदार वेंडें वांकडें बोललांत तर! आहाहाहा! कायहो पण आपल्या अंगीं शहाणपण भरलें आहे हें; रत्नाच्याच पदरीं पडलें आहे न काय मी!

**विठ्ठल:**—वरें पण त्या बरोबर चवदावें रत्नहि तुझ्या पदरीं पडावें अशी तुझी इच्छा आहे काय? राणीसाहेबांची ही मनकामना तृप्त करण्यास जे आहेत्ते कालाचे ठायीं हा आपराणीसाहेबांचा बंदा तावेदार नेहमीं तयार आहे.

**रखमा:**—नका नका इतकी नका तसदी घेऊं; असाल तर काय झालें तरवारलेले! अहांतच तुम्ही तसे घरांतले राऊत. पुरे झाली मेली आतां तुमची ही दरवारी भाषा.

**विठ्ठल:**—पाहिलेंस किती वेडी आहेस तूं ती; अग, ही दरबारी भाषा नाहीं पण दरबारांतील वड्या लोकांच्या अंतर्गृहांतील ही भाषेची लकब आहे, एवढें समजण्याची ही तुला अक्कल नाहीं?

**रखमा:**—छे, छे, मला कशाची आली आहे अक्कल; अकलेचा सगळा गड्डा ब्रह्मदेवानें काय तो तुमच्या एकट्याच्याच हवालीं केला असेल जसा कांहीं, नाहीं?

**विठ्ठल:**—( लडिवाळपणानें ) अग जाऊं देग; अकलेचा नसला तरी ह्या तुझ्यासारख्या अप्सरेचा गड्डा तर ब्रह्मदेवानें माझ्या हवालीं केला आहे कीं नाहीं? ( तिच्याजवळ जात जात ) ओहोरे माझी छबुकडी! आहारे माझी मैना! ( ती मान फिरविते. तिच्याकडे पहात स्वगत ) दादासाहेबांचें अनुकरण केल्याशिवाय कांहीं आतां हें गाडें ठिकाणावर येईल असें दिसत नाहीं वेटें! ( उघड ) हे सुंदरी, विवाहग्रंथीकेनें आपण उभयतां बद्ध झाल्याला अजमासें तपा दीड तपापर्यंत काळ लोटलेला असूनही तुला अद्याप तुझ्यावरील माझ्या खऱ्या प्रेमाची पारख झालेली नाहीं, हें माझेंच दुर्भाग्य आहे, असें मी समजतों. लाडके, तुला अशी रागावलेली पाहिली म्हणजे माझ्या मनोवृत्तींचा कसा हलकल्लोळ उडून जातो; ( तिच्या जवळ जात ) नकोग माझा हा असा अंत पाहूं! घेग मला आतां एकदाचें आपल्या पदरांत! ( तिला आलिंगन देण्यास जातो. )

**रखमा:**—( त्याला रागानें झिडकारून ) अरे हड, हद्द झाली बाई लघळपणाची ! मेलें वाहेरचें दार फाटक उघडें आहे, त्याची तरी कांहीं खंत बाळगा.

**विठ्ठल:**—माझ्यापेक्षां तुला त्या उघड्या दाराची खंत अधिक वाटते होय ? तुझ्या ह्या असल्या लपंडावाला आणि चाळवाचाळवीला मी आतां अगदीं सुद्धां भीक घालणार नाहीं, समजलीस; अग, आपल्या घरांत आत्तां येतें आहे कोण मरायला? ( इतक्यांत दादासाहेबांच्या घरची, परिजनांपैकीं सुंदरी या नांवाची दासी एकदम घरांत येते, व हा प्रकार पाहून हळूच एकीकडे उभी राहते. ) लाडके, नाहींना तूं माझें ऐकत ? ( मनाशीं ) छे, एवढयानें नाहीं ही वदणार ! दादासाहेबांच्या दुसऱ्या अस्त्राचा आतां उपयोग करून पाहिला पाहिजे; ( उघड ) लाडके, असें काय वरें माझ्यावर रागवावें; अगदीं थोडक्यांत म्हणजे हा वघ मी आतां तुला हात जोडतों. ( हात जोडतो; सुंदरी हें सर्व हळूच पाहते. )

**सुंदरी:**—( स्वगत ) आव माझ्या बया; इठ्ठल सासत्रीच नव्हे का ह्यो ! म्हातारा अक्सी जनु लई रंगांतच येवनशनी ग्येला है न काय ! वघु तर खरी वांइच काय गमुत अक्शी म्होर व्हतीया तीः

**विठ्ठल:**—हर हर लाडके, नाहींच ना तुला या पामराची दया येत! (स्वगत) छे ! तसें नाहीं आतां उपयोगीं; दादासाहेबांच्या निर्वाणीच्या अस्त्राचाच आतां प्रयोग केला पाहिजे. ( तिच्यापुढें जाऊन उघड ) हे चारुगात्रि ! आतां मात्र तूं माझी अवहेलना केलीस तर मी खास ह्या जगांतून कायमचा नष्ट होणार; घे लाडके घे; माझी शरणचिठ्ठी घे; हा पहा मी तुला साष्टांग नमस्कार घालतों, आतां तरी मला आपल्या पदरांत घे. ( तिला नमस्कार घालावयास जातो, ती त्याला आवरते, व उभयतां एकमेकांस आलिंगतात. )

**सुंदरी:**—( हें पाहून ) पाहिला का ह्यो भटाचा खेल; इठ्ठल सासत्रीच नव्हो का ह्यो: भरतुया जनु अक्शी अस्तुरी पायीं ! ( थोडी मागें होते. विठ्ठलशास्त्री मुका घेण्यास रखमाबाईच्या अगदीं गालाजवळ तोंड नेतो, इतक्यांत सुंदरी खांकरते. )

**विठ्ठल:**—( दचकून इकडे तिकडे पहात ) अरे हें खाकरलें कोण ? भूतबीत तर नाहींना माझ्या घरांत ! ( विचार करून ) पण छे, आमच्या घरांत भाऊबंदकीच नाहीं तर भुतें कोठलीं उत्पन्न होणार ? ( पुन्हां वायकोचा मुका घेण्यास तोंड तिच्या गालाजवळ नेतो; सुंदरी पुन्हां खांकरते; विठ्ठलशास्त्री दचकतो; रखमाबाई

त्याला झिडकारून लांब उभी राहते.) छेः ! आतां बिलकुल उपेक्षा करून चालावयाचें नाहीं. हें काय गौडबंगाल आहे, याचा शहानिशा आत्तांच्या आत्तांच केला पाहिजे. ( दाराकडे जाऊं लागतो. इतक्यांत सुंदरी पुढें येऊन उभी राहते; विठ्ठलशास्त्री तिच्याकडे पहात ) ह्याच चटकभवानीचे हे चाळे असतील; कोण ग तूं? कशाला आलीस येथें ? घरांत येतांना पहिल्यानें हांक मारण्याची अक्कल नाहीं वाटतें ?

**सुंदरीः**—( मनांत ) सासतरी बावास्नी अस्तुरी म्होरे गोंडा घोलाया न तिर्शी विलगाया व्होव विलगाया; कसा कुत्र्यावानीं खेंकसतूया अंगावरी ? अक्शी तिल-पापड झालाय न काय जनू येहाचा ! ( उघड ) सासत्रीबावा, दादासावांकडे तुम्हास्नी बिगी बिगी बलावलाया अक्शी; येवाची पुजा बिजा करत व्हता व्हय ?

**विठ्ठलः**—( तिच्या अंगावर खेंकसून ) अग टवळे, तूं फारच फाजील दिसतेस ग; तुला काय करायचें आहे मी कांहींही करीत असलों तरी ? जा; येतों म्हणून सांग; निघ माझ्या घरांतून, चल; नीघ-( तिला पुढें ढकलीत चालतो; ती "आवो भटजी, आवो सास्त्रीबावा, आवो इठ्ठल सासत्री" असें म्हणत व तो "चल, चल, निघ, निघ, पुढें हो-पुढें हो," म्हणत तिला बाहेर घालवितो व परत आल्यावर ) तुला अगदीं सुद्धां याबद्दल ओशाळल्यासारखें वाटायला नको बरें का ? ( तिच्याजवळ जाऊन पाठीवर हात फिरवितो. )

**रखमाः**—( रागानें त्याचा हात झिडकारून ) बाहेरचें दार सत्ताड उघडें आहे म्हणून सांगत होतें, पण त्यावेळीं कान जसे कांहीं फुटले होते. म्हातारचळ लागणार बरें का तुम्हाला ह्मातारचळ ! आतां इतकी शोभा झाली तरी आपला पुन्हां लोंचट-पणा आहेच. इश्श; शिकस्त झाली बाई कोडगेपणाची ! खबरदार माझ्या अंगाला आतां हात लावाल तर. सारखा भोंवतीं भोंवतीं गोंडा घोळीत राहतां त्याची लाज नाहीं वाटत तुम्हाला ?

**विठ्ठलः**—( लघळपणानें ) अग, जाऊंदे ग ती गोष्ट ! ( तिच्याजवळ जात जात ) ओहोग माझी मैना; ओहोग माझी छबकडी; ( असें म्हणत तिचा मुका घेण्याचा प्रयत्न करतो. इतक्यांत पडद्यांत 'आवो भटजी, आवो भटजी, आवो इठ्ठल सास्त्री, आवो इठ्ठल सासत्री,' अशा हांका ऐकूं येतात; तो 'अग, एकच मुका, फक्त एकच मुका' असें म्हणत आणि ती 'आतां नाहीं, आतां एकही नाहीं,' असें म्हणून त्यास झिडकारीत असतांना पडदा पडतो. )

# प्रवेश ] अंक पहिला [ तिसरा.

**स्थळ**—दादासाहेबांचें निवासस्थान.

( श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब पेशवे व आनंदीबाई बसल्या आहेत असा पडदा उघडतो. )

**आनंदीः**—बस्स, तें कांहीं सुद्धां आतां नाहीं चालायचें समजलांत ! तुमची ही अशी मेषपात्रासारखी वागणुकच आपणाला भिकेला लावण्यास कारणीभूत होणार.

**दादा०**—आनंदी, नकोग तूं मला अशी नेहमीं छळीत राहूस, हें पहा—कसेंहि असलें आणि कांहींहि झालें तरी माधव हा अखेर माझाच—आपलाच आहे. म्हणून म्हणतो पेशवाईचीं सूत्रें त्याच्याकडेस असलीं काय किंवा माझ्याकडेस असलीं काय सारखींच !

**आनंदीः**—आग लावा तुमच्या ह्या वेदांताला; मेले झाडून सारे आपणाला बाइलबुद्ध आणि भोळा नंदी म्हणतात, त्याची तरी कांहीं लाज बाळगा. थांवा, म्हणावं मेल्यानों, ह्या पुण्यावर नांगर फिरवीन तरच मी खरी नांवाची.

**दादा०**—आनंदी, अविचाराचे परिणाम कधींहि चांगले होत नाहींत बरें; स्वार्थी महत्त्वाकांक्षेनें मनुष्य प्राणी एकदा का झपाटला गेला, म्हणजे आपली असुरी इच्छा, आपलीं अविचारीं मतें, आपली अन्यायी कृति, आपला अभिलाषी हांवरा स्वभाव आणि मनांत निरंतर घोळत असलेल्या पापी विचारांमुळें आपली हरहमेश साध्या व्यवहारांतहि होणारी बावरी वागणूक, ह्या गोष्टी जनतेच्या कितपत पचनीं पडतील, हा विचार करण्याइतका सुद्धां सारासार विचार त्याच्यांत रहात नाहीं. जगाला तरी मी काय म्हणून दोष लावावा ? जगाला दिसतें तें जगानें बोलूं नये हा न्याय कोठचा ? आणि खरे दोष छपवून जगानें आमच्या असत्या नसत्या सद्गुणाचांच नेहमीं नगारा वाजवीत रहावें, असें म्हणण्याचा तरी आपणास काय हक्क ?

**आनंदीः**—( रागानें ) तुम्हाला तरीं पेशव्यांच्या घराण्यांत जन्म घेण्याचा काय हक्क ?

दादा०—आनंदी! अशी रागावून त्रागा करूं नकोस. पूर्व कर्मांतील पाप-पुण्या प्रमाणें इहलोकीं मनुष्य प्राणी जन्मास येऊन पूर्व संस्काराचाच त्याच्या इहलोकीच्या व्यवहारावर परिणाम झालेला असतो. जननिंदेची चाड बाळगणारांनीं आपलें वर्तनहि नको का तसेंच नीतीचें व न्यायाचें ठेवावयाला ? आनंदी, जग म्हणतें तें खोटें काय? तुझ्या इच्छा, तुझ्या महत्त्वाकांक्षा, तुझी मर्जी गैरमर्जी अगर तुझी नाचरी मनोवृत्ति, ह्या पैकीं एकाहि बाबतींत कोणाची काडीची सुद्धां दरकार न बाळगतां निव्वळ तुझें मन न दुखवावें म्हणून मी आजपर्यंत जी वागणूक ठेविली आणि हल्लीं ही ठेवीत आहें, त्यावरून जगानें मला बाइलबुद्ध व भोळा नंदी म्हटलें यांत कोठें चूक केली, हेंच मुळीं मला समजत नाहीं.

आनंदीः—मी इतकी आपल्या कानीं कपाळीं ओरडत असतें, पण आपणाला कोठें पटते आहे माझें बोलणें ? पुणें, पेशवे व पेशवाई, हें सर्व अजून आपणाला आपलेंच आहे असें वाटतें काय ?

दादा०—अग हो; हें सगळें आपलेंच आहे; आपलें नाहीं तर कोणाचें ?

आनंदीः—तें कसें ?

दादा०—त्र्यंबकरावमामाची व माझी खडाजंगी उडाल्यानंतर जगाची अटकळ साफ फसल्यासारखी मुत्सद्दीपणाची करामत दाखवून ज्यानें कमालीनें निव्वळ तुझ्या माझ्या मानाचें मातेरें करण्याच्या सर्वस्वीं हातीं आलेल्या आमच्यावरील अपमानास्पद प्रसंगाचा यत्किंचितहि फायदा घेण्याची नुसती कल्पना सुद्धां मनांत न आणतां आपणाला अत्यंत उदारपणानें वागविलें, तो दिलदार व दैवीसंपत्तिमान् माधव आपला नाहीं तर कोणाचा ?

आनंदीः—आणखीं ?

दादासा०—त्र्यंबकरावमामापेठे यानांच उलट दोष देऊन आणि मागें ठेवून, आणि आपल्या बाबतींतील शिष्टाईत बापू व नाना यांनाच पुढें करून आमच्या सारखें तासांत तीन रंग, असें न वागतां ज्यानें आपल्या मनाचा थोरपणा कायम ठेवून आमची मर्जी सांभाळण्याकरितां कळकळीनें प्रयत्न सुरूं केला, तो ऐश्वर्यमान् व ऐक्यप्रिय माधव आपला नाहीं तर कोणाचा ?

आनंदीः—आणखी कांहीं ?

दादा०—वडिलकीच्या मानांत तुझेंहि कोठें न्यून पडलें आहे ?

आनंदीः—माझें ?

दादा०—होय, तुझें-तुझेंच! पेशव्यांच्या घराण्यांतील वडिलकीच्या मानांत अग्रपुजेचा मान नेहमीं तुलाच मिळतो. तुझा मान ठेवावा म्हणूनच निव्वळ माझ्या माधवानें स्वतःच्या लग्नाच्या वेळीं प्रत्यक्ष मातोश्रीच्या-आमच्या गोपिका-वहिनींच्या दर्शनास न जातां रमेसह पहिल्यानें इकडे येऊन तुझ्या पायावर उभयतांनीं लोटांगणें घातलीं आणि तुझा आशीर्वाद मागितला.

आनंदीः—एवढेंचना ?

दादा०—पर्वतीच्या दर्शनाला पेशव्यांच्या घराण्यांतील स्त्रिया जातात, त्यावेळीं माझी सत्त्वस्थ व साध्वी रमा-खुद्द मराठा साम्राज्याच्या पंतप्रधानाची वायको तुला निघण्याला वेळ असल्यास तुझ्या करितां तिष्ठत उभी राहते, आणि तुझीच स्वारी पहिल्यानें निघेल अशी नेहमीं खबरदारी घेत असते.

आनंदीः—मग ?

दादा०—नारायणाच्या लग्नांत तरी निदान आतां दुःखी, दुबळी व दुर्दैवी असलेल्या पार्वतीस पहिला मान द्यावा, अशी गोपिकावहिनींची इच्छा आहे, असें दिसतांच तुझी खप्पा मर्जी होऊ नये म्हणून-आणि फक्त म्हणूनच तो मान तुलाच मिळाला पाहिजे, असें माधवानें मुद्दाम निक्षून सांगून खुद्द आपल्या या पुण्यांतल्या पुण्यांतच निघालेल्या मिरवणूकींत आणि केलेल्या दीपोत्सवांत पहिल्या हत्तीवरून सर्व शहरभर तूंच मोठ्या थाटामाटानें, तोऱ्यानें आणि ताठ्यानें मिरवलीस.

आनंदीः—मग काय ?

दादा०—सारांश, मानाच्या प्रत्येक बाबतींत, हुकमतीच्या प्रत्येक संबंधांत, वडिलकीच्या प्रत्येक मानांत, आचरणाच्या प्रत्येक कृतींत, फार तर काय, पण बोलण्यांतील प्रत्येक शब्दांतहि तुझ्या मनोवृत्ति न दुखवल्या जातील, अशी काळजी प्रत्येक जण, आणि राज्यकर्ता पेशवा तर प्रत्यक्षपणें घेत असतां त्याच्याशीं आम्ही भिन्नभाव ठेविल्यास जगाच्या दृष्टीनें व मानाच्या लाजेनें आपणच दोषी ठरूं, ह्या गोष्टीचा तूं नीटसा विचार केला आहेस काय ?

आनंदीः—वडिलकीचें नातें, आणि न्यायाची वडिलकी, नीतीचा मान व अब्रूची चाड, लौकिकाची काळजी व अधिकाराची निरिच्छा, ह्या सर्व गोष्टींचा

विचार करूनच आपल्याशीं आपला माधव वागला काय ? आपल्या हातून राज्य-सूत्रें काढून तीं स्वतःच्या हातीं घेण्याच्या मूळाशीं त्याचा उद्देश काय आहे, याचा आपण कधीं विचार केला आहे काय ? निव्वळ सद्धेतूनेंच प्रेरित होऊन त्यानें हें कृत्य केलें असें आपलें म्हणणें आहे काय ?

**दादा०**—अग, पेशवाईचीं सूत्रें माझ्याच हातीं नेहमीं कां रहावीं, आणि मी तरी नेहमींच तीं कां चालविण्याची हांव बाळगावी, हाहि प्रश्न विचारांत घेण्यासारखा नाहीं काय ?

**आनंदीः**—पण मी म्हणतें, या माधवाला तरी पेशवाईची इतकी हांव कां सुटावी? त्याचाच कां पेशव्यांच्या गादीवर हक्क चालावा? आमचा कां चालूं नये?

**दादा०**—आमचा कां चालूं नये ? पेशव्यांच्या घराण्यांत जन्मास येण्यामुळें जन्मा बरोबरच उत्पन्न होणारा पेशवाईचा हक्क माझ्या धाकट्या घराण्यांतील जन्मास येण्यानें मर्यादित झालेला असल्यामुळें, त्या घराण्यांतील कर्त्या पुरुषापेक्षां वडील घराण्यांतील कोंवळ्या पोराचाच वारसाईच्या दृष्टीनें पेशवाईवर अधिक हक्क पोहोंचतो, म्हणून; आणि ही धडधडीत गोष्ट तुला माहीत असूनहि तूं स्वतः अविचाराला प्रवृत्त होऊन मलाहि प्रवृत्त करतेस; काय म्हणावें वरें तुझ्या ह्या दुष्ट व दुराग्रही स्वभावाला !

**आनंदीः**—हें पहा साफ सांगतें; मला ह्या असल्या मिळमिळित सौभाग्याचा आतां अगदीं–अगदीं विट्ट येऊन गेला आहे ! हें मेलें भिजत घोंगडें फार दिवस तसेंच ठेवून आतां नाहीं चालायचें; करा बघूं आत्तांच्या आत्तां एक घाव नी दोन तुकडे कसे ते एकदांचे ! बोला, करतां कीं नाहीं ?

**दादा०**—आनंदी, मी तुला हात जोडतों, म्हणशील तर तुझ्या पांयाहि पडतों, पण हा अविचार तूं सोडून दे; श्रीमंतींतील सर्व ऐषाराम आणि मानमरातब बसल्या जागीं आयते आपणास मिळत आहेत, तेवढ्यावरच तूं संतुष्ट कां रहात नाहींस ?

**आनंदीः**—कां राहूं ?

**दादा०**—माझ्या वडिलांच्या अब्रूकरितां, बाजीरावसाहेबांच्या नांवलौकिका-करितां, आमच्या थोरल्या रावसाहेबांच्या दिगंत पसरलेल्या उज्वल कीर्ति-

करितां, ह्या दुर्दैवी पेशवाईकरितां, मराठा साम्राज्यांतील ह्या कमनशीब प्रजेकरितां, मला अंतरलेल्या माझ्या दुःखी नानासाहेबाकरितां, माझ्या पोरक्या माधवाकरितां, इतकेंच नाहीं तर प्रत्यक्ष या माझ्या पापमय मूर्तीकरितां, तुझ्या अंगांत संचरलेल्या ह्या भाऊबंदकीच्या भुताला तूं गाडून टाक! ( गहिंवरून ) आनंदी, नकोग नको तूं माझ्यावर अशी निष्ठुर होऊंस; येऊंदेग येऊंदे, तुला माझी अभाग्याची थोडीशी तरी दया. अशी रागावतेसग काय पदोपदीं!

**आनंदीः**—रागाऊ नको तर काय करूं? तुम्हीं कांहीं जरी म्हणालांत तरी माझें मुळीं सुद्धां समाधान होणार नाहीं बरें; पेशव्यांच्या वाड्यांतील एखाद्या आश्रितासारखें राहून दिल्या तुकड्याचे आणि मिळाल्या वस्त्राचे मालक आपण राहणार, का शनिवार वाड्याचे, या पुण्याचे, व या सबंध पेशवाईचे आपण धनी बनणार? श्राद्ध पक्ष झोडून दांतावर मारण्याला मिळालेल्या रुपेरी तुकड्यानें संतुष्ट होणाऱ्या, खांद्यावर पंचा आणि हातांत पंचपात्री असलेल्या भटाच्या पोटीं आपण जन्मास आलां नसून दख्खनची पेशवाई मिळविणाऱ्या तरवार बहाद्दर श्रीवर्धनकर भटाच्या कुळांत जन्मास आलेले आहांत, हें तुम्हीं विसरतां काय? समजलें हो समजलें माझ्यावर तुमचें कितीसें प्रेम आहे तें!

**दादा०**—आनंदी, तुझ्या प्रेमाचा आनंद मला नेहमीं मिळत असावा, म्हणून मी आजपर्यंत आपली पराकाष्ठा केली; तुझ्या प्रेमानें वेडावून गेल्यामुळें मी आजपर्यंत अहोरात्र तुझ्याकरितां सारखा झटत राहिलों; तुझ्या सुंदर स्वरूपाला बळी पडून स्वतःच्या वर्तनाची दिशा तुझ्या इच्छेच्या अनुरोधानें मी आजपर्यंत ठरवित राहिलों; एखाद्या नाकांत वेसण घातलेल्या जनावराप्रमाणें तूं मला जिकडे जिकडे फिरविशील, तिकडे तिकडे निव्वळ तुझ्या इच्छेला मान देण्याकरितांच मी आजपर्यंत फिरत आलों; एखादा जादूगार आपल्या मंतरलेल्या काठीनें जसा एखाद्या सैतानाला नाचवितो, तसेंच तुझ्या प्रेमाखातर तुझ्या प्रत्येक नेत्रकटाक्षाबरोबर तुझ्या सौंदर्यानें भारला जाऊन आजपर्यंत मी एकसारखा नाचत आलों.

**आनंदीः**—म्हणजे, आपण माझ्या करितां काय केलेंत?

**दादा०**—स्वतःच्या इच्छा, स्वतःच्या आकांक्षा, स्वतःचा मानमरातब, स्वतःची इभ्रत–इज्जत, आचारविचार, आणि सुखशांति या सर्वांची, तुझ्याकरितां--निव्वळ तुझी मर्जी सांभाळण्याकरितां, मी आजपर्यंत फारकत करीत

आलों; पण असें असूनहि त्याचा मोबदला मला तुझ्याकडून अशा तिरस्करणीय रीतीनेंच मिळावा, असाच जर माझ्या नशिवाचा योगायोग असला तर त्याला तूं तरी काय करशील ?

**आनंदी:**—कशाला वरें ही असली साखर पेरतां! तुमच्या ह्या अशा मानभावी बोलण्याला मी भीक घालीन असें तुम्हाला वाटतें काय ? आपल्या ह्या असल्या कांगाव्यानें मी माझा हेका सोडीन असें का तुमचें मत आहे ? एखाद्या मेषपात्रा-प्रमाणें आपण अश्रु ढाळीत माझ्या पाया पडलांत तरी मी आपला हेका सोडण्या-इतकी भावडी आहें, असा का आपला समज आहे ? नाहीं, नाहीं, तें कांहीं नाहीं. बोला, माधवाला कैद करून स्वतः पेशवे होण्याचा पुन्हां प्रयत्न करतां का नाहीं तें ?

**दादा॰**—आनंदी, हें तूं शुद्धीवर बोलत आहेस, का पेशवाई मिळवि-ण्याच्या धुंदीच्या दारूंत बडबडत आहेस ? एकदां ठेंच लागल्यावरहि शुद्धीवर न येतां पुन्हां कुमार्गाकडे धांव घेणें, हें माणुसकीचें लक्षण आहे काय ? आजपर्यंत तुझ्या नादानें झाली तेवढी शोभा कमीच का आहे ? मागचा पुढचा विचार कर, शुद्धीवर ये; उन्मादवायूंत हवें तें बरळत सुटूं नकोस; आज मन घट्ट करून त्याला सन्मार्गाकडे वळीव, म्हणजे उद्याचा दिवस आपोआपच हलका जाईल; आणि अशा रीतीनें सुबुद्धीनें सुविचार करण्याकडे तुझ्या मनाची प्रवृत्ति वाढत गेली म्हणजे असल्या क्षुद्र आणि स्वार्थी अविचारांना संचार करण्याला तुझ्या अंतःकरणांत मुळीं जागाच राहणार नाहीं.

**आनंदी:**—श्रीवर्धनकर भटाच्या घराण्यांत पुण्याची पेशवाई येण्याला असलाच आळणी वेदांत कारणीभूत झाला असेल नाहीं ? आपला प्रयत्न फसला म्हणून तो अजीबात सोडून देणें, हें दुबळेपणाचें लक्षण नाहीं काय ?

**दादा॰**—अलबत आहे, पण केव्हां ?

**आनंदी:**—केव्हां ?

**दादा॰**—सत्पक्ष असेल तेव्हां; आपला सत्पक्ष नाहीं, हें मला माहीत असूनहि मी तुझ्या उठावणीला बळी पडून नाइलाजानें माधवाच्या विरुद्ध भोंसले व निझाम यांचेकडेस कारस्थानें केलीं, पण तीं उलट माझ्याच अंगावर आलीं; इतकेंच नाहीं, पण त्या संबंधांचा सर्व पत्रव्यवहारहि माधवाच्या हातीं नुकताच

आला असून या सर्व भानगडी कायमच्या निकालांत आणाव्या, म्हणून त्याच्या तर्फे नाना आणि बापू हे आजच आपणाशीं वाटाघाट करण्याकरितां येणार आहेत. शिवाय, आपलें सर्व अपराध विसरून तो आपला मानमरातबहि पूर्वीसारखाच ठेवणार असल्याचें ऐकिवांत आहे. आनंदी ! पेशव्यांच्या वडील घराण्यानें आमच्याशीं वागतांना आपल्या मनाचा किती उदारपणा आजपर्यंत नेहमीं दाखविलेला आहे, ह्याचा तरी निदान तूं आपल्या मनाशीं कधीं शांतपणानें विचार केला आहेस काय ?

**आनंदी:**—मला विचार करण्याची इच्छा नाहीं, आणि जरुरीहि नाहीं.

**दादा०**—असें म्हणूं नकोस; आनंदी असें म्हणूं नकोस. विचार कर; विचार कर. आनंदी, पुन्हा सांगतों, शांतपणें विचार कर आणि ह्या राक्षसी वासनेच्या घातक चक्रांतून आपली सुटका करून घे. अजूनहि आपण आनंदांत व सुखांत रहावें, अशी परमेश्वराची कृपेची इच्छा आहे. आनंदी, अग आनंदी, नकोग ह्या ईश्वरी इच्छेच्या आड येऊंस ! हें बघ, एकदां का आभाळ फाटलें म्हणजे नाहीं बरें त्याला ठिगळ देतां येणार; म्हणून म्हणतों आनंदी, विचार कर, विचार कर पुन्हां एकदां !

**आनंदी:**—मला विचार करण्याची इच्छा नाहीं आणि जरुरीहि नाहीं.

**दादा०**—आनंदी, पुन्हां विचार कर अशी मी तुला विनंति करतों.

**आनंदी:**—केला आहे, केला आहे बरें मी सगळा विचार केला आहे; एकदांच काय तो करून ठेवला आहे कायमचा ! आम्ही या माधवाचे मुळीं अपराधच केले नाहींत, तर तो ते विसरतो कोठचे, आणि माफी करतो कशाची ? आम्ही आपला पक्ष प्रबळ करूं.

**दादा**—आपला पक्ष प्रबळ होणार नाहीं.

**आनंदी:**—शिंदे होळकर तर आपल्या पक्षाचे आहेत ना ?

**दादा०**—नाहीं.

**आनंदी:**—कानडे व फडके तरी ?

**दादा०**—नाहीं.

**आनंदी:**—रास्ते व पटवर्धन तरी निदान ?

**दादा०**—नाहीं.

**आनंदी:**—म्हणजे ?

**दादा०**—म्हणजे कोणी नाहीं. आपल्या पक्षाचें कोणी नाहीं, आणि आपल्या हक्काचें कोणी समर्थनहि करणार नाहीं. आनंदी, तुला मात्र निव्वळ भ्रम आहे बरें भ्रम ! आपल्या पक्षाचें कोणीहि नाहीं, आणि आपल्या पक्षाकडे कोणी वळणारहि नाहीं. माधवाच्या पक्षालाच सर्व चिकटून राहतील आणि दरेक प्रसंगीं सर्वजण त्यालाच मदत करतील.

**आनंदी**:—( रागानें ) करा, करा म्हणावें मेल्यानों, त्यालाच मदत करा. उद्या हा माधव मेला म्हणजे तर यालना सर्वजण कुत्र्यासारखे जिभल्या चाटीत आमच्याच पायाशीं !

**दादा०**—आनंदी, माझ्या माधवासंबंधीं तूं कांग अशीं अभद्र भाषणें बोलतेस ?

**आनंदी**:—बोलेन.

**दादा०**—( रागानें ) लाज नाहीं वाटत तुला थोडीशी सुद्धां असले अमंगळ-शब्द उच्चारण्याला ? तुझ्यासारख्या कुलकलंक आणि कुलांगार स्त्रीची कशाहि रीतीनें समजूत करूं म्हटलें तरी ती थोडीच होणार ? ( ओरडून ) माधवाच्या मृत्यूनंतर सुद्धां पेशवाईचा वारसा आपणाकडे येणार नाहीं, समजलीस ?

**आनंदी**:—( संतापानें ) कां नाहीं येणार ? माधवाच्या मृत्यूनंतर पेशवाईच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या त्या एकुलत्या एक वारसदार काटर्याचा-त्या संतानहिन नारायणाचा खून-खून करून सुद्धां पेशवाईचा वारसा आमच्याकडेस येणार नाहीं काय ?

**दादा०**—( दुःखानें पण रागांत ) हरहर ! आनंदी, आग लागो तुझ्या ह्या तोंडाला ! पुरे-मला आतां या बावतींत तुझा एक शब्दहि ऐकण्याची इच्छा नाहीं, आणि तूं आतां कांहींहि म्हणालीस तरी यापुढें मी माधवाच्या विरुद्ध बिलकुल कारस्थान करणार नाहीं, समजलीस ?

**आनंदी**:—आपल्या-आपल्याकरितांच बरें माझी ही सारी धडपड; आणि त्या-बद्दल बक्षीस काय तर म्हणे ही अशी शोभा ! ( रडूं लागते व लांब जाऊन उभी राहते.)

**दादा०**—( उठून तिच्या जवळ जाऊन ) आनंदी, ये, अशी माझ्या जवळ येऊन बैस. ( उभयतां बसतात. ) आनंदी, डोळे पूस; तुला हें असें

डोळ्यांतून पाणी काढतांना पाहिलें म्हणजे किं नाहीं, माझा निश्चय कसा पार डळमळूं लागतो; तुला ही एखाद्या अनाथ अवलेसारखी अशी अश्रु ढाळतांना पाहिली म्हणजे एखाद्या अट्टल दारुवाजाप्रमाणें माझ्या मनोवृत्ति पुन्हां उचल खाऊं लागतात; तुझ्या डोळ्यांतून जोरानें वाहणाऱ्या धवधव्याच्या प्रचंड वेगानें माझें मन पुन्हां पुन्हां हेलकावे खाऊं लागतें; तुझ्यासारखी ही मूर्तिमंत प्रेमाची पुतळी दुःखी कष्टी झालेली मी पाहिली म्हणजे तुझ्या संबंधीच्या माझ्या वागणुकीतील हट्टीपणाच्या चुकीवद्दल मला पश्चात्ताप होऊं लागतो ! ( तिच्या तोंडावरून हात फिरवीत ) माझ्या ह्या सौंदर्यठेव्याकरितां, माझ्या ह्या प्रेममय मूर्तीकरितां, माझ्या ह्या अखंड आवडीच्या आणि अक्षय जिवाच्या आनंदीकरितां, माझ्या ह्या लाडक्या सौख्यनिधानाकरितां, आणि ह्या—ह्या माझ्या प्रिय पंचप्राणाकरितां मी—मी काय पाहिजे तें करण्यास तयार आहें, पण आनंदी—

**आनंदीः**—काय ?

**दादा०**—माझ्या भविष्य काळच्या श्रेष्ठ व श्रेयस्कर कर्तव्यापासून तूं मला पराङ्मुख करूं नकोस, एवढेंच माझें तुझ्याजवळ पदर पसरून मागणें आहे. माधवाला कैद करण्याची गोष्ट तर राहोच, पण त्याच्या केंसालाहि धक्का न लागतां तुझे उद्दिष्ट हेतु मला तडीस नेतां येतील, अशी एखादी युक्ति जुक्ती काढतां येईल का तुला आपल्या विशाळ डोक्यांतून ?

**आनंदीः**—( विचार करून ) वरें, असें केलें तर नाहीं का चालणार ? मी म्हणतें, "पेशव्यांच्या गादीवर माधवानें रहावें, पण पेशवाईचीं अधिकारसूत्रें त्यानें प्रमुखत्वानें आपलेंच मत व मदत घेऊन चालवावीं" ही अट पुढें ठेवून, या अटीवरच मी पेशव्याच्या वडील घराण्याशीं दिलजमाई करण्यास तयार आहें, असें निक्षून सांगून नाहीं कां आपणाला माझ्या मनासारखें करतां येणार !

**दादा०**—मला वाटतें हीहि गोष्टसुद्धां माधव ऐकणार नाहीं. तरी पण तुझ्या करितां मी एवढा हेका धरण्यास तयार आहें. मग तर झालें ना तुझ्या मना सारखें ? आनंदी, अग आनंदी, आतां तर गेलाना तुझा सगळा राग ?

**आनंदी**—पण नाना—वापूंशीं अथवा खुद्द माधवाशींहि वोलतांना प्रसंगीं नाइलाजानें हातांत शस्त्र घ्यावें लागलें तरी वेहेत्तर, पण अंगीकृत कार्यापासून मी केव्हांहि परावृत्त होणार नाहीं, असें त्यांच्या मनांत पूर्णपणें ठसवा.

**दादा०**—आणखी ?

**आनंदी:**—भाऊबंदांतील खाजगी वांटणीसारखा राज्याच्या वांटणीचा वांटा-हिस्सा मी हक्क म्हणून मागत नाहीं, पण आजपर्यंत साम्राज्याच्या वाहतुकींत मी प्रमुखत्वानें मदत व मेहनत केली असल्यामुळें ओघा-ओघानेंच उत्पन्न होणारा वहिवाटीचा वांटाहिस्सा मी हक्कइनसाफ म्हणून मागत आहें, अशी त्यांची स्पष्ट समजूत घाला.

**दादा०**—आणखी कांहीं ?

**आनंदी:**—पानपतच्या ठोकरीनें कच खाऊन प्राण सोडणाऱ्या माजी पेशव्यानें सुद्धां अखेरच्या वेळीं " मलाहि राज्याच्या वहिवाटींतील हक्क मिळावा " अशी इच्छा दर्शविली केलीं होती, या श्रद्धा उत्पन्न करणाऱ्या वेगडी कांगाव्याचें दुःखाच्या अविर्भावांत प्रदर्शन करा.

**दादा०**—आणखी कांहीं अधिक ?

**आनंदी:**—आणि–आणि इतकेंहि करून नत्र साधलें, तर तुम्हास नको असली तरी माझ्याकरितां, माझ्या भावी भरारीकरितां, आपल्या भावी माधवाकरितां, प्रसंगीं प्राणाचे बळी द्यावें लागले तरी देईन–आणि घ्यावे लागले तरी घेईन--पण अखेर पेशवाई मिळवीन, अशा दृढ निश्चयानें भावी प्रयत्नाची दिशा रेखाटून त्या प्रमाणें आपलें वर्तन ठेवण्यांत यत्किंचितहि दया माया दाखवूं नका; आणि स्पष्टच बोलावयाचें म्हणजे मी पुन्हां पुन्हां आपणाला बजावून सांगतें, कीं साध्या नाहीं–तर सक्तीच्या रीतीनें आणि सोप्या नाहीं तर सायासाच्या मार्गानें हा माधव मेल्यावर पेशवाईच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या त्या पोरसवदा कार्ट्याचा–त्या निसंतान वारसदार नारायणाचा खून करून तरी निदान आम्ही या पुण्याचे पेशवे खास होणार, होणार, होणार ! ( पडदा पडतो. )

**अंक पहिला समाप्त.**

# प्रवेश ] अंक दुसरा [ पहिला.

—:o:—

( दादासाहेव मध्यें वसले आहेत व त्यांच्या डाव्या बाजूस नाना आणि उजव्या बाजूस बापू बसलेले आहेत असा पडदा उघडतो. )

**दादा०**—बापू, तुम्ही सुद्धां असेंच म्हणावें, हें आश्चर्य नाहीं काय ? आपल्या म्हणण्याचा तुम्हींच पुन्हां एकदां शांतपणानें विचार कराल काय ?

**बापूः**—आपण जर सर्व गोष्टींचा विचार करून पाहिला तर माझेंच म्हणणें सयुक्तिक आहे अशी आपली खात्री होईल.

**नानाः**—आपली खात्री होईल इतकेंच नाहीं, पण आपला दुराग्रह सोडून आपण श्रीमंत रावसाहेवांच्या विनंतीस मानहि द्याल.

**बापूः**—म्हणूनच दादासाहेव मी म्हणतों, आपण आपला दुराग्रह सोडा; पेशव्यांच्या घराण्यांतील एकंदर मंडळीवद्दल मला अभिमान असला तरीहि माझ्या मनाचा ओढा प्रथमपासून आपणाकडेसच विशेष आहे, हें मी बोलून दाखवावयास पाहिजे असें नाहीं; पण हल्लीच्या एकंदर वातावरणावरून आपण आपलाच दुराग्रह पुढें चालू ठेवणें इष्ट नाहीं, आणि तो तसाच हट्टानें पुढें चालू ठेवल्यास त्याचा परिणामसुद्धां केव्हांहि चांगला होणार नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री आहे.

**दादा०**—बापू, माझ्यासंबंधींच्या तुमच्या वागणुकीवद्दल मला संशय आल्यामुळें मी तुम्हास दूषण दिलें असें नका बरें समजूं ? पण तुम्हींच सांगा, मी या माधवाचा असा कोणता घोर अपराध केला कीं, त्यामुळें दरबारस्थानाच्या भिंतीवरहि माझी सावली पडूं नये, अशी त्यानें तजवीज केली ? नाना, तुम्ही तरी दाखवूं शकाल काय, माझे असे कोणते घोर अपराध आहेत ते ?

**नानाः**—दादासाहेव, श्रीमंत माधवरावसाहेवांनीं " झाल्या गेल्या सर्व गोष्टी विसरून मी आपला इतमाम, व मानमरातव पूर्ववत् ठेवीत जाईन, " अशी ज्याअर्थी आपली खातरजमा केली आहे, त्याअर्थी आपणहि गतगोष्टीवद्दल वाटाघाट करण्याचें सोडून, त्यांच्या इच्छेस मान द्यावा, एवढीच विनंति करण्याकरितां मी आपणाकडेस आलेलों आहें.

**दादा०**—नाना, माझ्या प्रश्नाचें सरळ उत्तर न देतां माधवाच्या इच्छेस मान तुकविण्यास तुम्ही मला सांगतां, हें बरोबर आहे काय ? मी माधवाचे—तुमच्या धाकट्या रावसाहेबाचे काय अपराध केले आहेत ते मला कळावें, त्या बाबतींत माझी बाजू पुढें मांडण्याची मला पूर्ण संधी मिळावी, आणि त्यानंतर कोणकोणत्या अटींवर पेशव्याच्या इच्छेस मान देण्यास मी तयार व्हावें, याची साधकबाधक प्रमाणानें चर्चा व्हावी, हा सरळ मार्ग नाहीं काय ?

**नानाः**—ह्या वेळीं हा सरळ मार्ग नाहीं.

**दादा०**—कां नाहीं ? परस्परांमधील मतभेदानें व गैरसमजानें पडलेली मानापमानाची खोल जखम त्यांच्या कारणाची मीमांसा केल्याशिवाय नुसत्या " पंतप्रधानाच्या इच्छेस मान द्या, " ह्या चालचलाऊ पट्टीनें कशी भरून निघणार ? तुम्हाला तरी वाटतें काय नाना, भरून निघेल म्हणून ?

**नानाः**—नाहीं, मलाहि वाटत नाहीं; पण कोळसा कितीहि उगाळला तरी तो काळाच राहणार; मग तो उगाळीत बसण्यांत तरी अर्थ कोणता ?

**दादा०**—भूतकालांतील गोष्टींची बरींवाईट फळें हल्लीं आपण भोगीत असून आपल्या वर्तमानकाळाच्या आचरणाचे परिणाम आपणास भविष्यकाळीं भोगावे लागतील, हें मनांत आणून त्यावर विचार करण्याची इच्छा होणें, हा फायदा नाहीं काय ? नाना, दाखवा, दाखवा माझे काय अपराध आहेत ते ?

**नानाः**—श्रीमंत माधवरावसाहेबांनीं आपणांकडून काढून घेतलेलीं राज्यसूत्रें पुन्हां आपल्या हातांत यावीं, याबद्दल आपण खुद्द पुण्यांतल्या पुण्यांतच दुफळी उत्पन्न करण्याची पराकाष्ठा केलीत; पण गादीशीं एकनिष्ठ असलेली घरंदाज मंडळी जेव्हां आपल्या पक्षाकडे वळत नाहीं, अशी आपली खात्री झाली, तेव्हां आपण पूर्वापार चालत आलेली परंपरा, जनसांप्रदाय आणि लौकिकआचरण, यांना झुगारून देऊन पुण्याच्या बाहेर कारस्थानें करण्यास सुरुवात केलीत; आणि नुकत्याच हातीं आलेल्या पत्रव्यवहारावरून असें सिद्ध झालें आहे कीं, भोंसले व निझाम या जोडगोळीची मदत घेऊन तिनें राज्यकर्त्या पेशव्याचा मस्तकभेद करावा, असा आपण घाट घातलांत; श्रीमंतांच्या आज्ञेवरून मी आपणास विचारतों कीं, हे नाहींत का आपले अपराध ?

**दादा०**—नाना, माधवाच्या प्रेमानें आंधळे झाल्यामुळें दोन्हीं बाजूंनीं समतोल विचार करण्याची तुमची बुद्धि साफ नष्ट झाली यांत आश्चर्य तें कसलें ? तुमच्या म्हणण्याप्रमाणेंच कां होईना, मी माधवाचे घोर अपराध केले आहेत, पण माझ्या हातून तसें वर्तन होण्याला त्याची तशी कृतीच कारणीभूत झाली नाहीं काय ?

**नाना**:—नाहीं, दादासाहेब नाहीं; आपली अन्यायी व अनिवार अधिकार-तृष्णाच कारणीभूत झाली.

**दादा०**—नाना, पेशवाईतील एकाहि जबाबदार व्यक्तीच्या सहानुभूतीचा दुजोरा मला मिळूं नये, म्हणून माधवाच्या हितचिंतकांनीं, तुम्ही व प्रत्यक्ष त्यानेंहि आजपर्यंत किती धडपड केली ? माझ्या पक्षाच्या व माझ्याकरितां झटणाऱ्या ह्या आमच्या बापूंना कांगावीकळवळा दाखवून माझ्या पक्षांतून कोणी फोडिलें ? माझा पक्ष पार नामशेष व्हावा, म्हणून पेशवाईतील प्रत्येक कर्त्या व्यक्तीवर कधीं लांचाचा, तर कधीं लाथाचा प्रयोग कोणीं केला ? राघोबाच्या हातीं पेशवाईची अधिकारसूत्रें राहिल्यास दौलतीला अपाय होईल, असें लोकमत तयार करण्या-करितां भाडोत्री भुतांचें घोळकें कोणी उत्पन्न केलें ? "साम्राज्याचें संरक्षण" ह्या सोज्वळ नांवाखालीं हवा तसा धुडगुस घालून पेशव्यांच्या धाकट्या घराण्यास आणि त्या घराण्याशीं घरोबा ठेवणाऱ्या व्यक्तीस पायबंद लावण्याचा अथवा नेस्तनाबूद करण्याचा मनसुबा कोणीं घडवून आणला ? तुम्हीं तेवढे हवे तसे ढंग करावेत, आणि मी मात्र मूग गिळीत एखाद्या शिखंडीसारखें स्वस्थ बसावें, हाचना तुमच्या म्हणण्याचा भावार्थ ?

**नाना**:—उभयतां श्रीमंतांमधील ह्या मतभेदाच्या भानगडींत भाग घेण्याच्या उद्देशानें मी आपणाकडेस आज आलेलों नसून श्रीमंत धाकट्या रावसाहेबांची इच्छा त्यांच्याच शब्दांत आपणांस कळवावी, ह्या विशिष्ट हेतूनें आलेलों आहें. दादासाहेब, मी पुन्हां आपणास विनंति करतों कीं, आपण श्रीमंत माधवराव साहेबांच्या इच्छेस मान द्या, आणि पेशवाईतील चालू गृहकलहाच्या ह्या लवचिक रोपाचा भविष्यकाळीं ताठर विषवृक्ष बनण्यापूर्वींच त्याची कायमची विल्हेवाट लावा.

दादा०—नाना, प्रत्येक गोष्टींत मीच का या माधवाच्या शब्दाला मान वांकवावी ? दरेक बाबतींत त्याचाच का आमच्यावर शह असावा ? हरेक प्रसंगीं त्याचाच का आम्हावर पगडा रहावा ? त्याच्या शब्दास मी नेहमीं मान द्यावा, त्यानें माझा मान लक्षांत न घेतां मला नेहमीं दावीत असावें, आणि तुमच्या-सारख्या त्याच्या दोस्तभगतांनीं त्याच्या असल्या हीन व हिडिस कृतीवर विनंतीच्या नांवाखालीं सौजन्याचें गोजिरवाणें पांघरुण घालावें, हे मुत्सद्दगिरीचे डांवपेंच न समजण्यासारखा तुम्हा सर्वांनां वाटतें, इतका कांहीं मी खरोखरीच भोळा नाहीं; समजलांत का नाना ?

नानाः—श्रीमंत माधवरावसाहेबांनीं आपणासंबंधीं आजपर्यंत योजिलेले सर्व उपाय जगाला वाटतें, अथवा जगाला कित्येक वेळां दाखवितां तितके खरो-खरीच आपण भोळे नाहीं, अशी त्यांची खात्री झाल्यामुळेंच त्यांनीं योजिलेले असून पुढेंहि प्रसंग पडल्यास याहून अधिक कडक उपाय योजण्याची त्यांची तयारी आहे.

दादासा०—नाना, फडणविशीच्या धुंदींत कोणाला धमकी देतां ? पेशवाईची सूत्रें तुमच्या हातीं आलीं नसूनहि औट घटकेंत अधिकारदारूच्या एकाच घोंटानें आलेल्या उन्मादाच्या धुंदींत मर्मभेदक भाषणें कोणाला बोलतां ? माधवाच्या हांजी हांजीनें त्याला बदसल्ला देऊन मिळणाऱ्या तुकड्याच्या जोरावर पेशव्यांच्या–साम्राज्यांतील पंतप्रधानाच्या–धाकट्या घराण्याचा उपमर्द करण्यास तुम्ही नेहमीं चटावला आहांत, नाहीं ? ठीक आहे; पाहून घेईन तुम्हालाहि वेळ येईल तेव्हां !

बापूः—दादासाहेब, मी मधेंच बोलतों, याबद्दल माफी असावी. पण बिचाऱ्या नानांचा या बाबतींत बिलकुल दोष नाहीं, अशी माझी खात्री आहे. श्रीमंत माधवरावसाहेब पेशव्यांच्या आज्ञेबाहेर ते एक शब्दहि बोलले नाहींत, इतकेंच नाहीं तर दरबारांत मीं हजर होतों, त्यावरून सांगतों कीं, निव्वळ आपलें मन दुखवूं नये म्हणूनच त्यांनीं श्रीमंतांचा स्पष्ट निरोपहि आपणांस सांगितला नाहीं. दादासाहेब, सेवावृत्ति मोठी कठीण असते; इकडे रावसाहेबांची इच्छा स्पष्ट शब्दांनीं आपणास सांगितल्याशिवाय गत्यंतर नाहीं; आणि तिकडे आपल्या मनो-वृत्ति दुखावतील म्हणून स्पष्ट शब्दांत सांगण्याचीहि सोय नाहीं; अशा स्थितींत प्रत्यक्ष आपणहि नानाच्या जागीं असतां तर काय केलें असतें ? नाना बोलतात

तें स्पष्ट शब्दांत बोलतात म्हणून रागावण्याऐवजीं ते बोलतात तें स्पष्ट शब्दांत बोलत नाहींत म्हणून आपण रागावल्यास आपलें तें रागावणें कांहीं सयुक्तिक तरी दिसेल. नाना, तुम्ही कां गप्प बसलांत ?

**नाना:**—( बापूकडे वळून ) बापू, श्रीमंत दादासाहेबांचा अपमान करण्याच्या दुष्ट इच्छेनें मी येथें आलों नसून उभयतां श्रीमंतांमध्यें सलोखा घडवून आणण्याच्या शुद्ध हेतूनें आलेलों असल्यानें दादासाहेबांनीं केलेला अपमान सोसूनहि माझ्या इच्छेला गोड फळें आलीं तर मी आपणास खरोखर कृतार्थ झालों, असेंच समजेन ! ( दादासाहेबांकडे वळून ) दादासाहेब, ज्या मतभेदांमुळें पेशव्यांच्या घराण्यांत भाऊबंदकी उत्पन्न झाली, आणि ज्या गोष्टी आपसांतील वैरभाव वाढीस लावण्यास कारणीभूत झाल्या त्या सर्व मतभेदांनां व गोष्टींनां आगीचें खत न घालतां आळा घाला. झाल्या गेल्या सर्व गोष्टी विसरून जा. श्रीमंतांनीं आपणास ही जी शेवटची संधि दिली आहे, तिचा योग्य तो फायदा करून घ्या; आणि त्यांच्या इच्छेला मान देऊन, ह्या साम्राज्याचा गाडा सुरळीत चालण्यास आपणास मदत करावयाची नसेल तर करूं नका; पण तो मोडून पडावा म्हणून तरी निदान प्रयत्न करूं नका, अशी मी आपणाजवळ पदर पसरून भिक्षा मागतों.

**दादा०**—नाना, तुमच्या मदतीनें व बापूंच्या मध्यस्थीनें माधवाच्या इच्छेस मान देण्यास मी तयार आहे, परंतु मानापमानाच्या दृष्टीनें जर त्यामुळें मला कमीपणा येण्यासारखा असेल, तर मात्र मी त्याच्याच काय, पण प्रत्यक्ष माझ्या स्वतःच्याहि इच्छेप्रमाणें वर्तन करण्यास तयार नाहीं. नाना, चालूं द्या तुमची शिष्टाई; थांबलांत कां व कशाला ?

**नाना:**—श्रीमंतांची अशी इच्छा व विनंति आहे कीं, "आपण यापुढें दौलतीविरुद्ध कोणतेंहि कारस्थान अगर फंदफितूरी करूं नये; पेशवाईचा अभिलाप धरूं नये, आणि तसा अभिलाप धरलांत तरीहि वाटेल ते होवो, आपल्या हातीं पेशवाईचीं राज्यसूत्रें मी केव्हांहि जाऊं देणार नाहीं, अथवा मी होऊन तीं तुमच्या हातीं देणारहि नाहीं, हें आपण पूर्णपणें लक्षांत ठेवावें. आपण सांगाल तितक्या योग्य रकमेची आपणास नेमणूक करून देण्यांत येईल, आणि आज्ञा कराल त्या ठिकाणीं आपली राहण्याची तजवीज करून आपले खाजगी संबंधांतील सर्व योग्य मानमरातब व इतमाम पूर्णपणें ठेवण्यांत येतील." दादासाहेब,

या बावतींत वाटल्यास आपण बापूंचा सल्ला घ्या; आणि आपलें काय म्हणणें आहे, तें श्रीमंतांच्या चरणीं सादर करण्यास मला सरळ, स्पष्ट आणि सभ्य शब्दांनीं कळविण्याची मेहरबानीनें तसदी घ्या.

**दादा०**—नाना, हा माधव माझ्या मनोवृत्तीवर अपमानाची आणखीं किती पुटें चढविणार ? मानहानीची परमावधि होण्यांत आतां काय बाकी उरली आहे ? जगाच्या दृष्टीनें मला कोडगा, कमकुवत आणि नादान ठरविण्याची आपली पराकाष्ठा करण्यांत त्यानें आतां काय न्यून ठेविलें आहे? अशा रीतीनें माझीं नखें काढून घेतल्यावर मानमरातबाच्या ह्या नेभळ्या आणि निस्तेज सुखाला चाटीत बसण्यानें माझें कसें समाधान होणार ? नाहीं; नाना नाहीं; माधवाची ही विनंति मला बिलकुल मान्य नाहीं; बापू, ऐकलेंत का ह्या अर्ध्या शहाण्या नानांचें भाषण आणि कळला का त्या दीडशहाण्या माधवाचा कावा ?

**बापू**;—दादासाहेब, प्रसंग पाहून आपल्या वर्तनाची दिशा बदलण्यांत जरी पुष्कळ वेळां अपमान सोसावे लागतात, तरीहि त्यामुळेंच बहुधा पुष्कळ वेळां अनर्थाच्या आपत्ति टळतात, असा अनुभव आहे. प्रसंग पाहून वागणारा मनुष्य नेहमींच शहाणा म्हणविला जातो; शारीरिक अथवा सांपत्तिक घस सोसावी न लागतां, हेकेखोर मनुष्याप्रमाणें पदोपदीं तोंडघशीं पडण्याचा त्यास प्रसंग येत नाहीं. हाडाचा हट्टी नसलेला मनुष्य केव्हांहि "क्षमस्व" म्हणून मोकळा होतो पण हट्टी हाडामासाचा मनुष्य नेहमींच हालआपत्ति भोगीत राहतो, आणि त्यामुळें अपमान सहन करण्याच्या सवईनें–मनाच्या दृष्टीनें आपण म्हणतां त्याप्रमाणें जरी कदाचित् कोडगेपणा वाटला तरी, शांतताप्रिय जनतेच्या दृष्टीनें तोच आदरणीय झाल्यावांचून रहात नाहीं, असा नियम आहे.

**दादा०**—म्हणजे ?

**बापू**:—म्हणजे, स्पष्टच सांगावयाचें तर, चालत्या गाड्याला खीळ घालणें हितावह नाहीं; तसें वागण्याचा हा काळ नाहीं, ही वेळ नाहीं, आणि ही परिस्थितिहि नाहीं. अधिकारप्राप्तिसंबंधींच्या आपल्या चालू खटपटींत व कारस्थानांत आपण माघार घेऊन "हरि हरि" म्हणत स्वस्थ बसा, असा आग्रह करण्यांत मी केव्हांहि सर्वांत अत्यंत शेवटचा मनुष्य आहे. पण रावसाहेब पेशव्यांच्या पक्षाला सत्तेचा आधार असून त्याला सहानुभूतीचा दजोरा आहे; मराठा साम्राज्याच्या तख्ताला

तरवारीचा आधार असून त्याला जंगी तोफखान्याचें पाठवळ आहे, आणि साम्राज्यांतील, पेशवाईतील, अथवा पेशव्यांच्या खानगी तैनातींतील फुटकी कवडीहि आपल्या कपाळीं मारण्यास न देतां आपणास "अन्न अन्न" करीत देशोधडीला लावण्याइतकी धाकट्या रावसाहेबांची सद्दी आज जोरांत आहे, ही गोष्टहि त्याबरोबरच विचारांत घेणें भाग आहे; म्हणून म्हणतों, दादासाहेब, अर्धी सोडून सगळ्याच्या पाठीमागें धांवत सुटण्यांत फायदा काय? दररोज "नवा फांसा नवा डाव," असे खेळ करीत राहण्यांत अर्थ काय ? आज मिळतें आहे, तें तर पदरांत पाडून घ्या आधीं.

**दादा०**—बापू, पेशवाईचें वैभव—

**बापू:**—पेशवाईचें वैभव कांटेरी असल्यानें तें आपणाला मिळतां येणार नाहीं, कदाचित मिळलेंत तरीं पचनीं पडणार नाहीं, आणि पचनीं पडलें असें वाटलें, तरी तें फार वेळ न टिकतां आंतडीं फोडून बाहेर निघाल्याशिवाय रहावयाचें नाहीं.

**दादा०**—मग ?

**बापू:**—मग आपल्या मनाचा थोरपणा न दाखवितां दुराग्रहाच्या दोरीला भलत्याच वेळीं ताण देऊन उलट स्वतःलाच गळफांस लावून घेण्यांत फायदा काय ? दादासाहेब, दिव्यावर झडप घालण्याच्या ह्या अट्टाहासानें आपलेंच आंग भाजेल, आणि आपण कितीहि धडपड केलीत तरी हल्लींच्या पटाइत पंतप्रधानापुढेंच आपणास वांकावें लागेल.

**दादा०**—नाहीं, बापू नाहीं; मी मोडेन पण वांकणार नाहीं.

**बापू:**—मी पुन्हां सांगतों, कीं, आपणास श्रीमंत रावसाहेब पेशव्यांपुढें वांकावेंच लागेल.

**दादा०**—नाहीं. मी कधींहि वांकणार नाहीं. माधव हें कालचें पोर; तो आपल्या मनांत काय समजतो आहे ? पानपतच्या लढाईपर्यंत साम्राज्याचा दरारा, दौलतीची अब्रू, आणि पेशव्यांची पेशवाई माझ्या—माझ्याच समशेरीनें कायम ठेविली आहे. बापू !

**बापू:**—दादासाहेब !

**दादा०**—नानासाहेब, अदूरदर्शीपणानें न वागतां त्यांनीं योग्य धोरण ठेवून जर मला पानपतच्या मुकाबल्याला पाठविलें असतें—उदगीरच्या एकाच

उथळ लढाईतील जयामुळें भुराळला जाऊन आकाशाशीं टक्कर देऊं पाहणाऱ्या भाऊऐवजीं पानपतच्या अस्मानी सुलतानी रणकंदनाची कामगिरी जर माजी पेशव्यानें माझ्यावरच सोंपविली असती, तर झाला त्याहून पुष्कळच निराळा परिणाम झाला असता; निदान सांपडली तितकी भुसभुशीत जमीन तरी इराणी-दुराणीस कोंपरानें खणण्यास सांपडली नसतीच नसती हें खास. बापू, मी कोणाच्या नशिबावर उड्या मारीत नाहीं; पण माझ्या समशेरीच्या जोरावर वजावतों, कीं, माझ्यांतहि या माधवास पुरून उरण्या इतकी-इतकेंच नव्हे तर त्याला पुरून टाकण्या इतकी-धमक आहे: कर म्हणावें तुला काय करावयाचें असेल तें. आतां तर मी नाहींच ऐकणार त्याचें. नाहीं, नाहीं, बापू नाहीं; मी मोडेन पण वांकणार नाहीं.

**बापू**:—दादासाहेब, असा अविचार करूं नका; मी आपल्या पक्षाचा आहें, हें लक्षांत आणा आणि ह्या आणीबाणीच्या वेळीं तरी निदान पडती घेऊन आपली पत ठेवून घ्या. आजपर्यंत कधींहि अनुभविलेलीं नाहींत, अशीं दुःखें आणि अपमानास्पद स्थिति भोगण्याचा प्रसंग नशिबीं न यावा, म्हणून मी आपणास हात जोडून, पदर पसरून-नव्हे पाया पडून-अशी विनंति करतों, कीं, आपण ह्या दुराग्रहांत पडून विषाची परीक्षा पाहूं नका.

**दादा०**—विषाचा जालिम उतारा माझे पोतडींत आहे; बस्स तें कांहीं नाहीं. पाहूंच तर आतां विष मला बाधतें का मी विषाला बाधतों हें; बापू, या बाबतींत तुम्ही आतां एक अक्षरहि काढूं नका, माझ्या पुढें! बस्स, यापुढें मी तुमचा एक शब्दहि ऐकूं इच्छित नाहीं या बाबतींत. नाना, संपली का तुमची रडकथा?

**नाना**:—दादासाहेब, पुन्हां विचार करा; मीहि बापूप्रमाणेंच आपल्या पाया पडूं काय? बापू म्हणतात त्याप्रमाणें आपण कां विचार करीत नाहीं?

**दादा०**—नाहीं, नाहीं, मला पुन्हां विचार करण्याची बिलकुल जरुरी राहिलेली नाहीं; आणि मी तुम्हास आतां अगदीं अखेरचें स्पष्ट सांगतों, कीं, मी माझा हट्ट कधींहि सोडणार नाहीं. नाना, आणखी आहे का कांहीं तुमच्या माधवाची धमकीची विनंति?

**नाना**:—दादासाहेब, ही धमकीची विनंती आहे काय?

**दादा०**—विनंतीची धमकी असेल. बोला, स्पष्ट बोला; माधवाची धमकीची विनंति काय आहे? त्याची विनंतीची धमकी कोणती आहे? बोला, बोला लौकर; स्पष्ट बोला.

**नानाः**—ठीक आहे दादासाहेब. ऐका तर मग. श्रीमंतांच्या आज्ञेनें मी आपणास त्रिवार असें खडखडीत बजावतों कीं, " इतक्यावरहि दुराग्रहानें आपणाला आपलाच हेका चालवावयाचा असेल, आणि पेशवाईवर भाऊबंदकीचे निखारेच फेंकावयाचे, असा हट्ट धरावयाचा असेल तर लक्षांत ठेवा कीं, आपल्या प्रत्येक आगलावीच्या आगळिकीस तोंड देऊन आपणाला पेशव्यांचा कैदी करण्याइतकी धमक श्रीमंतांत आहे—"

**आनंदीः**—( प्रवेश करून रागानें ) कुणाला, कुणाला करतां पेशव्याचे कैदी? ( दादासाहेबांकडे वळून ) आपणाला हे सगळे आपलेच आहेत असें वाटतें ना? घ्या आतां; आला का अनुभव ह्या तुमच्या माधवाचा आणि तुमच्याच पुण्याच्या लोकांचा. म्हणे माधव माझा, पुणें माझें आणि पेशवाईहि माझी! ठीक झालें! अस्सेंच व्हायला हवें होतें हो तुम्हाला. कसें पण अगदीं-अगदीं मनाजोगतें झालें माझ्या. अहो, सख्खें असलें तरी अडवें आल्यावर कापून काढावें लागतें, मग मेला माधव तर काय बोलून चालून चुलत! म्हणून म्हणतें, आतां तरी अनुभवानें शहाणे व्हा; माझें ऐका आणि स्वतःकरितां व आपल्या पुढील घराण्याकरितां राज्यकर्त्या पेशव्याचे लागोपाठ खून—

**दादा०**—आनंदी, आनंदी—

**आनंदीः**—राजकर्त्या पेशव्यांचे लागोपाठ खून करावे लागले तरी करीन, पण पेशवाई मिळवीन अशी प्रतिज्ञा करा. नाना, तुम्ही जसें माधवाच्या तर्फे आम्हास त्रिवार बजावून सांगितलेंत, तसेंच मीहि आतां ( दादासाहेबाकडे पाहून ) ह्यांच्यातर्फे तुम्हांसहि त्रिवार बजावून सांगतें कीं—

**दादा०**—आनंदी, आनंदी—

**आनंदीः**—हा क्षयी माधव मेल्यावर पेशवाईच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या त्या एकुलत्या एक संतानहिन कार्ट्याचा-त्या वारसदार नारायणाचा खून-खून करून तरी निदान आम्ही पुण्याचे पेशवे आज नाहीं तर उद्या पण खास होणार, होणार, होणार! ( पडदा पडतो. )

---

# प्रवेश ] अंक दुसरा. [ दुसरा.

( विठ्ठलशाख्याकडे रखमाबाई रागानें पहात आहे असा पडदा उघडतो. )

**विठ्ठलः**—काय लेकाची ही व्याद हात धुवून माझ्या पाठीस लागली आहे पहा. आताशीं जेव्हां पहावें तेव्हां थोबाड आपलें तोबऱ्यासारखें फुगलेलेंच ! कांहीं करा आणि कसेंहि वागा; पण आपलीं दुर्मुखलेली ती दुर्मुखलेलीच ! वेडीरे वेडी !

**रखमाः**—वेडीच आहें हो तशी मी; काय पण मेला कागावेखोरपणा; कुणाला वाटेल कीं, जसें कांहीं मला अगदीं फुलांतच ठेविलें आहे.

**विठ्ठलः**—अग कुणाला सुद्धां असें वाटणार नाहीं बरें; जिवंतपणीं कुणाला फुलांत ठेवतांना तूं पाहिलें आहेस काय एकादे वेळीं तरी ? फुलवितांनां मात्र पाहिलें असशील हजारोंवेळां.

**रखमाः**—हं; येत चाललांत बरें का तुम्ही पुन्हां रंगांत; बोलायला कशाला येतां माझ्याशीं आपण होऊन पुन्हां पुन्हां ?

**विठ्ठलः**—मोठाच चमत्कार आहे न काय ह्या तुझ्या बोलण्याचा ! अग, लग्नाच्या बायकोला 'मी तुझ्यावरील नवरेपणाचा हक्क सोडला,' अशी फारकत देऊन चालत नाहीं, आणि घरांत असल्यावर तर बोलल्या चालल्याशिवाय बिलकुल गत्यं-तर रहात नाहीं; अशा स्थितींत लौकिकाकरितां तरी निदान आपण होऊन बोलावें लागतें; समजलीस ?

**रखमाः**—मग मला आपली मेली माहेरीं तरी जाऊ द्या कशी एकदाची ! पुरे झालें मेलें हें संसारसुख !

**विठ्ठलः**—नाहीं; तसेंहि करतां येणार नाहीं; मला जशी तुला फारकत देतां येत नाहीं, तशीच तुलाहि माझ्यापासून संसारसुख मिळत नाहीं, म्हणून माहेरी जाऊन मला फारकत देतां येणार नाहीं; समजलीस ?

**रखमाः**—मग अस्सेंच छळून छळून मला मारणार वाटतें ?

**विठ्ठलः**—काय चोराच्या उलट्या बोंबा आहेत पहा. ( उघड ) अग, तूं हें

आरंभलें आहेस तरी काय, सांग पाहूं? शेजारचे लोक सुद्धां तुझ्या त्रासानें घरें सोडून जाऊं लागले, त्याची तरी थोडीशी खंती वाटते का तुझ्या मनाला?

**रखमाः**—छे, छे, मला कशाची आली आहे खंतीन् विंती? आई, आई, आपण मात्र खंत करून दिवसेंदिवस अगदीं रोडावत चालला कीं हो!

**विठ्ठलः**—( गहींवरून ) नको ग नको अशी माझ्याकरितां हळहळून दुःख करून घेऊस; अग, शेजाऱ्यांनीं घरें सोडलीं म्हणून मला का कोठें वायको सोडतां येईल? ( तिच्या जवळ जातो, ती झिडकारते. )

**रखमाः**—( रागानें ) अरे वारेवा! दुरून नाहीं वाटतें वोलतां येत? असें एखाद्या वावचळल्यासारखें काय आरंभलें आहे हें? भांगविंग तर नाहींना झोंकलीत?

**विठ्ठलः**—आला वरेंका तुला पुन्हां वेडाचा झटका; अग भांग झोंकली नसेल तरच प्रेमाची भांग झोंकतां येते, हें समजण्याइतकी सुद्धां शिंचे तुला अक्कल नाहीं; वेडीरे वेडी!

**रखमाः**—मला काय जाळावयाची आहे जळ्ळी मेली असली पांचट अक्कल शिकून; मला आपलें चुलीजवळचें शहाणपण आहे तेवढेंच पुरे.

**विठ्ठलः**—अग नाहीं ग नाहीं; त्यांतहि तूं कच्ची आहेस आणि त्यामुळें जशी तुझ्यापासून माझी सुटका होत नाहीं, तशीच तूं शिजविलेल्या कच्च्या अन्नापासूनहि होत नाहीं.

**रखमाः**—आपला सुमार पाहून वोला वरेंका आपण; लघळपणा करायलाहि उशीर नाहीं; आणि लाथा मारायलाहि उशीर नाहीं; शर्थ झाली मेली वागण्याची.

**विठ्ठलः**—वरें पण मी सांगतों ती शर्त तूं ऐकशील काय?

**रखमाः**—मला कांहीं सुद्धां आपलें बोलणें ऐकण्याची इच्छा नाहीं. आपलें प्रत्येक काम करण्याला व आपली दरेक मर्जी सांभाळण्याला मी नेहमीं एका पायावर तयार असूनहि आपल्या कांहीं सुद्धां मनास येत नाहीं, मग करावयाचें तरी काय?

**विठ्ठलः**—वरोवर, अगदीं बरोबर; जे आहेत्ते अगदीं वरोबर बोललीस; आलें

माझ्या आतां सगळें लक्षांत ध्यानांत. अरे हो पण काग, तूं नेहमीं एका पायावर उभी असल्याचें म्हणतेस हें खरें आहे काग ?

**रखमाः**—जिभेला हाड नाहीं म्हणतात हेंच खरें.

**विठ्ठलः**—अग म्हणूनच तर जे आहेत्ते आपल्या संसाराचा हा असा बोजवारा उडत आहे; नाहीं तर आपला संसार बघ कधींच थाटला गेला असता.

**रखमाः**—चोहोंकडून अडवायचें होतें आहेन काय; सगळी अक्कलहुषारी काय ती माझ्याशींच बोलण्यांत खर्च व्हायची.

**विठ्ठलः**—अग वाहवाग वाहवा; माझी सर्व अक्कलहुषारी जर मी तुझ्याशीं बोलण्यांत खर्च करून टाकली, तर माझें डोकें पोकळ नाहीं का होणार? (रागाचा अविर्भाव आणून) हेंच का तुझें माझ्यावरील प्रेम आणि हीच का तुझी माझ्यावरील मायाममता ? बरें झालें कीं, मी तुझ्या गोड गोड भाषणाला भुलून माझी सर्व अक्कलहुषारी खर्च करून टाकली नाहीं. असा लडिवाळपणा दाखवून केंसांनीं गळा कापणार होतीस माझा, पण देवानें वाचविलें म्हणूनच वांचलों; (आकाशाकडे पहात) हे दयाघन परमेश्वरा, हे दीनदयाळा दयाघना, हे अक्कलदेवते सरस्वती, तुम्ही सर्वांनीं मिळून मला आज या "अक्कलगयी" च्या गंडांतरांतून वांचविलेंत म्हणून मी आतां लवकरच हे देवा सत्यनारायणा, तुझी मनोभावेंकरून जे आहेत्ते पूजा करीन.

**रखमाः**—अहो, "याचना एकाची आणि पूजा भलत्याची" असें होतें आहे बरें का हें.

**विठ्ठलः**—होऊंदे, होऊंदे, अग "सर्व देवता मिळून तारी त्याला कोण मारी" ह्या म्हणीची आली का नाहीं अजून तुला प्रचीति ? (हात उडवीत) देवास्नी कौल दिला आहे कौल. उगाच नाहीं समजलीस; उघडले का तुझे डोळे ?

**रखमाः**—नसतीं भुतें जागवतां आहांत बरें का तुम्ही; माझ्या जवळच ह्या आपल्या गमजा चालल्या आहेत, समजलांत? माझे डोळे मिटले म्हणजे मग कळेल काय सुख आहे तें; दुसरे कोणी खेंटर सुद्धां ऐकून घ्यायला अडलें नाहीं आपलें हें असलें तारगट बोलणें; समजेल बरें, सगळें सुख समजेल माझ्यामागें.

**विठ्ठलः**—शफरी फरफरायते !

**रखमा:**—जन्माचीच मेली फरफर लागली आहे माझ्या नशिबीं.

**विठ्ठल:**—अग तसें नव्हें; शफरी ही एक माशाची जात आहे; आणि मासा जसा पाण्यावांचून तरफडतो तशीच माझी गत होईल तुझ्या वांचून आणि तुझ्या मागें, असा माझ्या म्हणण्याचा भावार्थ आहे. समजलीस? ( स्वगत ) चलाव, चलाव, दादासावकी नकल फेरसे चलाव; ( उघड ) नाहींग नाहीं, तूं गेल्यावर मला चांगलें ही वाटणार नाहीं आणि सूख ही होणार नाहीं; लाडके, तूं आहेस तोंपर्यंतच माझा संसार आहे बरें. हें पहा तुझ्या विरहानें माझे पंचप्राण कसे व्याकूळ होत चालले आहेत ते! लाडके, एकदां तरी प्रेमकटाक्ष फेंकग ह्या पामरावर; ( तिच्याकडे पहात ) लागलें मेण पाघळूं; आहेच माझी शाळुंकी तशा कोमल अंतःकरणाची; आहेच माझी हरिणाक्षी तसी साध्या मिजासाची; येग ये माझी मैना; किती नखरेबाज दिसतेसग तूं अलीकडे; ( जवळ जात ) काय पण खुमारी आहेग लाडके तुझ्या ह्या मोहक मुखड्यांत? चेहरा पण चेहरा; खुलून राहिला आहे जसा कांहीं.

**रखमा**—खबरदार, जवळ याल तर!

**विठ्ठल:**—अरे वाहवारे वाहवा, खासा न्याय आहे न काय; लाडके, हे शब्द तुझ्याच मुखांतून बाहेर पडले काय? छे! छे! असले कठोर शब्द तुझ्यासारख्या कोमल मनाच्या स्त्रीच्या मुखांतून कधींहि बाहेर पडणें शक्य नाहीं. हे चारुगात्रि! तूं मन्मानसांत जे आहेत्ते विहार करीत असतांना तुला प्रत्यक्ष अशी दूर उभी राहिलेली पाहून माझ्या जिवाला कशी बरें शांतता येईल? प्रलयकालच्या झंझावातानें दुभंग न होणारा हा माझा सर्व देह तुझ्या विरहदुःखानें कंपायमान होऊं लागला आहे, आणि तुझ्या शरीरयष्टीच्या आधारानेच, निव्वळ त्याचा तरणोपाय आहे; ( लघळपणानें तिच्या गालास हात लावतो; ती तोंड फिरविते. ) अग नको ग अशी निष्ठुर होऊस; अग नकोग अशी माझ्यावरची माया पातळ करूस; असें काय बरें करावें? कोण आहे बरें दुसरें या जगांत मला तुझ्याशिवाय मायेचें? ( जवळ जातो व हात पुढें करतो. )

**रखमा:**—( त्याचा हात झिडकारून ) ईशी-शी-शी, विट, विट आला मेला या पांचटपणाचा! जळ्ळा कांहीं ताळमेळच राहिला नाहीं न काय जसा? कांहीं वेळ न् घखत; लोक सुद्धां हसतात बरें का आपणाला पाहून.

**विठ्ठलः**—लोक विचारे चांगले कीं, मला पाहिल्यावर हसतात; पण तूं मात्र अशी खमंग आहेस कीं, मघांपासून तुझी सारखी मनधरणी करीत असूनहि एकदां सुद्धां हसत नाहींस.

**रखमाः**—माझ्या अंगाचा कसा संताप होतो हो तुमच्या ह्या असल्या चाळ्यांनीं; मेलें हंसावें कां रडावें, हेंच समजत नाहींसें झालें आहे मला आतांशा.

**विठ्ठलः**—अगदीं बरोबर, अगदीं बरोबर बोललीस; हसावें कां रडावें, हें समजणें सुद्धां मोठें कठीण आहे बरें कां; शिकल्याशिवाय देखादेखी अंगांत भुरण्यासारखें हें ग्यान सोपें नाहीं समजलीस ? पुष्कळांना तुझ्यासारखेंच हसावें कोठें आणि रडावें केव्हां हेंच मुळीं समजत नाहीं; आणि त्यामुळें पुष्कळ वेळां चुकून हसण्याच्या जागीं रडणें, आणि रडण्याच्या जागीं हसणें, असे प्रकार घडून येतात; तुला शिकवूं काग हें गुरुग्यान ?

**रखमाः**—नका नका इतकी तसदी नका घेऊं; ही एक मोठी पंचाईतच झाली आहे न काय ?

**विठ्ठलः**—अरे वा, जे आहेत्ते वेडी म्हणतां म्हणतां शहाणपणाचीहि लहर येतेग तुला एखादे वेळीं अगदीं अक्षरशः बरोबर आहे जेहेत्ते तुझें म्हणणें. ह्या रावसाहेबांच्या आणि दादासाहेबांच्या झुझांत हसावें तरी पंचाईत; आणि रडावें तरी पंचाईत. शिवाय आज श्रीमंत गोपिकाबाईसाहेब गंगापूरला जाणार असल्यानें ह्या बाबतींत त्यांचें आणि श्रीमंत रावसाहेबांचें बोलणें होऊन अखेर काय ठरतें, तें निराळेंच;—म्हणजे पंचाइतींत पंचाईत !

**रखमाः**—पण आपण तरी कशाला करतां ही पंचाईत ?

**विठ्ठलः**—कशाला म्हणजे दादासाहेबांचा उपाध्या म्हणून; पण काग तूं तर आनंदीबाईची अगदीं हुबेहुब नक्कलच वठवितेस न काय माझ्यापुढें !

**रखमाः**—आहांतच आपण दादासाहेबांसारखे भोळेसांब; मग मी कां नको करूं आनंदीबाईसाहेबांचें अनुकरण.

**विठ्ठलः**—कां नको करूं म्हणजे ? अनुकरण करतां येणार नाहीं म्हणून. आनंदीबाईसाहेबांना घरबसल्या कारागृहवास घडला, पण अनुकरणाच्या दृष्टीनेंहि

जरी कदाचित् वाटलें, तरी तो तुला तसा आपल्या घरीं बसून केव्हांहि घडणार नाहीं. कारागृहवास घडायलाही तसाच उद्योग करावा लागतो, समजलीस ?

**रखमाः**—पदोपदीं मेली पेशव्यांच्या घरची उठाठेव; लहान तोंडीं मोठा घांस घेण्याचा पोकळ आंव आणतां कशाला मेला नेहमीं कोण जाणें ?

**विठ्ठलः**—पाहिलेंस, तुला समजत नाहीं म्हणून मी जें नेहमीं म्हणत असतों तें हेंच; आपल्या सर्व आचारांत, विचारांत, व्यवहारांत आणि कृतींत मोठ्या लोकांचें अनुकरण करण्याचा आव घालावा, सहज नसला तरी ओढून ताणून संबंध आणून त्यांचा नेहमीं नामनिर्देश करीत जावा, आणि त्यांची प्रशंसा करण्याचे बहुतेक प्रसंग टाळून त्यांच्यावर टीकेची झोड उडविण्याची मात्र प्रत्येक संधी साधीत जावी, हें हल्लींच्या काळीं तुटपुंज्या ज्ञानानेंहि फार थोड्या अवधींत जगप्रसिद्ध होण्याचें एक अनुभवसिद्ध रामबाण साधन आहे, एवढें समजण्याइतकी सुद्धां तुला अक्कल नाहीं; वेडीरे वेडी !

**रखमाः**—लागलांत बरें का तुम्ही पुन्हां भरकटायला; मेलें कांहीं डोकें बिर्के तर नाहींना फिरलें ?

**विठ्ठलः**—तूंच मूर्ख आहेस झालें; अग माणसाचें डोकें कसें फिरेल ? डोक्याचा माणूस फिरतांना तुला नेहमीं दिसेल, पण माणसाचें डोकें फिरतांना मात्र नाहीं हो तुला कधीं–कधीं सुद्धां दिसायचें. दादासाहेबांच्या डोक्यांत भाऊबंदकीचें भूत उत्पन्न करणारी आनंदीबाई स्वतः स्वस्थ घोरत पडली आहे, पण डोक्याचा रघुनाथराव मात्र लागला आहे, सारखा इकडे तिकडे भ्रमंती करायला. समजलासि ?

**रखमाः**—अहो नाहीं हो नाहीं; आनंदीबाईसाहेबांनांहि स्वस्थ झोंप नाहीं येत बरें का आतांशीं; रात्रीच्या रात्रीं त्यांचा डोळ्याला डोळा लागत नाहीं कसा तो अलीकडे.

**विठ्ठलः**—महामूर्ख आहेस तूं; डोळ्याला डोळा कधींच लागत नाहीं; पणीला पापणी लागते समजलीस. ( डोळे वटारतो. )

**रखमाः**—समजलें समजलें; कशाला डोळे काढून पाहतां माझ्याकडे ?

**विठ्ठलः**—देऊं काग तुझ्या एक थोतरींत भडकावून; शिंचे, तुला अकल नाहीं तर मरण ही नाहीं एकदाचें ! डोळे काढून पाहतों का मी तुझ्याकडे ? माझे डोळे

काढल्यावर मी तुझ्याकडेस कसा पाहणारग आणि तुझें डोळे काढले तर मी तुझ्याकडे पाहतों हें तुला कसें दिसणारग ? अकलेची कमाल केलीस झालें; बेअक्कल, बिलकुल बेअक्कल, एकदम बिलकुल बेअक्कल !

**रखमाः**—बरें बरें; जेव्हां तेव्हां म्हणे बेअक्कल बेअक्कल! नाहीं अक्कल माझ्यांत, मग ? आणायची होती अकलेची खाण दुसरी कोणी करून; मी म्हणूनच या घरांत अशीं खेटरें खात राहिलें आहें, आजपर्यंत समजलात ? दुसरीचा पायपोसहि अडला नाहीं असली ही आपली तिरसिंगरावी गाजवून घ्यायला.

**विठ्ठलः**—या जगांत एकाच मनुष्यास स्वतःच्या घरांत आणि आपल्याच असलेल्या माणसांचा सुद्धा निरनिराळ्या वेळीं निरनिराळा अनुभव येत असतो; लग्न झाल्यापासून पहिलीं पांच सहा वर्षें "नवरा दुसरें लग्न करील कीं काय" अशा बद्दल बायका साशंक राहून त्यांना नेहमीं भीति वाटत असते. नवऱ्याच्या तिशींत एक दोन मुलेंबाळें त्याच्या खांद्यावर बसूं वागडूं लागलीं कीं, ही भीति अंधुक होऊं लागून त्या जागीं " घरची मालकीण मी " असा मुग्ध अहंकार उत्पन्न होऊं लागतो. नवऱ्याच्या चाळिशींत तो "आतां दुसरें लग्न करणार नाहीं" अशा खात्रीनें निर्धास्थ झाल्यानें बायकांची प्रवृत्ति " तुम्हाला वाटल्यास दुसरी करून आणा " असें तोंडावर सडेतोड सांगण्यापर्यंत जाते आणि नवऱ्याच्या वयाच्या च्याळिशीचें डोळ्याच्या चाळसीवर गेलें म्हणजे त्या बिचाऱ्याचें नवरेपण पूर्णपणें संपुष्टांत येतें; ( तिच्याकडे पाहून ) कायग, आपलें लग्न झालें त्यावेळीं तर तूं कशी एखाद्या गोगलगाईसारखी निरुपद्रवी दिसत होतीस; त्यावेळीं "करतें मी दुसरें लग्न " एवढें नुसतें म्हणण्याचा अवकाश कीं, लागली सारखी पटापटा पाया पडायला " नका करूं दुसरें लग्न " म्हणून; आणि आतां तर, थोडेसें "हूं " म्हटलें पुरे कीं, उलट तूं होऊनच " आणा पाहिजे तर दुसरी करून-आणा पाहिजे तर दुसरी करून " अशी सारखी धमकी देत असतेस, हें का आपल्या लग्नाला पुष्कळ वर्षें झालीं म्हणून, कां माझें आतां दुसरें लग्न होणार नाहीं, असें तुला वाटतें म्हणून ? सांग बघूं; शांतपणानें बोल; कुत्र्यासारखी एकदम अंगावर मात्र बसकन ओरडत येऊं नकोस.

**रखमाः**—आपणहि पण शांतपणानेंच ऐकून घेतलें पाहिजे आहे बरें का मी काय बोलेन तें; ऐकालना ? ऐकालना; हो म्हणा; हो म्हणा ?

**विठ्ठलः**—हो ऐकेन.

**रखमाः**—लग्न झाल्यानंतर, नवऱ्याला पहिलीं कांहीं थोडीं वर्षे "वायको" हेंच एक कायतें श्रेष्ठ दैवत आहे, असें वाटत असतें; पण जसजसा अधिक काळ लोटत जाईल, तसतसा त्यांतील श्रेष्ठपणा जात जाऊन उतरत उतरत हें वायकोचें दैवत कवडीहूनहि कमी किंमतीचें आहे, असें त्यास वाटूं लागतें; व वायकोचें कितीहि वय असो, कितीहि मोठालीं मुलें होवोत, घरांत कितीहि सुना येवोत, आणि अंगणांत कितीहि नातवंडें खेळत असोत, नवऱ्याला वेळीं अवेळीं आपला नवरेपणाचा हक्क नेहमीं तंतोतंत गाजवीत राहिलेंच पाहिजे, असें वाटत असतें पण त्यावरोवरच इकडे स्वतःचे कर्ते मुलगे आणि संसारी मुली, व तिकडे कमावते भाऊ, कर्त्या वहिणी, व त्या सर्वांचा परिवार, अशा गजवलेल्या घरांत आपली वायको नांदत आहे, हें त्याला दिसत असल्यानें आपल्या कटकटीला त्रासून ती आपला नवरेपणाचा हक्क एखादेवेळीं अजिवात उधळून देईल कीं काय, अशीहि त्याला नेहमीं शंका येऊन त्याच्या भीतीच्या वडवडीची टकळी सारखी सुरू राहते; आणि अशा दुधारी कातरींत पुरुष सांपडला कीं मग हो तो दररोज—नव्हे क्षणोक्षणीं—हा आपल्या घरांतल्या सारखा फार्स !

**विठ्ठलः**—अग वाहवाग वाहवा; पुष्कळच भोळसर आहेस कींग तूं; वस्स तें कांहीं नाहीं; ठरलें, खास-खास ठरलें; आजपासून मी तुला पुन्हां माझें दैवत म्हणून मानणार; माझें अगदीं सर्वस्व, माझें परब्रह्म आणि माझ्या नित्याच्या मानस पूजेचें आदिस्थान आतां काय तें तूंच ! हा पहा लाडके, आलोंच मी तुझा आश्रय घेण्याला. ( जवळ जातो व "अग नकोग अशी दूर लोटूं, अग नकोग असें करूं" असें म्हणत, व ती, "इश्श मेलें हें काय, इश्श मेलें हें काय," असें म्हणत, त्याला झिडकारीत आहे, असा पडदा पडतो. )

# प्रवेश ] अंक दुसरा [ तिसरा.

( श्रीमंत गोपिकाबाईसाहेब एका जाळीदार पडद्याच्या आंत बसलेल्या आहेत व बाहेरच्या बाजूस श्रीमंत रमाबाई व पार्वतीबाई उभ्या आहेत असा पडदा उघडतो. )

**पार्वतीः**—मग झालाचका आपला बेत कायम ?

**गोपिकाः**—पार्वती, तूंच जर अशी माझ्या जाण्याच्या बेतांत हरकती आणू लागलीस, तर माझी रमाहि तसाच हट्ट धरून बसल्यास त्यांत काय नवल आहे बरें ? ती तर काय बोलून चालून पोरच आहे अजून !

**पार्वतीः**—आपण गंगापूरला जाऊन राहणार हें मला कसें बरें चांगलें वाटेल ? माझें लग्न होऊन पेशव्यांच्या घरांत मी आल्या दिवसापासून आजपर्यंत आपण माझ्यावर धाकट्या वहिणीप्रमाणें प्रेम करीत आला, आणि माझें पाहिजे तसें कोड पुरविलें; म्हणून म्हणतें, एवढाहि माझा हट्ट आपण पुरवावाच गडे! नाहींच का मग आपण ऐकणार ? मला किनई आपल्या शिवाय माथेचें असें दुसरें कोणी सुद्धां वडील मनुष्य नाहीं राहिलें बरें या जगांत ! ( रडूं लागते. )

**गोपिकाः**—पोरे, डोळे पूस बघूं आधीं; अग, तुला वेड तर नाहीं लागलें ? असें पदोपदीं डोळ्याला पाणीग काय आणतेस ? तूंच जर नेहमीं अशी दुःखी कष्टी राहूं लागलीस, तर माझ्या रमेला तरी कसें बरें सुख होईल ? असें काय बरें करावें; प्राप्त स्थितींत समाधान मानून घेण्याशिवाय आहे का आपणाला दुसरें कांहीं गत्यंतर ?

**पार्वतीः**—आपण हें असें कांहीं बाई बोललांत किनई म्हणजे माझें मन कसें अगदीं भडभडून येतें बरें ! मी सुद्धां नेहमीं सुखी आहे, असें आपल्याकडून दाखविण्याचा प्रयत्न करीत असतें, पण नाहीं हो माझ्यानें रहावत ! पूर्व सुखाची आठवण होऊन प्रत्यक्ष प्रभू श्री रामचंद्राच्या मुखांतूनहि “ते हिनो दिवसागतः” असे दुःखाचे उद्गार निघाल्याशिवाय राहिले नाहींत; मग मी तर काय बोलून

चालून मानवी सृष्टींत आणि त्यांत ही वायकोच्या जन्मास आलेली ! पूर्व सुखाची आठवण झाल्याशिवाय कशी हो राहील वरें मला ?

**गोपिकाः**—पार्वती, तुझें म्हणणें जरीं अक्षरशः खरें असलें तरीहि विवेक करून दुःख नकोका विसरावयाला ? निदान आपण विसरलों आहोंत, असें तरी दाखवावयाला ? मनुष्याच्या पाठीमागें जसा जन्म मृत्यू, तसेंच सुख दुःख ही लागलेलेंच आहे; " निचैर्गच्छत्युपरिचदशाचक्रनेमिक्रमेण " या वचनाची सत्यता आपणास पदोपदीं पटत रहावी, म्हणून नशिवाचें चाक नेहमीं फिरत असते, आणि समुद्राप्रमाणेंच मनुष्याच्या नशिवासहि भरती ओहोटीचे प्रसंग येऊन "कालाय तस्मै नमः" असें म्हणत आयुष्याचे वरे वाईट दिवस कंठावे लागतात. पार्वती, हा सारा माझ्याच नशिवाचा खेळ आहे वरें ?

**पार्वतीः**—नाहीं, आपल्या नशिवाचा नाहीं पण माझ्या पायगुणाचा आहे हा योगायोग. माझे पापीणीचे पांढरे पाय या घरांत शिरण्यापूर्वी तें किती भरलेलें दिसत होतें. पण आतां काय राहिलें आहे हो त्यांत ! आमच्याचमुळें दादासाहेबाचें मन कलुषित झालें; आमच्याचमुळें आपणास पुत्रशोकाचा धक्का वसला ! आमच्याचमुळें कर्ते पेशवे-ज्यांच्या कारकीर्दींत मराठ्याच्या साम्राज्यसत्तेचा व कीर्तीचा कळस झाला, ते राजकार्यधुरंधर नानासाहेव, ज्यानीं साम्राज्याच्या जयजयकाराच्या वेळींहि भेदभाव न ठेविता आमच्यावर मुलासारखें प्रेम ठेवून स्वतःच्या हाडामासाच्या वडील गोळ्याला आम्हा कसावांच्या हवालीं केलें, ते माझे पूज्य मोठे भावोजी-आमच्या नांवानें रडत आपणास कायमचे सोडून गेले, आणि विशेष हें कीं, इतकें सगळें झालें, तरी मी आपली अजून जिवंतच ! जन्मभर अश्रु ढाळीत वसण्या शिवाय आता मला काय वरें वाकीं उरलें आहे ? (डोळे पुसते)

**गोपिका**—पार्वती, अग पार्वती, कसें ग होणार वाई तुझें ? अशानें कसेंग दिवस निघणार तुझे ? धड खाणें नाहीं धड झोंप नाहीं, असें करून कसें वरें चालेल? सर्व गोष्टी ईश्वरा धीन असतात, आणि त्या त्याच्याच इच्छेप्रमाणें घडून येत असतात, ही गोष्ट आपणास माहीत असूनहि चांगल्याचें श्रेय-परमेश्वरास, आणि वाईटाचे श्राप तेवढे एखाद्या व्यक्तीस देण्यांत आपला आपमतलवीपणा, आणि ईश्वरासंबंधीं आपला अविश्वास आपण दाखवितों, असें नाहीं का तुला वाटत ?

**पार्वती**:--नाहीं हो नाहीं; ईश्वरानें आपमतलबीपणा करून माझ्यासंबंधीं मात्र जगांत पूर्ण अविश्वास उत्पन्न केला, असें नाहीं का आपणाला वाटत ?

**गोपिका**:—नाहीं, मला तसें मुळीं सुद्धां वाटत नाहीं; गीतेंत भगवंतांनीं केलेल्या उपदेशांत "माझ्यावर भरंवसा ठेवून तूं निर्धास्थ रहा" असें अर्जुनास सांगितलें आहे, त्याचप्रमाणें आपणहि ईश्वरावर भरंवसा ठेवून निर्धास्थ का राहूं नये ? ईश्वर जें जें घडवून आणतो तें तें सर्व आपल्या बऱ्या करितांच असते, ही भावना आपल्या मनांत दृढ झाली, गीतेंतील कर्मयोग प्रधान समजून त्याप्रमाणें आचरण केलें तरी ईश्वराच्या सत्तेशिवाय एक पानहि हलत नाहीं, ही गोष्ट आपण लक्षांत आणली, आणि इतकें असूनहि भवितव्यतेपुढें, मानवी तर राहोच, पण ईश्वरी अगर दैवी शक्तीलाहि हात टेंकणें भाग पडतें, ह्या गोष्टीचें मनन केलें म्हणजे दुःखाच्या आठवणींतहि मनाच्या चंचल व चवचाल प्रवृत्तीवर विचाराचा व विवेकाचा दाब बसतो, आणि भावनेला श्रद्धेचें रूप येऊन या नश्वर जगांतील क्षणभंगुर सुखापेक्षां ब्रह्मानंदांतील चिरकालीन सुखासमाधानाची जोड मिळावी, म्हणून आपण धडपड करूं लागतो.

**पार्वती**:—पण मानवी प्राणी संसाराच्या चिरगुटांत आणि आप-पर भेद-भावाच्या लक्तऱ्यांत इतका गुंडाळला गेलेला असतो कीं, मरेपर्यंतही त्याची त्यांतून सुटका होत नाहीं, आणि त्यामुळें ब्रह्मानंदांतील चिरकालीन सुखाची त्याची धडपड पुष्कळ वेळां स्वतःच्या सुखाकरितां अथवा मनाच्या समाधाना-करितां नसून जगाच्या दृष्टीला ती तशी आहे, असें भासविण्याच्या वरपांगी उद्देशानें असते; प्रापंचिक मोह-पसाऱ्याच्या दाढेंतून लोभी मानवी प्राणी कसचा सुटणार ?

**गोपिका**:—कां नाहीं सुटणार ? जगांतील प्रत्येक मनुष्य आपापल्या सुखा-करितां धडपड करीत असून त्या सुखाचीं साधनें मिळविण्याच्या प्रयत्नावरच जगाच्या इमारतीचा पाया रचलेला आहे; आई बाप, भाऊ बहीण, नवरा बायको व इष्टमित्र हे सर्व निरनिराळ्या इच्छेनें आणि आकांक्षेनें एकजीव झालेले अस-तात; आपल्या इच्छा-आकांक्षांच्या साध्यतेकरितां मायेच्या बाजारांत सौदा ठरवीत असतात, आणि इतकें असूनहि आत्मसुखाच्या विशिष्ट लालसेनें स्वतःच्या इच्छा-आकांक्षांस थोडीशीहि आंच लागते, असें दिसलें कीं, लागलींच ती टाळण्या-

करितां पूर्वी एकजीव झालेले असल्यासारखे वाटणारे धागे तोडून, पुन्हां नवा मायेचा बाजार व पुन्हां नवा ममत्वाचा सौदा, असें आयुष्याचें रहाटगाडगें सुरू होतें.

**पार्वती**:—पण ब्रह्मानंदीं टाळी लागून प्रत्यक्ष स्वतःच्या देहाचा विसर पडण्याइतकी ईश्वराच्या ठिकाणीं तन्मयवृत्ति होण्याला सोपा उपाय काय ?

**गोपिका**:—मृत्यू–मृत्यूची कल्पना ! घटकेपूर्वी पुत्रप्रेमाचा पान्हा फुटलेली आई आपल्या मुलाला, व पतिप्रेमांत दंग असलेली बायको, आपल्या नवऱ्याला दुसऱ्याच घटकेस कुडींतून प्राण निघून गेल्यावर दूर लोटतांना होणाऱ्या दुःखांत जो उद्वेग उत्पन्न होतो, त्यानें मानवी अंतःकरणांत वैराग्याची जमीन तयार होते; आणि त्या उद्वेगांतच ईश्वरी इच्छा, म्हणून समाधान मानून घेण्याच्या प्रवृत्तीच्या मिळालेल्या खतानें मानवी अंतःकरणांत ब्रह्मानंदाचें बीज इतक्या जोरानें फोंफावतें कीं, कामक्रोधादि षड्रिपूंना त्यांत उत्पन्न होऊन धुडगूस घालण्यास थाराहि मिळत नाहीं; पार्वती, मी म्हणतें त्या दृष्टीनें तूं कधीं विचार केला आहेस काय ?

**पार्वती**:—होय; पण आपण म्हणतां तसा प्रत्येकानें संसारसुखाचा त्याग केला तर मानवी सृष्टीचे व्यवहार बंद नाहीं का पडणार ?

**गोपिका**:—पार्वती, माझ्या म्हणण्याचा भावार्थ हा नाहीं. आपण ईश्वराशीं तादात्म्य होण्याला गिरिकंदरींच वास केला पाहिजे–अथवा संसारसुखाचा सर्वस्वी त्यागच केला पाहिजे–असें माझें म्हणणें नाहीं; इतकेंच नाहीं, तर असा मार्ग स्वीकारणें, हें चुकीचें व अविचाराचें आहे. आपण संसारांत कर्ममार्गानें राहून संसारगाडा चालवावा, पण किडे जसे खातेऱ्यांत वुजवुजत राहतात, तसें आपणहि ह्या संसाराच्या खातेऱ्यांसच आपलें आराध्यदैवत न समजतां ईश्वरास आपलें आराध्यदैवत समजून त्याचेकडेसच आपल्या मनाचा लय नेहमीं लावीत जावा. कुडींतून प्राण हा कधीं ना कधीं तरी जाणारच ! पण आत्मा हा अविनाशी आणि अमर आहे, असें आपल्या मनास नेहमीं शिकवीत जावें, आणि ईश्वरावरील अढळ भक्तीच्या जोरावर संसारांत सृष्टिक्रमानुसारें येणाऱ्या प्रत्येक संकटाला व आपत्तीला हिंमतीनें तोंड देऊन जगाच्या दृष्टीनेंहि वंद्य होण्याचा अहर्निश प्रयत्न करीत रहावा.

**पार्वती**:—होय, तसा प्रयत्न करीत रहावा खराच, पण सद्‌हेतूनें केलेल्या प्रयत्नांतहि पुष्कळ वेळां अपयश येतें, आणि अंगिकृत सत्कार्याचा विपर्यास होऊन मनुष्यप्राणी दुःखी कष्टी होतो, याचें कारण काय? असें कां म्हणून व्हावें?

**गोपिका**:—कर्मयोगाच्या उदात्त ध्येयाची त्याची दृष्टि नसते म्हणून; कर्तव्याच्या दृष्टीनें कार्य करीत राहण्याची त्याची दानत नाहीं म्हणून; फलाच्या आशेनें केलेलें कोणतेंहि कार्य निष्फळ झाल्यास त्यापासून दुःखच होणार; मानवी-प्रपंच हा सगुणरूप मायेचा एक खेळ आहे, आणि त्यांतील सुखदुःखाच्या जाळ्यांत आपण भरडले जाऊं नये, अशी नुसती इच्छा असून चालत नाहीं; तर भवचक्रांतील ह्या सुखदुःखाच्या व आशानिराशेच्या फेऱ्यांतून मुक्त होण्याला अत्यावश्यक असलेली, कर्तव्याच्या दृष्टीनें कार्य करीत राहण्याच्या प्रवृत्तीची ही प्रधान बाबद जोंपर्यंत साध्य झाली नाहीं, तोंपर्यंत त्या उद्देशानें केलेले कोणतेंहि प्रयत्न हे केव्हांहि अपूर्णच राहतील, ह्या दृष्टीनें कार्य करीत राहण्याची संवय व्हावी लागते.

**पार्वती**:—हें सगळें खरें, पण प्रेमाचा लोभ आड येतोना?

**गोपिका**:—अग नाहीं येत अशा दृष्टीनें विचार केला तर! प्रेमाचा लोभ, आणि प्राप्तीचा लाभ, नाहींसा होण्याला आशेची निराशा, हा एक रामबाण तोडगा आहे. कसा तो पहा; आपल्या घरांतील कर्ते पुरुष गेले, त्या बद्दल आपण निराशेनें लोभ सोडला; पण तेंच मी आतां गंगापूरला जाऊन राहीन म्हणतें तर तुमचा लोभ सुटत नाहीं; न सुटो बापडा; पण मी आपली ही खास जाणारच; माझा जाण्याचा बेत आतां नक्की ठरला आहे बरें का रमा; पार्वती, माझ्या रमेला अंतर देऊं नकोस बरें का.

**रमा**:—धाकट्या सासुबाईच्या विनंतीला मान देऊन तरी म्हटलें राह्यचें होतें निदान आणखीं कांहीं दिवस तरी; जातां येईल म्हटलें दोन दिवसांनीं पुढें; नाहींच का मग ऐकायचें होत इकडून?

**गोपिका**:—मुली, तूं शहाणी आहेस; तुला सर्व समजतें आहे; मग माझ्या बेताच्या आड कशाला येतेस बरें?

**रमा**:—( गहिंवरून ) आपण मला आजपर्यंत मुलीसारखें प्रेमानें वागविलेंत; कधीं एक शब्दानेंसुद्धां दुखविलें नाहीं; माझें कोड लडिवाळपणानें नेहमीं पुरवीत

आलांत, आणि आतां आपण जाऊं म्हणतां, हें कसें वरें मला चांगलें वाटेल ? नका वरें जाऊं आम्हाला टाकून; नकाहो असा आमचा कंटाळा करूं; आईसुद्धां विसरलें वरें मी इकडच्या माये पुढें.

**गोपिकाः**—मुली, मी तुला आजपर्यंत प्रेमानें वागविलें, यांत कांहीं विशेष केलें, असें मला वाटत नाहीं; आपल्या सुनेला मुलीसारखी प्रेमानें वागविणें, हें प्रत्येक सासूचें कर्तव्यच आहे; सासूपणाचा सदानूकदा तोरा ठेवून दरसा गाजविण्याकरितांच आपल्या घरांत लवकर सून यावी, अशी जिची इच्छा असेल, ती सासू या नात्याच्या पवित्र आसनावर बसण्यालाच मुळीं पात्र नाहीं; उलट, सुनेनेंहि सासूला आपल्या आईप्रमाणें, पूज्य समजून तिला प्रेमानें योग्य मानसन्मान देत गेलें पाहिजे; परंतु असें न करतां योग्य नातें विसरून, घरांतील कावाडकष्ट करणारी, व पोरासोरांच्या खस्ता खाणारी, एक वडवडी बाई, म्हणून जर सून सासूला तिरस्करणीय रीतीनें वागवूं लागली, तर तीहि आपल्या भावी सुनांची सासू होण्याला अगदींच अपात्र आहे; मुली, तूंहि पण मला आजपर्यंत आईसारखाच मान देत आली आहेस, ह्याची मला नेहमीं आठवण होत जाईल वरें मी येथून गेलें तरीसुद्धां ?

**रमाः**—पण म्हटलें, नाहींच तूर्त जायचें झालें तर ? हीच विनंति करण्याकरितां धाकट्या भावोजीसह आतांच तिकडून यायचें होणार आहे; मग नाहींना जायचें ? नाहींना जायचें होणार ?

**गोपिकाः**—मुली, मी जाणार; आणि मला तूर्त तरी गेलेंच पाहिजे; तुम्ही कितीहि म्हणालांत, ह्या वावतींत माधवानें कितीहि आग्रह धरला, आणि नारायणानें कितीहि अश्रु आणले, तरीहि मी आपली जाणार हें खास ! मुली, तूं स्वतः शहाणी आहेस; आणि तुझें वय लहान असूनहि तुला सर्व कांहीं पूर्णपणें समजतें आहे; पण मेली माया वेडी, जाण्यापूर्वी तुला तुझ्या हिताचे दोन शब्द सांगावेसे वाटतात; सांगू का ? ऐकशील का ?

**रमाः**—हें काय विचारायचें होतें आहे ? इकडच्या आज्ञेवाहेर आजपर्यंत कधीं तरीं वागलें आहे का मी ? इकडच्या इच्छेवाहेर कधीं तरी गेलें आहे का मी आजपर्यंत ? म्हटलें, काय आज्ञा करावयाची होते आहे मला ?

**गोपिका:**—मुली, पार्वतीशीं माझें झालेलें सर्व बोलणें तूं ऐकलेंच आहेस; तूं अजून जगाचा अनुभव घेतला नाहींस; पण अनुभवानें शहाणपण शिकण्याचें तुला कारणहि नाहीं. तूं शहाणी आहेस; सुशील आहेस; आणि सौभाग्याच्या अब्रूकरतां प्राण देणारी सिंहीण आहेस; तरीहि पण मी आतां तुला जे दोन शब्द सांगणार आहे, ते नीट लक्षांत ठेवून त्याप्रमाणें नेहमीं वर्तन ठेव, म्हणजे तुझें कल्याण होईल, व तुझी कीर्ति होऊन पेशव्यांच्या घराण्यांतील स्त्रियांत तुझें नांव अजरामर होईल; मुली, तुझें लक्ष आहेना ?

**रमा:**—आहे बरें माझें लक्ष.

**गोपिका:**—देह क्षणभंगूर आहे; सत्ता, संपत्ति, आणि सौख्य हा त्रिदोष घातक आहे; अखेरच्या वेळीं अंग झांकण्याला म्हणून मृत देहावर टाकलेला कापडाचा तुकडासुद्धां त्याच्या मालकीचा नाहीं; ज्या स्थितींत मनुष्य प्राणी जन्मास येतो, त्याच तंतोतंत स्थितींत तो मृत्युशय्येवर ठेविला जातो, ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं; "जगीं सर्व सुखी" अशी एकहि व्यक्ति आढळणार नाहीं. देहाची ओली माती जमीनीवर केव्हां पडेल याचा नियम नाहीं; मृत्यूच्या दरबारांत गरीब-श्रीमंत, आणि लहान-मोठा, हा भेदभाव नाहीं; यमाच्या लोखंडी पंज्यापुढें टिकाव धरण्यास हाडामासाचा लवचिक मनुष्य-प्राणी अमर नाहीं, आणि जित्या-जिवाची जोपासना त्यावेळीं-त्यावेळीं यत्किंचित्‌सुद्धां उपयोगी पडत नाहीं; मुली !

**रमा:**—ऐकतें आहें बरें मी नीट लक्ष देऊन.

**गोपिका:**—मुली ऐक; तूं आपल्या आयुष्यक्रमांत अगदी पहिली गोष्ट ही लक्षांत ठेव कीं, तूं एका कर्तबगार, करारी व करामती पेशव्याची बायको आहेस; "छत्रपतीच्या मुख्य प्रधानाची स्त्री," या नात्यानें तुझ्यावर केवढी जबाबदारी आहे, तुझ्या कृतीचा जनतेच्या आचरणावर केवढा परिणाम होणार आहे, आणि निव्वळ तुझ्या वागणुकीवरच राज्यकर्त्या पेशवे घराण्याची अब्रू सर्वस्वी कशी अवलंबून आहे, ह्याचा विचार कर; कसेहि प्रसंग आले, आणि कशाहि आपत्ति भोगाव्या लागल्या, तरी त्यावेळींहि पंत प्रधानाच्या घराण्यांतील स्त्रियांना साजेल असेंच

पाणीदारपणाचें वर्तन ठेव; घरांतील भाऊबंदकी जरी या थराला आली आहे, तरीहि तूं तुझ्या लौकिकाला व इभ्रतीला शोभेल, अशीच नेहमीं वागत जा.

**रमाः**—अक्षरशः पाळीन बरें इकडची आज्ञा.

**गोपिकाः**—आपल्या पातिव्रत्याचा अमोल ठेवा प्राणापलीकडे जतन कर; दया, क्षमा आणि शांति, असेल, त्याच ठिकाणीं ईश्वराची वस्ती राहील, हें महावाक्य विसरूं नकोस; पापपुण्य, सत्यासत्य, नीति–अनीति, व न्याय–अन्याय, यांची नेहमीं चाड बाळगीत जा; आपले आहार, विहार, आचरण, आणि प्रावरण, साधें व नियमित ठेव; मानापमानाच्या मोहाला सदोदित आळा घालीत जा; आणि, सदैव ईश्वराला स्मरून त्याची भीति बाळगीत जा.

**रमाः**—इकडच्या आज्ञेबाहेर मी नाहीं बरें केव्हांहि वागावयाची;

**गोपिकाः**—थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, एका वैभवशाली पेशव्याची सून, एका मुत्सद्दी व मानी पेशव्याची स्त्री, आणि एका भावी यशश्वी पेशव्याची माता, या दृष्टीनें तुझे आचार, तुझे विचार, तुझ्या इच्छा, व तुझी कृति, हीं सर्व, इतकीं उज्वल, इतकीं करारी, इतकीं उदात्त, इतकीं माननीय, आणि इतकीं पूज्य, असलीं पाहिजेत कीं, हिंदुस्थानांतील प्रत्येक भागांत, आणि महाराष्ट्रांतील प्रत्येक घरांत, "एक अद्वितीय स्त्रीरत्न" म्हणून कुलस्त्रियांनीं तुझाच कित्ता गिरवावा. मुली !

**रमाः**—कधींहि विसरायची नाहीं बरें मी इकडची ही आज्ञा.

**गोपिकाः**—पार्वती, माझ्या माधवाला आणि नारायणाला अंतर देऊं नकोस; मुली, माझ्या नारायणाला सांभाळ; तुझ्याच ओटींत टाकून चाललें आहे बरें मी त्याला ! ( डोळे पुसते. )

**पार्वतीः**—मग जाणारच का आपण आतां ?

**रमाः**—झालाच का मग इकडचा निश्चय कायम ?

**गोपिकाः**—होय; माधवाला आणि नारायणाला भेटून नंतर पर्वतीमातेचें दर्शन घेऊन आजचा मुक्काम पुण्याच्या बाहेर रामवाडी पलीकडे करावयाचा, असें मी ठरविलें आहे. पार्वती, रमे, येतें बरें का मी; कधीं काळीं माझ्याकडून एखादा कमी अधिक शब्द चुकून गेला असल्यास त्याबद्दल कांहींसुद्धां मनांत आणूं नका बरें; माझी आठवण ठेवा; आनंदांत रहा; व नेहमीं इकडची हकीकत कळवीत जा;

माधवाला सांभाळा; नारायणाला जपा; नीट काळजीनें रहा; माधवाच्या प्रकृतीची हेळसांड करूं नका; येतें बरें मी आतां. कुणी पाहिलें आहे पुन्हां भेटी होतात कीं नाहींत हें ! पार्वती, रमे, आनंदांत रहा बरें. ( इतक्यांत श्रीमंत माधवरावसाहेब श्री० नारायणरावासह प्रवेश करतात. )

**माधवः**—आईसाहेब, काय ठरलें मग आपलें ? जाणारच का आपण आम्हाला सोडून ?

**गोपिकाः**—माधवा, तुला हल्लींची एकंदर स्थिति माहीत असूनहि तूं मला येथेंच राहण्याबद्दल उगीच कां बरें आग्रह करतोस ? निदान कांहीं दिवस तरी मला पुणें हें सोडलेंच पाहिजे; मग " जा " असें आनंदानेंच कां नाहीं सांगत बरें ?—नारायणा, तूंहि बरें का ?

**नारा०**—आई, असें कसें बरें तूं म्हणतेस ? आपणाला नानासाहेब सोडून गेले; आपल्या विश्वासदेवाचीहि तीच गत झाली; भाऊकाकांचा अजून पत्ता लागत नाहीं त्यामुळें पार्वतीकाकी आशेनें जीव धरून कसे तरी दिवस कंठीत आहेत; आणि मोठ्या वहिनी तर बोलून चालून माझ्याच वयाच्या ! अशा स्थितींत तुझ्याशिवाय आम्हाला कोणाचा बरें आधार आहे ?

**गोपिकाः**—बाळा, आपणा सर्वांना ईश्वराचा आधार आहे, आणि तोच आपलें नेहमीं संरक्षण करील; माधवा !

**माधवः**—आई !

**गोपिकाः**—तूं स्वतः शहाणा आहेस.

**माधवः**—असेन !

**गोपिकाः**—शूर, करारी व मानी आहेस.

**माधवः**—असेन !

**गोपिकाः**—मुत्सद्दी व कर्तबगार पेशवा म्हणून तूं कीर्ति मिळविशील अशी माझी खात्री आहे.

**माधवः**—असेल !

**गोपिकाः**—तुझ्या पूर्वींच्या लागोपाठच्या तिन्हीं पेशव्यांचे सर्व गुण तुझ्या एकट्यांत पूर्णपणें एकवटलेले आहेत.

**माधवः**—असतील कदाचित् !

**गोपिकाः**—पण आपला मुलगा कितीहि मोठा होवो, त्याच्यांत कितीहि शहाणपण असो, आणि तो जगाला कितीहि वंदनीय होवो, मातेचें निर्मळ प्रेमच इतकें आंधळें असते कीं, तिला आपल्या मुलाला उपदेशाचे दोन शब्द नेहमीं सांगावेसेच वाटतात.

**माधवः**—अक्षरशः खरें आहे.

**गोपिकाः**—वागशील ना मी सांगेन त्याप्रमाणें ?

**माधवः**—वागेन.

**गोपिकाः**—वागशील ?

**माधवः**—आई, हें काय ? असें पुन्हां पुन्हां कां विचारतेस ? तुला अशी शंका कशी आली ? आजपर्यंत मी तुझ्या आज्ञेबाहेर कधीं तरी वागलों आहे काय ?

**गोपिकाः**—नाहीं.

**माधवः**—मातापित्यासंबंधीं मुलाचें कर्तव्य काय असतें, हें आम्हाला तूंच समजावून दिलें असून तें माझ्या पूर्ण लक्षांत आहे.

**गोपिकाः**—लक्षांत आहे ?

**माधवः**—आहे; सर्व ऋणें फिटतात पण मातृऋण कधींहि फिटत नाहीं, हें शास्त्रवचन अक्षरशः खरें आहे; आणि तुझ्या आज्ञेप्रमाणें व तुझ्याच इच्छेनुरूप वागण्यास मी नेहमीं तत्पर असूनहि मातेसंबंधींच्या पुत्र या नात्यानें करावयाच्या कर्तव्यांत कोठें चूक तर होत नाहींना ? अशी मनाला शंका येऊन त्या बाबतींत मी तुलाच नेहमीं विचारीत आलों आहें, हें नाहीं का तुझ्या ध्यानांत ?

**गोपिकाः**—माधवा, तूं आणि रमा नेहमीं माझ्या आज्ञेंत राहतां, ही गोष्ट खरी आहे; पण मुलगे; आणि सुना, कर्त्यासवरत्या झाल्यावर, वडील मनुष्यांनींच आपला मान ठेवून घेण्यांत शहाणपण असतें; आणि त्यांतूनहि माझ्यासारख्या निराधार स्त्रियांनीं तरी निदान आपला मान आपण होऊनच राखून घेण्यांत गोडी राहते. ( गहिंवरते. )

**माधवः**—आई, मी आणि नारायणासारखे तुझ्या आज्ञेंत नेहमीं तत्पर राहणारे मुलगे, आणि पेशवाईचें-मराठा साम्राज्याच्या सूत्रचालक पंतप्रधानकीचें—

सर्व ऐश्वर्य, तुझ्या पायाशीं लोळत असतांना तूं आपणाला निराधार, असें कां म्हणवून घेतेस ? आमच्यावर नाहीं का तुझी सत्ता ?

**गोपिका:**—नाहीं–आहे; पण ती तुम्हीहोऊन खुषीनें चालवून घ्याल तरच ! माधवा, माझ्या सत्तेचें माणूस जगांतून कायमचें नाहींसें झालें रे नाहींसें झालें ! ( डोळे पुसते. )

**माधव:**—आई, हें कायग ? उगाच नाहीं त्या झाल्या गेल्या गोष्टी मनांत आणून दुःख करून घेतेस ? आई, नानासाहेब तर गेलेच, पण त्यांच्या पायांचें स्मरण करून सांगतों कीं, आम्ही तुझ्या आज्ञेबाहेर कालत्रयींहि जाणार नाहीं; इतकेंच नव्हे, पण तुझी आज्ञा होत असेल तर पेशवाईच्या ह्या वैभवावर पाणी सोडून गंगातीरीं तुझ्या सेवेंत निरंतर कालक्रमणा करण्यासहि मी तयार आहे: आपला नारायण सांभाळील पेशवाई मी तुझ्याबरोबर तिकडे आलों तरीं ! येऊ का ? येऊ का मी ?

**गोपिका:**—नको; तुम्ही येथेंच राहून पतकरलेल्या व्यवसायाप्रमाणें आचरण करा; माधवा, तुम्ही जरी माझ्या आज्ञेप्रमाणें वागत असलांत तरीहि तुमच्यावर माझी वास्तवीक सत्ता नाहीं, हें माझें म्हणणेंच अगदीं खरें व यथार्थ आहे ! माधवा, स्त्रियांची खरी सत्ता आपल्या पुत्रावर नसून आपल्या पतीवर असते. मुलाच्या राज्यांतील पंचपक्वान्नांपेक्षां नवऱ्याच्या झोंपडींतील मीठभाकरीच त्यांनां अधिक प्रिय असते, आणि वेळेला कापले तरी पण अखेर आपलें त आपलेंच, या हक्काच्या प्रेमानें पतीमागून आपत्यें, अधिकार, आणि ऐश्वर्य, हीं असलीं तरीहि आपण निराधार झालों, आपल्या घरचें, आपल्या जन्माच्या संबंधाचें, सप्तपदीच्या सात गांठींनीं झालेलें आपल्या हक्काचें, माणूस गेलें, आणि–आणि आपणाला पोराच्या–म्हणजे परक्याच्याच–तोंडाकडे पहात राहण्याचा दुःखद प्रसंग आला, असें मनांत येऊन कुलस्त्रियांना नेहमीं अतिशय दुःख होत असतें. माधवा, हे सारे सोहाळे माझ्या नशिबीं होते, म्हणूनच मी मागें जिवंत राहिलें बरें ? ( डोळे पुसते. )

**माधव:**—आई, अशानें कांहीं तरी फायदा होईल काय ? म्हणून म्हणतों, आमच्याकडे पाहून, थोडेंतरी कां होईना, मनाचें समाधान करून घेत जा; आई,

आम्ही दोघे तरी अजून हयात आहोंत, हीच निदान ईश्वरी कृपा आहे, असें तूं कां मानीत नाहींस ? मी नानासाहेबांच्या लौकिकांत भर घालीन वरें आई !

**गोपिका**—माधवा ऐक; तिकडच्यांच्या लौकिकांत तूं भर घालावीस, आणि तुझी दिगंत कीर्ति व्हावी, म्हणून, मी तुला आतां एका समशेरबहाद्दर पेशव्याची सून, एका राजकार्यधुरंधर पेशव्याची स्त्री, आणि एका शूर, मुत्सद्दी, करारी, व कर्तबगार, पेशव्याची माता, या नात्यानें उपदेश करीत आहें, तो नीट लक्षांत ठेवून वागत जा, म्हणजे तुझें कल्याण होईल, पेशवे घराण्याची कीर्ति दिगंत पसरेल, आणि साम्राज्याच्या दौलतीस बरकत चढेल; ठेवशीलना–ठेवशीलना लक्षांत ?

**माधवः**—होय ठेवीन.

**गोपिकाः**—रावसाहेब मामंजीच्या वेळेपासून आपल्या आश्रयानें मोठे झालेल्या शिंदे, होळकर, वगैरे एकनिष्ठ व इमानी सरदारांनां न दुखवितां त्यांच्या साह्यानें दौलतीची कार्यें करून घे.

**माधवः**—घेईन.

**गोपिकाः**—" साम्राज्याचा नेता " या दृष्टीनें आपल्या कर्तव्याची नेहमीं दिशा ठरवून त्याप्रमाणें वर्तनक्रम ठेव.

**माधवः**—ठेवीन.

**गोपिकाः**—मराठा सरदारमंडळाच्या जुटीच्या बळांतील तूं एक आद्य-प्रवर्तक आहेस, आणि साम्राज्याचा मानमरातब, व इभ्रतइज्जत, आणि त्यांतील प्रजेचें सुखदुःख, हीं निव्वळ तुझ्या कृतीवरच अवलंबून आहेत, हें लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागत जा.

**माधवः**—वागत जाईन.

**गोपिकाः**—ऐक, माधवा ऐक; तूं स्वतः शहाणा आहेस; राजकारणांतील तुझें ज्ञान माझ्याहून अधिक असेल; राजनीतींतील तुझी मुत्सद्दीगिरी थक्क करण्या-इतकी श्रेष्ठ असेल; तुझ्यांत साडेतीन शहाण्यांना पुरून उरण्याइतकी करडी करामत असेल; पण–पण माधवा, माझी तुला अशी निक्षून आणि कळकळीची आज्ञा आहे, कीं, तूं आपल्या घरांतील भाऊबंदकी मिटविण्याचा पुन्हां एकदां प्रयत्न कर; बापूंना एकटेंच दादासाहेबांकडे पाठीव; पाठविशील ना ? पाठविशील ना ?

**माधवः**—होय; पाठवीन.

**गोपिकाः**—आणि इतकें करूनहि ते आपला आग्रह नच सोडतील–आपल्या घरांत पेशवाई यावी म्हणून निझाम व भोंसले यांचेकडेस मदत मागण्याचें व साम्राज्यांत फूट पाडण्याचे जसे त्यांनीं पूर्वी प्रयत्न केले, तशाच प्रकारच्या त्यांच्या भावी प्रयत्नांमुळें साम्राज्याच्या मुळावरच कुऱ्हाड पडण्याचा संभव आहे, अशी तुझी पूर्ण खात्री होईल–तर मराठा साम्राज्याच्या कल्याणाकरितां–आणि पेशवाई जिवंत रहावी म्हणून, तूं होऊनच पंत प्रधानाची पेशवाई, एखाद्या त्रयस्थाच्या घशांत जाण्याऐवजीं, दादासाहेबांच्या घशांत घाल, आणि नारायणासह माझ्याजवळ गंगातीरीं येऊन ईश्वरचिंतनांत काळ घालीव.

**माधवः**—माझ्यांत धमक नाहीं काय ? आयत्या पिटावर रेघा ओढणारा मी दादासाहेब आहे काय ?

**गोपिकाः**—नाहीं.

**माधवः**—आमच्या बापदाद्यांनीं अत्यंत सायासानें मिळवून भावी पिढीच्या ताब्यांत तींत भर घालून देण्याकरितां–निदान आहे तशी तरी तिची सुरक्षितपणें जतणूक करून भावी वंशाच्या हक्कदार वारसाच्या हवालीं करण्याकरितां, जी अमोल्य ठेव आमच्या जिमेवर सोंपविली, तिच्यावर आपलीच मालकी असली पाहिजे, नाहीं तर तिचे तुकडे तुकडे झाले, अथवा ती तिऱ्हाइताच्या घशांत गेली, तरी बेहेत्तर, पण खऱ्या वारस असलेल्या आपल्या वडील घराण्याला ती केव्हांहि पचूं देणार नाहीं, असल्या क्षुद्र व वंशच्छेदी वृत्तींचा मी तो दादासाहेब नव्हें; दुसरी–दुसरी पेशवाई निर्माण करीन.

**गोपिकाः**—माधवा !

**माधवः**—आई !

**गोपिकाः**—माझ्यावर किनई एकामागून एक सारखे दुःखाचे डोंगर कोसळत आले आहेत बरें आजपर्यंत ! ( डोळे पुसते. )

**माधवः**—( दुःख आंवरून तडफीनें ) असतील; मग आतांच काय त्याचें ?

**गोपिकाः**—बाळा माधवा, मी किनई फार पोळलेली आहे बरें !

**माधवः**—असशील; मग आतांच कशाला त्याची आठवण !

**गोपिकाः**—माधवा, बोल्‌ का ? बोल्‌ का ? ( डोळे पुसते )

**माधवः**—असें काय बरें करावें आई !

**गोपिकाः**—बोल्‌ का, माधवा बोल्‌ का ?

**माधवः**—म्हणजे ?

**गोपिकाः**—माधवा, कसें बोल्‌ रे ? माझ्या किनई आपलें काईनाबाई भलतें-सलतेंच मनांत येतें रे ! बोल्‌ का; बाळा माधवा, बोल्‌ का ?

**माधवः**—म्हणजे काय ?

**गोपिकाः**—माधवा, तुझे एक एक गुण आठवूं लागले म्हणजे किनई माझ्या पोटांत कसें अगदीं भडभडून येतें रे ! तुझें वय तें काय, पण तुझ्यांत किती तरी अधिक शहाणपण आहेरे त्या मानानें ! माझ्या बाळाच्या गुणांचें मी किती वर्णन करूं ?

**माधवः**—पण आत्तां काय करायचें आहे त्याच्याशीं ?

**गोपिकाः**—बोल्‌ का; माधवा बोल्‌ का ?

**माधवः**—म्हणजे ? काय म्हणतेस ?

**गोपिकाः**—अरे तसें नव्हेरे; मला आपले वाटतें—

**माधव**—काय, काय वाटतें ?

**गोपिकाः**—माधवा—

**माधवः**—आई—

**गोपिकाः**—कसें होईल रे बाबा आमचें ? तुझ्यासारखें रत्न तरी आमच्या नशिबीं लाभण्याचें आहे का ? तूं तरी माधवा—अगआई, देवा, काय करशील तें खरें रे बाबा ! माधवा, बाळामाधवा, अरे मला किनई—भेट तरी होईल का पुन्हां तुझी; मी किनई काय सांगूं तुला—दिसेल का माझें बाळ मला पुन्हां—कशी माझ्या बाळाला कीड—आईआई, नको, मला नकोच आतां येथें रहायला; आणखी कांहीं भलतें सलतें माझ्या देखत......

**माधवः**—आई, मग तूं काय ठरविलेंस ? जाणारच का मग तूं ?

**गोपिकाः**—नाहीं;—हो,—होय, जाते, निघणारच आतां ! माधवा, मी सांगितल्याप्रमाणें वागत जा; मुली, माझें सांगणें लक्षांत ठेव; पार्वती, ह्या सर्वांस नीट

सांभाळ; माधवा, रमेस अंतर देऊं नकोस; रमे, माधवाच्या प्रकृतीची विशेष काळजी घे; त्याला फार जपत जा; नारायणा, सर्वांची मर्जी सांभाळून वाग; माधवाला सुख द्या; रमे, आतां नारायणाची आई तूंच असें समजून त्याचा प्रतिपाळ कर; तुम्ही सर्वजण नारायणाला सांभाळा; अगदीं वजावून सांगते आहे वरें का मी हें तुम्हा सर्वांनां; आपल्या घरांत सर्वांत लहान म्हणून तिकडचाहि विशेष लळा असून त्याच्याबद्दल नेहमीं खंती वाटत असे, म्हणून म्हणते, त्याला कोणीहि अंतर देऊं नका वरें ? पार्वती, रमे, माधवा, नारायणा, येते वरें मी आतां ? ( इतक्यांत एक दासी येते. )

**दासी:**—मेणा तयार आहे आईसाहेब.

**गोपिका:**—ठीक आहे, ही निघालेच मी; ( दासी जाते ) माझें सांगितलेलें विसरूं नका वरें तुम्ही ! माधवा, सांभाळ वरें सर्वांना ? रमा येते वरें मी आतां ! नारायणा, आनंदांत रहा वरें का ! पार्वती, विसरूं नकोस मी सांगितलेलें ! पुन्हां सांगतें, नारायणाला जपा वरें; पार्वती, रमे, माधवा, नारायणा, येतें वरें मी आतां ? (डोळे पुसते; सर्वजण तिच्या पाया पडतात; गोपिकाबाई अनुक्रमें दोघींस " अष्ट पुत्रा सौभाग्यवतीभव " असा, आणि उभयतां मुलांस " चिरंजीव भव " असा आशीर्वाद देतात पडदा पडतो. )

# प्रवेश ] अंक तिसरा [ पहिला.

( स्थळ:—पेशव्यांचा शनिवार वाडा; दरवार; एकावाजूस सखारामवापू, नानाफडणवीस, व कानडे, आणि दुसऱ्या वाजूस शिंदे, फडके, व रास्ते, वसलेले असून मध्यें श्रीमंत माधवरावसाहेव वसलेले आहेत, असा पडदा उघडतो. )

**माधव:**—सरदारहो, माझ्या हातीं पेशवाईची अधिकारसूत्रें आल्या वेळीं पहिल्यानें ह्याच ठिकाणीं भरविण्यांत आलेल्या दरबाराचें आपणास स्मरण असेलच ! तथापि त्यानंतर पुन्हां इतक्या लवकर दुसऱ्यानें दरवार भरविण्याचा प्रसंग येईल, अशी माझी खात्री नसूनहि तो आला, यावद्दल मला फार आनंद वाटत आहे; आणि तत्कालीन परिस्थिति व सद्यस्थिति, यांची तोंड मिळवणी घेतां तसा आनंद वाटणेंहि स्वाभाविकच आहे; राजकीय रंगभूमीवर वर्चस्वाचें वक्षीस मिळविण्याकरितां आमच्या विरुद्ध जे जे प्रतिस्पर्धी सामन्याला पुढें आले, त्या त्या सर्व दुष्मनांना आम्ही आतां आमचे दोस्त वनविलेलें आहे; राजकीय चित्रपटावर आजच्या घटकेस मराठ्यांच्या भगव्या निशाणाची मोहरीं चोहों-कडे व प्रत्येक महत्वाच्या ठिकाणीं साम्राज्यशक्तीच्या आकर्षणाच्या दुजो-ऱ्यांत निर्धास्थपणें प्रमुखत्वानें झळकत आहेत; आणि आज मराठ्यांचा चोहों-कडे जयजयकार झालेला आहे; तुमच्या सर्वांच्या मदतीनें राक्षस भुवन येथें निझामाचा पराभव झाल्यानंतर हैद्राबादकर आतां आमचे अत्यंत प्रवळ साह्यकारी व मदतगार इमानी दोस्त वनलेले आहेत; कर्नाटक प्रांतावरील स्वारीनें तिकडील प्रदेश हस्तगत होऊन आमचा महत्वाचा फायदा झालेला आहे; म्हैसूरकरावर केलेल्या लागोपाठच्या तीन स्वाऱ्यांनीं हैदरनाईक नरम येऊन त्यानें आपणाशीं आपण होऊन तह केला आहे; उत्तरेकडील स्वारीनें रजपूत व जाट यांचेपासून आपले साम्राज्य हक्क वसूल होऊन, रोहिलखंड मराठ्यांच्या संरक्षक हक्काच्या कक्षेंत आलेलें आहे; आणि दिल्ली कावीज होऊन व ताब्यांत ठेवून, तेथील तख्तावर--दिल्लीपतीच्या बादशाही तख्तावर--शहाअलम यांस मराठ्यांच्या सैन्यानें

व शस्त्रानें प्रस्थापित करण्यांत आलें आहे. सरदारहो, साम्राज्याच्या अकल्पनातित भरभराटीचे व उत्कर्षाचे असे प्रसंग क्वचितच येत असल्यानें--आणि विशेषतः पानपत येथें मराठ्यांनां जबरदस्त ठोकर बसली असून त्या अनर्थकारक प्रसंगांतूनहि मराठ्यांनीं पुन्हां वर डोकें काढून आपली कर्तबगारी मोठ्या शर्तीनें त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या व जगाच्या निदर्शनास आणून दिली असल्यानें— " मराठ्यांचा इतिहास " या दृष्टीनें ह्या गोष्टीचें अत्यंत महत्व आहे. सरदारहो, तुम्हीं सर्वांनीं मला हें महत्कार्य तडीस नेण्यांत मनापासून व अविश्रांत मदत केलीत, याबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहें; आणि अशाच रीतीनें तुम्ही सर्व एकदिलानें व एक जुटीनें साम्राज्याच्या उद्दिष्ट कार्याला नेहमीं मदत करीत जाल, अशी मला पूर्ण आशा आहे. (नानाकडे वळून) नाना, आजच्या दरबारांत शिल्लक राहिलेलीं महत्वाचीं कामें क्रमाक्रमानें निकालाकरितां माझ्या-पुढें मांडा.

**नाना:**—ठीक आहे सरकार; निझामाकडील खलिता आला त्यांत " खंडणीची बाकी तूर्त पाठविण्यास सवड नसल्यानें निकड लावूं नये, आम्ही त्याच तजविजींत आहोंत, आणि लवकरच राहिलेल्या बाकीतील निदान अर्धी तरी रक्कम खात्रीनें पाठविण्यांत येईल, " असें लिहिलेलें असून या बाबतींत पुणें दरबाराची मान्यता मिळण्याबद्दल विनंति केली आहे; सरकारची आज्ञा होईल, त्याप्रमाणें हैद्राबाद दरबारीं जबाब पाठविण्यांत येईल.

**माधव:**—नाना, मला वाटतें निझामाकडील खंडणीपैकीं अर्धाअधिक रक्कम आपणास आजपर्यंत आदा झाली आहे; खरें आहे का माझें हें म्हणणें ?

**नाना:**—होय सरकार; पण राहिलेली बाकी ही बऱ्याच मोठ्या रकमेची आहे.

**माधव:**—कांहीं हरकत नाहीं. नाना, तुम्ही त्या खलित्याचें असें उत्तर लिहा, कीं, " तुमचा आमचा तह होऊन उभयतांची आतां दिलजमाई झालेली असल्यानें खंडणीच्या बाकीबद्दल आम्ही तुम्हास निकड लावूं इच्छीत नाहीं; व्यापक प्रमाणावरील मोहिमांच्या खर्चामुळें आमच्या दौलतीस बरेंच कर्ज झालें असल्यानें राहिलेल्या खंडणीची बाकीच फक्त नव्हे, पण त्याशिवायहि आणखी सांपत्तिक मदत तुमच्याजवळ आमचे स्नेही या नात्यानें मागण्याचा आम्हास पूर्ण हक्क आहे. तथापि आम्ही आमच्या दोस्त सरकारावर एवढें मोठें

संकट घालूं इच्छित नाहीं; फक्त आमची राहिलेली बाकी—निदान अर्धी रक्कम—आपण हा खलीता पोंचल्यावर शक्य तितक्या लवकर पाठविण्याची तजवीज करा एवढीच विनंति करतों;" नाना !

**नाना:**—सरकार.

**माधव:**—तांदळजाच्या लढाईत विठ्ठल सुंदर मारले गेल्यानें निझामाप्रमाणेंच आपणालाहि दुःख वाटणें स्वाभाविक आहे; त्यांच्या मृत्यूनें साडेतीन शहाण्यांतील एक व्यक्ति नाहींशी झाली; निझामाच्या दौलतीचा एक आधारस्तंभ कामीं आला, आणि कुटुंबांतील कर्त्या पुरुषाच्या अभावीं त्यांच्या मुलांमाणसांना कष्टप्रद स्थितींत आयुष्य कंठण्याचा दुःखप्रद प्रसंग आला ! नाना !

**नाना:**—सरकार.

**माधव:**—"दाणा दुष्मन पुरवतो पण दिवाणा दोस्तहि परवडत नाहीं" अशी जी एक आपल्यांत म्हण आहे, ती अक्षरशः खरी असून त्याप्रमाणेंच म्हणावयाचें म्हणजे आमच्याच घरांतील दिवाण्या दादासाहेबांपेक्षां हैद्राबादकरांच्या पदरचे दिवाण विठ्ठल सुंदर यांचीच योग्यता अधिक ठरते; नाना, या बाबतींत निझामास स्वतंत्र याद लिहून त्यांनां मुलें माणसें कोण कोण आहेत व त्यांच्या चरितार्थाबद्दल आपल्या हैद्राबाद दरबारांतून काय तजवीज करण्यांत आली आहे, याबद्दल खुलासा मागविण्यास मी तुम्हास सांगितलें होतें; काय झालें त्याचें पुढें ?

**नाना:**—आज्ञेप्रमाणें खुलासा मागविला असून हैद्राबाद दरबारच्या यादींत असा मजकूर आहे कीं, " दिवाण विठ्ठल सुंदर यांचें घरांत कोणीहि कर्ता मनुष्य नाहीं; त्यांचें कुटुंब आणि तीन मुलें आहेत; त्यांच्या चरितार्थाबद्दल इतकेंच नाहीं, तर त्यांनां योग्य इतमामानें राहतां येईल अशाबद्दल हैद्राबाद दरबाराकडून तजवीज करण्यांत आलेली आहे, आणि वडील मुलाच्या अज्ञानावस्थेंत मिळकतीची व उत्पन्नाची, मुलांच्या मातोश्रींच्या सम्मतीनें व देखरेखीखालीं व्यवस्था ठेवण्यास या दरबारच्या एका लायक व अनुभवी मनुष्याची नेमणूक करण्यांत आली आहे."

**माधव:**—नाना, अशारीतीनें हैद्राबादकरांनीं विठ्ठल सुंदर यांच्या कुटुंबाचा परामर्ष घेणें, स्वाभाविक असलें तरी तुम्ही या बाबतींत माझ्या तर्फे खाजगी स्वरूपाची एक याद लिहून निझामाचें गौरवपूर्वक अभिनंदन करा: आणि अशीहि विनंति करा कीं, प्रसंगविशेषीं सांपत्तिक मदतीची जरुरी लागल्यास किंवा इतर

कांहींहि अडचण उत्पन्न झाल्यास आमच्या दरबारांस कळविल्यास इकडूनहि योग्य तो विचार अवश्य केला जाईल, ह्या गोष्टीची आपले दरबारीं मेहेरबानीनें नोंद ठेवून त्याची समज विठ्ठल सुंदर यांचे कुटुंबासहि देण्यांत यावी.

**नाना:**—ठीक आहे सरकार.

**माधव:**—नाना, भोंसल्याकडील वर्तमान ?

**नाना:**—श्रीमंतांच्या इच्छेप्रमाणें भोंसल्याबरोबर आपला तह झालेला आहे, पण त्याची अजून समाधानकारक रीतीनें पूर्तता झालेली नाहीं; या बाबतींत पुढील तजविजीबद्दल काय ती आज्ञा व्हावी.

**माधव:**—नाना, भोंसल्याशीं झालेला तह डळमळीत स्थितींत राहण्याचें कारण आलेंच असेल तुमच्या ध्यानांत ?

**नाना:**—चोरवडे कीं काय ?

**माधव:**—होय, साडेतीन शहाण्यांतील देवाजीपंत भोंसल्याच्या दरबारीं आहेत, आणि त्यांच्याच सल्लामसलतीनें नागपूरदरबार चालत असल्यानें कारस्थानांत मुरलेल्या ह्या पटाईत व्यक्तीनें धरसोडीचें दुटप्पी वर्तन ठेवून आम्हास चकविण्याचा घाट घातला आहे; ठीक आहे; आपणही कांट्यानेंच कांटा काढिला पाहिजे. नाना, तुम्ही आजच्या आज वऱ्हाडच्या राजाला माझ्यातर्फे आणि नागपूर दरबारला आपल्या दरबारतर्फे, थैली रवाना करा, आणि झालेला तह मुस्तक्कीम करण्याकरितां भोंसल्यांनीं देवाजीपंतासह पुणें येथें तावडतोब यावें, अशी माझी इच्छा असल्याचें त्यांनां कळवा; ( इतक्यांत एक हुजऱ्या येऊन मुजरा करतो व एक मोहोरबंद लखोटा नानाच्या हातीं देतो व मुजरा करून निघून जातो. )

**नाना:**—( लखोटा फोडून व वाचून ) सरकार, म्हैसूरकराची अशी आग्रहाची विनंति आहे कीं, पुणेंदरबारनें मद्रासकराविरुद्ध आम्हास मदत करावी, आणि त्याच्या बदल्यांत आम्ही पुणें दरबारास, त्यांच्या दौलतीचें सर्व कर्ज फिटेल, इतकी सांपत्तिक मदत करण्याची हमी घेतों; इतकेंच नाहीं पण श्रीमंतांची इच्छा असेल तर—

**माधव:**—पुरे, नाना, पुरे; हैदरचा हा कावा न समजण्याइतकें पुणें दरबार नादान आहे, असें म्हैसूरकरांना वाटतें काय ? लाचाच्या लालचीनें अन्यायाची आगळीक करून स्वतःची तुंबडी भरण्याइतका मराठादरबार अधोगतीस

पोहोंचलेला आहे असें हैदर यांस वाटतें काय ? म्हैसूरकर आपल्या मनांत काय समजतात ? नाना, हैदरनाइकाला स्पष्ट लिहा कीं, मद्रासकर म्हणा, का मुंबई-वाला म्हणा, टोपीवाल्या कंपनीचा आणि आमचा स्नेह असून तो निरंतर कायम राहून वृद्धिंगत होत जावा, अशी आमची इच्छा असल्यानें आमचेकडून तुम्हास ह्या वेटवाल्यांचे विरूद्ध केव्हांहि मदत मिळणार नाहीं, आणि जोंपर्यंत कंपनीवाले आमच्या हक्कांत आणि हद्दींत ढवळाढवळ करीत नाहींत, तोंपर्यंत आपण होऊन तुमच्या नादीं लागून आमच्या होऊं घातलेल्या नव्या दोस्ताची आगळीक करणें, अथवा नसती कुरापत काढणें, नीतिदृष्ट्या केव्हांहि योग्य होणार नाहीं. नाना, खरें कीं नाहीं हें माझें म्हणणें ?

**नाना:**—खरें आहे सरकार.

**माधव:**—शिवाय ज्यानें पूर्वी आमच्याजवळ निझामाविरूद्ध मदत मागितली होती, अथवा जो आज कंपनीकराविरूद्ध आमच्याकडे मदतीची याचना करीत आहे, त्याच हैदरनें आमच्या विरूद्ध पूर्वी हैद्राबादकराकडे व कंपनीवाल्याकडेहि मदतीचा मनसुवा घडवून आणण्याचें कारस्थान केलेलें होतें.

**नाना:**—पण सरकार, पुढें मागें कंपनीवाल्यांनीं जर आपल्या हक्कांत अथवा हद्दींत अन्यायानें अतिक्रमण केलें, अथवा करूं म्हटलें तर ?

**माधव:**—तर-तर त्याचा प्रतिकार करण्यास मराठयांची जिवंत शक्ति पूर्ण-पणें समर्थ आहे. नाना !

**नाना:**—सरकार.

**माधव:**—घोरपडयांना व पटवर्धनांना असें वजावून लिहा कीं, म्हैसूरकराला हैद्राबादकर निझामाविरुद्ध, अथवा मद्रासकर टोपीवाल्याविरूद्ध बिलकुल आश्रय देऊं नये, अथवा कोणत्याहि प्रकारची मदत करूं नये. ( इतक्यांत एक हुजऱ्या येतो व मुजरा करून एक मोहोरबंद लखोटा नानाजवळ देतो व जातो. )

**नाना:**—( तो फोडून वाचून दुःखद मुद्रेनें ) सरकार, अनिष्ट बातमी ! होळकरशाहीवर घाला पडला ! दौलतीचा एक आधारस्तंभ गेला ! आपले वृद्ध सुभेदार—

**माधवः**—समजलों–नाना समजलों! आमच्या दौलतीला सुखाचे दिवस कधींहि फार काळपर्यंत लाभूं नयेत, असाच ईश्वरी योगायोग खडतर आहे कीं काय नकळे! सुभेदारांसारखे गादीचे एकनिष्ठ सरदार आमच्यांतून गेल्यामुळें मराठ्यांच्या जुटीचेंबळ कमकुवत झालें; त्यांचा काल होण्यानें आमच्यांतील एक जबाबदार नेता नाहींसा झाला, आणि आम्ही दुर्दैवानें आमच्या एका अनुभवी हितचिंतकास कायमचे अंतरलों! नाना, होळकरांच्या घराण्यांतील दुःखपरंपरा मनांत आली म्हणजे खिन्नतेनें तेच तेच विचार पुन्हां पुन्हां मनांत घोळून कांहींहि सुचेनासें होतें. नाना, सुभेदारांच्या दुःखपरंपरेंत काय बाकी राहिली होती?

**नानाः**—सरकार, पुत्रशोकानें त्यांच्या मनाला इतका जबरदस्त धक्का बसला होता कीं, त्या वेळेपासून त्यांच्या तोंडावरील तजेला पार नाहींसा झाला! आणि सदोदित त्यांच्याजवळ असणाऱ्यांनीं सुद्धां त्यांना कधींहि आनंदांत असतांना पाहिलेलें नाहीं!

**माधवः**—पुत्रशोकानंतर आनंद मानून घेण्याला–निदान समाधानी तरी राहण्याला सुभेदारांनां कोणचा आधार शिल्लक राहिला होता? बरोबरीच्या कर्त्या मुलाचा मृत्यु पहाण्याला जिवंत रहाणारा बाप खरोखरच हतभागी होय! नाना, होळकर दरबारच्या यादींत आणखीं काय काय लिहिलेलें आहे?

**नानाः**—सरकार, देवी अहिल्याबाईची अशी विनंति आहे कीं, "सुभेदारांच्या मागें आमच्या घरांत कर्ता मनुष्य नसल्यानें दौलतीचा कारभार मी स्वतः तुकोजीरावाच्या मदतीनें पहाणार असून, त्यास श्रीमंतांची अनुमति असावी; आणि सुभेदार हयात असतांना जसे आपले आमच्या घराण्याशीं संबंध होते, तसेच ते कायम ठेवून आम्हास आपलेकडून हरेक प्रसंगीं मदत व मसलत मिळत जावी; आम्ही दौलतीशीं किती एकनिष्ठ आहोंत, हें आलमदुनियेस माहीत असून सुभेदारांचें तुकोजीवर किती प्रेम होतें, हेंहि श्रीमंतांस पूर्णपणें विदित आहेच."

**माधवः**—नाना, सुभेदारांच्या मागें होळकर दरबारास प्रत्येक प्रकारची मदत करणें, व मसलत देणें, आणि त्यांची कीर्ति व दौलत कायम राहील अशी तजवीज करणें, हें आपलें कर्तव्य आहे; नाना, होळकर दरबाराला लिहा कीं, "तुम्ही केलेल्या व्यवस्थेस आमची पूर्ण संमती आहे! इतकेंच नाहीं तर तुम्हास लागेल ती मदत

मसलत देण्यास आम्ही केव्हांहि आनंदानें तयार आहोंत. " नाना, याशिवाय तुकोजीला एक स्वतंत्र यादी लिहा, आणि असें वजावून कळवा कीं, " सुभेदारांची दौलत सांभाळण्याची सर्व जवाबदारी आतां तुमच्यावर येऊन पडलेली आहे, आणि तुम्ही बाईच्याच आज्ञेप्रमाणें व अनुमतीनें कारभार चालवून सुभेदारांचें नांव राखाल, अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. "

**नानाः**—ठीक आहे सरकार!

**माधवः**—नाना, आणखी कांहीं ?

**नानाः**— होय सरकार! श्रीमंत दादासाहेबासंबंधीं आपल्या आज्ञेप्रमाणें तजवीज झालेली आहेच; पण ही बावत दरबारच्यावेळीं पुन्हां एकदां आपणासमोर मांडण्याविषयीं मला आज्ञा झाली होती, त्यावरून विनंति कीं, या बावतींतहि मर्जीनुरूप आज्ञा व्हावी.

**माधवः**—नाना, दादासाहेबांनां जरी नाइलाजानें प्रतिबंधांत ठेवावें लागलें, तरीहि त्यांच्या बावतींत इतका कडक उपाय योजावा लागल्याबद्दल मला नेहमीं मनापासून वाईट वाटत असतें, ही गोष्ट तुम्हाला माहीत आहेच. नाना, मला वाटतें, पुन्हां एकदां बापूंना दादासाहेबांकडेस पाठवावें, आणि आपसांतलि हा कलह मिटता घेण्याविषयीं त्यांनां पुन्हां विनंति करून कांहीं उपयोग झाला तर पहावा! नाना, पाठवूं का बापूंनां दादासाहेबाकडेस ? होईल का कांहीं उपयोग ? काय मत आहे तुमचें ह्या बावतींत ?

**नानाः**—श्रीमंतांचा हा विचार अगदीं योग्य आहे. उपयोग होवो, किंवा न होवो—दादासाहेब आपला दुराग्रह सोडोत, अथवा न सोडोत—पण आपल्याकडून आपण तरी अखेरपर्यंत हा गृहकलह मिटता घेण्याविषयीं—व मिटविण्याविषयीं—शक्य ते प्रयत्न करण्यांत काडीचीहि कसूर केली नाहीं, एवढें तरी समाधान मानण्यास आपणास जागा राहील; श्रीमंतांनीं या बावतींत बापूंनां काय ती आज्ञा करावी.

**माधवः**—( बापूंकडे वळून ) बापू, दादासाहेब ह्हाला पेटल्यामुळेंच आम्हाला त्यांच्याशीं आमच्या इच्छेविरुद्ध निष्ठुरपणानें वागणें भाग पडलें, ही गोष्ट तुम्हांस माहीत आहे; शेवटीं केलेल्या प्रयत्नांत तुम्हींहि भाग घेतलेला आहे, आणि असें जरी आहे तरीहि मला वाटतें, दादासाहेबांना अशाच स्थितींत ठेवण्यापासून

दौलतीस अपाय होण्याचें टळलें, तरी तें आमच्या लौकिकास अत्यंत अपायकारक आहे. खरें आहे कीं नाहीं बापू ?

**बापूः**—आहे–असेल ! पण ही बाबतच मुळीं इतकी नाजूक आहे कीं, आमच्या सारख्या त्रयस्थांनां स्वतःचें खरें मतहि नुसतें देतांना सुद्धां अत्यंत सावधगिरी ठेवावी लागते ?

**माधवः**—असें कां व्हावें ?

**बापूः**—वडया लोकांच्या आपसांतील परमावधीस गेलेल्या चुरशीच्या खडाजंगी सामन्यांतील झुंजींत–आणि दोन जबरदस्तांच्या विकट व चिवट हातघाईच्या झगड्यांत–आमच्यासारख्या गरीब तिऱ्हाइतांनीं सोनेरी कांट्याच्या मोजमापानें अगदीं भीत भीत व जपून दिलेलें आपलें खरें मत प्रसंगीं स्वतःचीच मान आजिबात घालविण्यास कारणीभूत होऊं नये, या गोष्टीबद्दलाहि अत्यंत खबरदारी घ्यावी लागते म्हणून;

**माधवः**—बापू, तुमचें मत द्या.

**बापूः**—तथापि दादासाहेबांनां अशाच स्थितींत दिवस कंठीत ठेवणें केव्हांहि सुखावह आणि सुरक्षित नसल्यामुळें या बाबतींत कांहीं तरी तडजोड व्हावी, अशी दौलतीच्या प्रत्येक हितचिंतकाची इच्छा असणें स्वाभाविक आहे.

**माधवः**—आपणहि दौलतीच्या हितचिंतकांपैकींच एक अहांत कीं नाहीं बापू ?

**बापूः**—होय, आहें.

**माधवः**—तर मग तुम्हीच दादासाहेबाकडे जा; समेटाची शिकस्त करा; आणि तशी त्यांची तयारी असल्यास, पेशवाईचीं अधिकारसूत्रें नाहींत, पण आणखीहि कित्येक अधिक सवलती देण्यास आम्ही तयार आहोंत, अशी त्यांची खातरजमा करा.

**बापूः**—पण पेशवाईचीं अधिकारसूत्रें हातीं मिळण्याशिवाय, अथवा चालविण्याचें हातीं दिल्याशिवाय इतर कोणत्याहि सवलतींनीं दादासाहेब समेट करण्यास तयार होतील, असें मला वाटत नाहीं.

**माधवः**—तुम्हींच आपण होऊन पहिल्यानें तसें कां ध्वनित करतां ? बापू, दादासाहेब जर कोणत्याहि भानगडी केल्याशिवाय स्वस्थ बसण्याचें कबूल करीत

असतील, तर त्यांची प्रतिबंधांतून मुक्तता करून त्यांचा पूर्वीसारखा मानमरातब ठेवण्यास मी तयार आहें; इतकेंच नाहीं तर त्यांच्या हातीं कारभाराच्या कांहं दुय्यम दरजाच्या बाबी सोंपविल्यानें त्यापासून साम्राज्याच्या सचोटीला व अभंग त्वाला यत्किंचित्हि बाध येणार नाहीं, इतका त्यांच्या वर्तनक्रमांत माननीय फरक झाला आहे, अशी त्यांनीं आपल्या सलोख्याच्या व सरळ वागणुकीनें माझी खात्री करून दिल्यास, तशा रीतीनेंहि उदारपणानें वागविण्यास मी तयार आहें; आतां तर झालें ना बापू तुमच्या मनासारखें ?

**बापूः**—श्रीमंतांनीं अशा उपरोधिक रीतीनें मला दूषण द्यावें, हें माझें दुर्दैवच नव्हे तर काय ? सरकारला मी पूर्वींच विनंति केली आहे, त्या प्रमाणें माझ्या ऐवजीं दुसऱ्या कोणा लायक मनुष्यास दादासाहेबांकडे पाठविण्याची तजवीज झाल्यास श्रीमंताचे मनांत माझ्याबद्दल आलेल्या विकल्पांतून तरी निदान मी मुक्त होईन.

**माधवः**—बापू, माझ्या म्हणण्याचा खरा अर्थ तुम्ही बरोबर लक्षांत घेतला नाहींत असें दिसतें.

**बापूः**—म्हणजे ?

**माधवः**—म्हणजे तुमच्यासारख्या तिऱ्हाइतालाहि माझें म्हणणें योग्य वाटलें असून तें दादासाहेबांस पटलें नाहीं, तर दुराग्रहाचें अपयश त्यांच्या पदरं बांधून, योजलेले कडक उपाय पुढेंहि तसेच चालू ठेवण्यास-अथवा ते अधिक घट्ट करण्यास-आम्ही ईश्वराच्या दारीं तर राहोंच पण जनतेच्या दृष्टीनें ही अन्यायी ठरणार नाहीं; खरें आहे कीं नाहीं नाना ?

**नानाः**—इतक्या कमालीच्या मुत्सद्दीपणाला खोटें कोण म्हणेल? पण—

**माधवः**—( तडफीनें ) पणबीण कांहीं नाहीं ! ( बापूकडे वळून ) बापू तुम्ही माझ्याकरितां पुन्हां एकदां दादासाहेबांकडे जा.

**बापूः**—जातों.

**माधवः**—तुमच्याकडून शक्य तेवढी सर्व खटपट करून समेट घडवून आणा

**बापूः**—प्रयत्न करतों.

**माधव**—माझी सर्व भिस्त आतां तुमच्यावर आहे; परमेश्वर अजून तरी पाठीराखा होऊन आमच्यावर ओढवलेल्या ह्या राष्ट्रीय आपत्तीपासून आम्हा सर्वांचें रक्षण करील, या आशेनें मी तुम्हास पुन्हां पुन्हां भीड घालीत आहें.

**बापूः**—श्रीमंतांची आज्ञा मला वंद्य आहे.

**माधवः**—तुमच्या सारखा मानी मोहरा विरेंत घालण्यांत मला खरोखर अत्यंत दुःख होत आहे; पण दोन प्रमुख व प्रसिद्ध मोहऱ्यांतील ज्या परस्पर जोराच्या प्रधान शहामुळें आकर्षण शक्ति उत्पन्न होऊन सर्वंध राजकीय पटावर अस्वस्थता, अशाश्वतता, व अशांतता उत्पन्न झाली, त्या शहाच्या विरेंतहि तसाच जड व जबरदस्त मोहरा दिला गेल्याशिवाय गत्यंतरच रहात नाहीं, म्हणून,—आणि म्हणूनच बापू, मी पुन्हां पुन्हां " तुम्हीच जा " असा तुम्हांस आग्रह करीत आहें.

**बापूः**—श्रीमंतांच्या आज्ञेप्रमाणें वागण्यास मी तयार आहें.

**माधवः**—ठीक आहे; तुम्ही जा आणि प्रयत्न करा; पण-पण लक्षांत ठेवा, दादासाहेबांना बजावून सांगा कीं, इतक्यावर ही भावी संभाव्यतेला टाळता येणेंच केव्हांहि शक्य नसेल, आम्हा उभयतांत दिलजमाई होण्याचा यापुढें काडीचाहि संभव नसेल—समेटाची मला अजून असलेली अंधुक आशाहि जर पार नष्ट व्हावयाची असेल—तर, तर, दादासाहेब हल्लीं पेशव्याचे—या त्यांच्या पोरगवदा माधवाचे—कैदी तर आहेतच, पण ते तसेच पुढेंहि जन्मभर राहतील, अशाबद्दल मी वाटेल ती खबरदारी घेण्यास, आणि हल्लींची त्यांचीं बंधनें अधिक घट्ट करण्यास केव्हांहि मागें पुढें पाहणार नाहीं, असा माझा पूर्ण निश्चय आहे. ( नानाकडे वळून ) नाना, आटोपलें का दरबारचें काम ?

**नानाः**—होय सरकार. ( पडदा पडतो. )

# प्रवेश ] अंक तिसरा [ दुसरा.

( रखमाबाई आजारीपणाचें ढोंग घेऊन निजलेली आहे, विठ्ठलशास्त्री तिच्याजवळ बसून तिच्याकडे टक लावून पहात आहे; असा पडदा उघडतो. )

**विठ्ठलः**—( स्वगत ) हिनें आजारीपणाचें ढोंग तर अगदीं बेमालुम वठवून दिलें आहे पहा ! कांहीं हरकत नाहीं ! आपणहि तूर्त ही खरीच आजारी असल्याची आपली खात्री आहे, असें तिला भासवावें, आणि प्रसंग साधून हा भ्रमाचा भोंपळा फोडावा. बाकी सटवीनें, अगदीं आनंदीबाईचाच कित्ता गिरविला आहे न काय ? ( तिच्या जवळ जाऊन उघड ) लाडके, तूं अशी अंथरुणाला खिळल्यापासून मला कांहींहि सुचेनासें झालें आहे; कसें काय वाटतें आहे तुला आतां ?

**रखमाः**—( कण्हत ) आई, आई–ई–ई, काय सांगूं माझें कपाळ काय होतें आहे तें, न कसें वाटतें आहे तें ? मेली इकडे सदान्‌कदा आपली थट्टाच वाटतें न काय ?

**विठ्ठलः**—अग नाहीं बरें ! तूं थट्टेनें आजारी पडली आहेस, असें नाहीं बरें मला वाटत ! अगदीं खरी खरी आजारी पडली आहेस, असेंच वाटतें आहे बरें मला ! काय होतें आहे तुला ? अग सांग ग ?

**रखमाः**—मला कांहीं होतं नाहीं न्‌ वित नाहीं; सारखी कटकट नका करीत बसूं कपाळीं इथें !

**विठ्ठलः**—असें काय बरें करीत असतेस ? तुला सर्व कांहीं होतें आहे. आणि कांहीं होत नाहीं, असें कसें बरें म्हणतेस ? तुला या दुखण्यांतून नको का लवकरच बरें व्हायला ? तुझे हे हाल पाहून किनई माझा जीव कसा वर खालीं होतो आहे बरें सारखा !

**रखमाः**—अहो समजलाहो तुमचा कळवळा; माझी मी कनई दुखणें भोगायला कशी अगदीं–अगदीं समर्थ आहें बरें; तुम्हाला तर नाहींना त्यामुळें त्रास भोगावा लागत ?

**विठ्ठलः**—लागतो नाहीं तर ? तुझें काम नाहीं वाटतें करावें लागत मला ?

**रखमाः**—पण माझ्या आजारीपणाबद्दल नाहींना खस्ता खाव्या लागत तुम्हाला ?

**विठ्ठलः**—लागतात नाहीं तर ? अग, लग्न झाल्यापासूनच सारख्या खस्ता खात आलों आहें समजलीस ? शिंचे उपकाराची जाणीवच नाहीं तुला !

**रखमाः**—माझ्याशीं लग्न केलें, हेहि माझ्यावर उपकार केले असतील ! नाहीं हो ?

**विठ्ठलः**—होच तर; उपकार नाहीं तर काय ! अलबत उपकारच केले आहेत; आणि तेहि तुझ्या एकट्यावर नसून तुझे आईबापहि त्यांत वांटेकरी आहेत समजलीस ?

**रखमाः**—खबरदार माझ्या आईबापांचें नांव काढाल तर.

**विठ्ठलः**—कां बरें ? तुझी कांहीं भीति लागली आहे का काय मला? काढीन काढीन; अलबत तुझ्या आईबापांचें नांव काढीन !

**रखमाः**—कां–कां–कां बरें, माझ्या आईबापांचें नांव काढाल ? धन लागली उपकाराची; काय–काय उपकार असे केले आहेत त्यांच्यावर आपण ?

**विठ्ठलः**—अग हें पहा, तुझें लग्न होण्यापूर्वीच तूं फार कजाग आणि कज्जे-दलालीण आहेस असा तुझा लौकिक होता; त्यामुळें तुझ्यासारखी नख देणारी ही घोरपड गळ्यांत बांधून घेऊन घोरांत पडण्यारा कोणाचीहि हिंमत होईना. अखेर तुझ्या आईबापांनीं मला गरिबाला गांठून गंडा बांधला ! अग, तुला काय सांगूं, मला त्यावेळीं, खरें म्हणशील तर, पाहवेना सुद्धां बघ त्यांच्या त्या केविल-वाण्या मुद्रेकडे ! सारखें "पदरांत घ्या–पदरांत घ्या" म्हणून माझी काकळूत करीत, करुणा भाकीत आणि सारखे पटापटा पाया पडत. अग आली बरें इतकें झाल्यावर मला त्यांची करुणा ! म्हटलें कशाला उगाच गरिबांचा अधिक अंत पहा ! करावा म्हटलें उपकार आणि केला निश्चय उपकार करण्याचा तुझ्यावर आणि तुझ्या आईबापांवर; आणि तोहि कसा म्हणशील तर सहजासहजीं; आळसांत.

**रखमाः**—आळसांत उपकार केलात म्हणजे ?

**विठ्ठलः**—म्हणजे वास्तवीक तुझ्यासारखी ही जळती आग घरांत आणण्याचें मी नाकारणार होतों, आणि तुझ्या आईबापांनांहि तसें साफ तोंडावर सांगणार होतों, पण ( बोटें मोजून ) "नाहीं" हीं अक्षरें पडलीं दोन, म्हणून आळसानें आपलें "हो" असें एकच अक्षर म्हणालों, आणि त्या आळसाचा उपकार म्हणजेच जे आहेत्त का—

**रखमाः**—( ओरडून ) पुरे झाली हो मेली तुमची ही कटकट! घटकाभर जरा हायशी पडेन म्हटलें तर तें सुद्धां नाहीं तुम्हाला पाहवणार.

**विठ्ठलः**—अर्रर! आजारीपणांत असें ओरडूं नये; तुझा घसा दुखतो आहे आणि तूं जर अशी सारखी ओरडत राहिलीस तर कसा बरें तो लवकर बरा होईल?

**रखमाः**—अहो नाहीं हो, घसा नाहीं हो दुखत माझा!

**विठ्ठलः**—बरें तोंड तरी दुखतें आहे का तुझें? अरे हो, खरेंच; काग दृष्ट विष्ट तर नाहींना झाली तुला?

**रखमाः**—इश्श! बोलायचें म्हणून बोलायचें झालें कांहीं तरी! दृष्ट लागण्याइतकें का लहान वय आहे माझें अजून?

**विठ्ठलः**—अग हो, हो, दृष्टच लागली असेल तुला कोणाची तरी.

**रखमाः**—तुमची दृष्टि पडलेली आहे माझ्यावर. चला, बसूं नका इथें माझ्याजवळ अन नका बोलूं माझ्याशीं एक शब्द सुद्धां आतां.

**विठ्ठलः**—(स्वगत) क्या बात है; चलाव, चलाव, दादासाबकी नकल एकदम चलाव; ( उघड ) हें काय बरें लाडके; तुझें तोंड कसें अगदीं सुजून गेल्यासारखें दिसतें आहे; ( तिच्याकडे पाहून ) अरे हो खरेंच; अगदींच चुकलों मी. तुझें सगळेंच अंग सुजलें असल्यासारखें वाटतें आहे मला. तुला बाळसें तर नाहींना आलें पुन्हां! कां बाळसेंच चढलें तुझ्यावर; काग, भलतीच गुबगुबीत दिसूं लागलीस नाहींग तूं अशांत; डोळे मिटलेस वाटतें?

**रखमाः**—तुम्ही तर ती वाटच पहातां आहां कधींची; पण देव कुठें ऐकतो आहे तुमचें गाऱ्हाणें? नवस करा नवस! उघडतील बरें उघडतील, माझे डोळे मिटले कीं तुमचे उघडतील बरें का लागलीच खाडदिशीं!

**विठ्ठलः**—नाहीं, तसें नाहीं; माझे डोळे उघडले कीं तुझे मिटतील. बरें पण तुला काय होतें आहे तें सांगना एकदाचें; हात जोडूं का तुला ?

**रखमाः**—हातबीत नको बरें का जोडायला: मला नाहीं हे अलीकडले असले अचरट चाळे खपणार.

**विठ्ठलः**—अग, सांग ग तुला काय होतें आहे तें ?

**रखमाः**—खरेंच सांगूं का मला काय होतें आहे तें ? का मेली पुन्हां ही आपली अशीच थट्टा सुरू होईल ?

**विठ्ठलः**—शिव ! शिव ! तूं आतां अगदीं अखेरच्या पंथाला लागली आहेस हें मला अगदीं स्पष्ट दिसत असूनहि मी तुझें बोलणें 'थट्टेवारीच कसें नेइन बरें ? पाहूं देग मला आतां एकदां तरी तुला अखेरची डोळे भरुन; पाहूं देग—पाहूं देग— ( रखमाबाई तोंडावरून पांघरूण घेते ) म्हणा पुंडलीक वर दे—बोला सदानंदाचा—लाडके अग लाडके, ( तिच्या तोंडावरील पांघरूण हळूंच काढतो ) अग बोलग; अग बोलग; अग सांगग; अग सांगग एकदां तुला काय होतें आहे तें ?

**रखमाः**—( खेंकसून ) नाहीं सांगत जा. बस्स, आतां तर नाहींच सांगत जा मला काय होतें आहे तें; काय झालें आहे हो मला अखेरच्या पंथास लागायाला ? हा काय मेला चारगटपणा ! छळवाद मांडला आहे तुम्ही माझा सारखा छळवाद ! चांगली सारखी मघांपासून तुमच्याशीं बोलतें आहें तर खरी; अरे वारे वा !

**विठ्ठलः**—अशी खेंकसतेसग काय अंगावर पावलोपावलीं; नीट नाहीं बोलतां येत वाटतें.

**रखमाः**—नाहीं येत मग; अरे वारेवा ! कुणाला वाटेल कीं, जसें कांहीं अगदीं खरेंच आहे हें सगळें.

**विठ्ठलः**—अग, तूं अखेरच्या पंथाला लागल्याचें दुसऱ्या कोणाला खरें वाटलें नाहीं तरी मला खरें वाटतें आहेना पण ? खरें वाटलें तें मी बोललों; बरें मी बोललों तें खोटें बोललों असेंच तुझें म्हणणें आहे ना ? ठीक आहे ! बहुत उत्तम आहे. तुझ्या इच्छेप्रमाणेंच मीहि आतां जे आहेत्ते असें म्हणतों कीं, तूं चांगली धडधाकट आहेस; तुझ्या तोंडाच्या तापल्या कढईतून जे आहेत्ते सारखे फुटाणे फुटत आहेत; तूं जे आहेत्ते खरीखुरी आजारी नाहींस; आजारीपणाचें हें तुझें निव्वळ ढोंग आहे, आणि ह्या सर्व गोष्टींना उघड उघड प्रत्यंतर म्हणजे—

**रखमाः**—( रागानें ) चुलींत घाला तुमचीं प्रत्यंतरें! (ओरडून) अहो, मी खरेंच आजारी आहें वरें.

**विठ्ठलः**—अरे जा, तुझें धड बोलण्यांतच बोलणें नाहीं न काय! घटकेंत म्हण- तेस आजारी आहें म्हणून, अन् घटकेंत म्हणतेस आजारी नाहीं म्हणून! कोणतें खरें मानायचें हीच शिंची पंचाईत झाली आहे लेकाची! वरें आतां तर सांग काय खरें न् काय खोटें तें?

**रखमाः**—हें पहा मी आतां अगदीं-अगदीं बोलतच नाहीं वरें का! ( तोंडा- वर हात ठेविते )

**विठ्ठलः**—आत्तां-आत्तां इतक्यांत उन्मादवायु झाल्याप्रमाणें सारखी भरकटत होतीस अन् लागलीच दांतखिळी बसल्यासारखी अगदीं चुप झालीस, हें कोणत्या हटेल रोगाचें लक्षण आहे ते नकळे वेटें! अग ए, अग आमचे ए—( ती बोलत नाहीं; घाबरल्याचा आविर्भाव आणून ) अरे बापरे! हिनें पांढरे डोळे केले! ( तिच्या- कडे पाहून ) खास-अगदीं खास; हिनें डोळे पांढरे केले! आतां काय करूं मी येथें एकटा! शेजाऱ्या पाजाऱ्यांना आतां हांका मारल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ( ओरडतो ) कोणी धांवा हो धांवा! पांढरे केलें हो हिनें डोळे; पांढरे झाले हो हिचे डोळे; धांवा, धांवा, अहो धोंडोपंत, बंडोपंत अहो खंडोपंत! गुंडोपंत, धांवा हो धांवा; अहो यज्ञेश्वर भटजी, रुद्रेश्वर दीक्षित, भद्रेश्वर शास्त्री, मुद्रेश्वर पुराणिक धांवा हो धांवा, आग—आग, मृत्यु—मृत्यु, पाणी—पाणी, धांवा हो धांवा; अहो भद्रे—

**रखमाः**—( रागानें ) अशा एखाद्या बावचळल्यासारख्या आरोळ्या काय मारीत सुटलांत एकसारखे! डोकें बिकें बिघडलें कीं काय? कपाळावर पट्टी मारा- यला हवी आहे वाटतें आपल्या?

**विठ्ठलः**—अरे बापरे, आला वाटतें पुन्हां उन्माद वायूचा झटका! भलतेंच लचांड झालें आहे हें शिंचें कांहीं न्यारेच तंत्र दिसतय् न काय हें! घटकेंत उन्माद वायु उभा राहतो, तर घटकेंत दांतखिळच खालीं बसते! अग ए; असें काय वरें करावें? शहाणी आहेस ना तूं; अग सांग ग, अग सांग ग—

**रखमाः**—मला किनई आताशीं फार अन्नद्वेष झाला आहे; घांस घेतलारे घेतला कीं, ओकारी येईल असें वाटूं लागतें. जीभ कडवट झाली आहे; नेहमीं अंगांत ताप आहे असें वाटतें; हाडीज्वर आहे, डोळे दुखतात, झोंप नाहीं, असे कांहीं नाना प्रकार आहेत माझ्या दुखण्यांत, का आपला एकच प्रकार आहे तर झटकन सांगून होऊं मोकळी !

**विठ्ठलः**—हरहर ! ह्या नानाप्रकारच्या रोगाच्या हातांत तूं आतां गेलेली असल्यानें माझ्या हातीं पुन्हां कशीं आणि कधीं परत येतेस, हीच मला आतां एक जबरदस्त विवंचना लागून राहिली आहे. अग, रोगाचें असें नानाप्रकार सांगून का कोठें माणूस आजारीपणांतून मोकळें होतें ? औषध घ्यावें लागतें बरें, समजलीस का तूं ?

**रखमाः**—अहो, असें म्हणण्याचा प्रघात आहे.

**विठ्ठलः**—अग कशाचा प्रघात घेऊन बसली आहेस कुणाला ठाऊक ! अग, ह्या प्रघातच परघात करणारा आहे समजलीस; एखाद्या वैद्याला बोलवूं काग ?

**रखमाः**—कांहीं नको; काय पण मेलीं दोन दिवसांची दुखणीं जशीं कधीं येतच नाहींत कुणाला घरोघरीं ?

**विठ्ठलः**—अग, पण तुझ्या दुखण्याचा रंगच कांहीं "और" आहे; फट्दिशीं कांहीं भलतें सलतें झालें तर करायचें काय ? बोलवूं काग मग वैद्याला ?

**रखमाः**—साफ सांगतें, मुळीं मुद्धां बोलवायचें नाहीं कुणाला !

**विठ्ठलः**—अग, नकोग जिवाला अधिक कष्ट देऊंस; बोलावूं दे ग आपल्या थोंडो वैद्याला; जिवाची जानागिरी आहे बरें ही ! ( तिच्या कपाळाला हात लावून ) कपाळ तापत चाललें आहे बरें का तुझें !

**रखमाः**—अगदीं थंड आहे माझें कपाळ.

**विठ्ठलः**—अग, हेंच तर मुळीं डोकें तापण्यास सुरवात होण्याचें पूर्व चिन्ह आहे. नकोरे बाबा, विषाची प्रचीति पाहायला; आपले अटोक्यांत आहे, तोंपर्यंतच इलाज झालेला बरा; म्हणताතना मनाशीं वैर करूं नये म्हणून !

**रखमाः**—मागच्या जन्मींचें काय वैर होतें त्याचा उभा दावा मात्र घेतां आहांत चांगला साधून नी काय या जन्मीं !

**विठ्ठलः**—वरें, वैर तर वैर आणि दावा तर दावा! आतां तर आणलेंच पाहिजें वैद्याला; ( जातो आणि वैद्यास घेऊन येतो. ) हें पाहिलेंत ! ( रखमावाईस दाखवून ) ही पाहिलीत ही अशी पडलेली आहे कधींची अंथरुणाला खिळून. अग ए ऐकलेंस काय ?

**वैद्यः**—निजूंद्या, निजूंद्या; असली झोंप दुखणेकऱ्याच्या वहुत फायद्याची असते.

**विठ्ठलः**—( ओरडून ) कांहो, मी तुम्हाला तिची प्रकृति पाहण्याला वोलावलें का ती कशी वहुत फायद्याची झोंप घेते, हें पाहण्यास वोलावलें ? आजारी माणसानें झोंपेंत डोळे मिटले असले तरी वैद्यानें जागेपणीं मिटतां उपयोगी नाहीं; निदान घरच्या माणसांनां तरी पहिल्यानें जाग्या वैद्याचे, व नंतर झोंप लागलेल्या आजारी माणसाचे, डोळे उघडावे लागतात; समजलांत ? ( तिला जोरानें हलवितो, ती कण्हूं लागते. )

**वैद्यः**—आजारी मनुष्याच्या देहाला अशा रीतीनें कष्ट देण्यानें रोगवृद्धि होते, असें निघंटांत वर्णन आहे.

**विठ्ठलः**—पण त्या शिवाय ऐदीपणाच्या ढोंगधत्तुऱ्याचा भोपळ्या रोग जात नांहीं, असा अनुभव आहे; अग ए, डोळे उघड बघूं; वैद्यवुवा आले आहेत वैद्यवुवा. हात दाखव त्यांना; ( ती हात देते; वैद्यवुवा नाडी पाहतात ) वैद्यवुवा, नाडी जोरानें धवकारे मारते आहे काहो ?

**वैद्यः**—( लक्ष न देतां ) काय होतें आहे आपणांला ?

**रखमा**—मला किनई— ......

**विठ्ठलः**—अरे गप, गप; काहो वैद्यवुवा, हिला काय होतें, हें परीक्षा करून सांगण्याला मी तुम्हाला वोलावलें आहे, का तिनें काय होतें हें सांगितलेलें ऐकायला वोलाविलें आहे ?

**वैद्यः**—अहो, पण त्या काय म्हण— ......

**विठ्ठलः**—रोग्यानें काय होतें, हें सांगितल्यावर वैद्यानें अनमान धक्क्यानें आलटून पालटून चढ उताराची औषधें देत जाण्याचा सपाटा लावण्याची सरदारीं पद्धत वडे, लोकांत असेल!, पण आमच्या येथें नाहीं, हो असें बिलकुल चालायचें !

**वैद्यः**—अहो, पण त्यांचें म्हण—

**विठ्ठलः**—त्या कांहीं नाहीं म्हणत; तुम्हीच काय तें सांगितलें पाहिजे, आणि अगदीं एकच औषधानें गुणहि पण आला पाहिजे.

**वैद्यः**—यांचें हें दुखणें विकोपास गेलेलें आहे, देहाला स्वस्थता नाहीं, मनाला शांति नाहीं, अंगांत शक्ति नाहीं, वगैरे नानाप्रकार या दुखण्यांत असल्यानें थारे-पालटानेंच औषधाचा सारखा मारा करून हें दुखणें ठिकाणावर आणावें लागेल: देऊं कीं यावर बहुत उत्तम औषध, कसें पण अगदीं वेळेवर मला बोलावलेंत!

**विठ्ठलः**—ह्यं-ह्यं-ह्यं-ह्यं! (हंसतो) म्हटलें जे आहेत्ते पर्वणीलाच मुंडण झालें म्हणजे बरें असतें. शिंची तपकिरीची डबी काय झाली बेटी! (इकडे तिकडे पहात स्वगत) ह्या धोंड्याला तर हिचें हें दुखण्याचें ढोंग अगदीं खरेंच वाटलें न् काय? काय समजतें आहे कपाळ ह्या कल्याण स्वामीला! पुरे झाले आतां हें बड्या लोकांचें अनुकरण. दादासाहेबांची नक्कल करतां करतां माझें मात्र गरीबाचें पूर्ण वाटोळें होण्याचीच वेळ आली आहे न् काय, छे! आतां नाहीं असें उपयोगी: स्वतःचीच अक्कल वापरली पाहिजे आतां; (तपकिरीची डबी शोधीत) अरे, कुठें गेली शिंची माझी सुंगणीची डबी; ओटयावर काढली होती शिंची तपकिरीची डबी कनवटींतून; ओटीवर तर नाहीं विसरलों! आतां होती हो शिंची (डबी पहात बाहेर जातो.)

**वैद्यः**—कसें काय वाटतें आतां तुम्हांला?

**रखमाः**—मला किनई धड उठून सुद्धां बसवत ना— .........

(इतक्यांत विठ्ठलशास्त्री "धांवा, पळा, जीव वांचवा! आग, आग, पाणी, पाणी, खून, खून, मृत्यु, मृत्यु," असें ओरडत धांवत येतो; धोंडोवैद्य घाबरून पळून जातो; व रखमाई घाबरून एकदम उभी राहून भीतीनें इकडे तिकडे पळूं लागते; विठ्ठलशास्त्री उलट दिशेनें पळत तिला अडवितो, ती त्याला झिडकारते. पडदा पडतो.)

---

# प्रवेश ] अंक तिसरा [ तिसरा.

—:o:—

**स्थळ**:—( शनिवारवाडा; श्रीमंत माधवराव पेशवे पलंगावर पडलेले आहेत आणि श्रीमंत सौ० रमाबाईसाहेब जवळ उभ्या आहेत, असा पडदा उघडतो. )

**माधवः**—लाडके, ज्या गोष्टी आपल्या हातच्या नसून निव्वळ ईश्वराधीन आहेत, त्याबद्दल नेहमीं काळजी करीत राहण्यांत काय अर्थ आहे बरें ? तूंच जर नेहमीं अशी खिन्न राहिलीस तर कसा बरें चालणार हा आपला संसाराचा व साम्राज्याचा गाडा ?

**रमाः**—माझा सर्व संसार आणि माझें सर्व साम्राज्य इकडचेच पाय आहेत बरें ! इकडचें शरीर सलामत तरच माझा संसार, माझें साम्राज्य आणि मीहि पण आहें. महाराज, आपल्या मागें मी कांहीं जीव ठेवणार नाहीं बरें माझा ! ( रडूं लागते. )

**माधवः**—( जरा उठून टेंकून बसून ) डोळे पूस बघूं आधीं. ये लाडके, बस. ( बसते ) अग, आतांशा पहावें तेव्हां आपलें सदान कदा तुझे डोळे पाण्यानें भर. लेले. हें आहे काय ? अशानें कसा निभाव लागावा ? ये, अशी अगदीं माझ्या जवळ बस. आणि नीट न्याहाळून पहा माझ्याकडे; कांहीं सुद्धां विशेष भिण्या-सारखें नाहीं, पण तुझें आपलें पहावें तों नुसतें पडसें आलें, थोडासा खोंकला आला, अथवा बारीकशी तापाची कसर आली तरी सुद्धां लागलीच केलें तोंड गोरेंमोरें अन आणलें डोळ्याला पाणी ! असें काय बरें करावें नेहमीं ?

**रमाः**—हो तर वेडीच आहें बरें तशी मी ! आपण चांगले धडधाकड असून उगाच काळजी करायला ?इकडून कांहींहि म्हणायचें होवो, पण डोळे मिटले तरी हिशोब कांहीं चुकत नाहीं बरें का महाराज ! नाहींहो नाहीं, माझ्या कपाळीं सुखच नाहीं. मला नाहीं हो धडगत दिसत बरें आतां ! ( डोळे पुसते ).

**माधवः**—हं डोळे पूस. बरें पण नेहमीं असें दुःख करीत बसून तरी सुख लागेल का ? मी काय म्हणतों तें ऐकून तरी घे नीट. हें पहा, इतकी भीति वाटण्या-

सारखें कांहीं माझें दुखणें विकोपास गेलेलें नाहीं, मग उगाच काळजी तरी ती कशाची करायची ?

**रमाः**—महाराज, हें आपलें म्हणणें निव्वळ मला धीर यावा म्हणूनच आहे वरें ! हें दुखणें कशाचें आहे, हें आपण माझ्यापासून कितीहि लपवून ठेविलेंत, तरी मला समजलें आहे वरें का ? मला आतां मुळींसुद्धां नाहीं हो घडगत दिसत ह्या दुखण्यांतून सुरक्षितपणें निभावण्याची !

**माधवः**—अं ! त्यांत काय आहेग मोठेंसें न निभावण्याजोगें ! थोडासा खोकला झाला असल्यानें कफ पडतो आणि त्यामुळें थोडीशी अशक्तता वाटते आहे, एवढेंच !

**रमाः**—महाराज नाहीं वरें नाहीं; हा कफ आणि ही अशक्तता साधी नाही; ही मेली कर्नाटकची स्वारी नाहीं वरें यशश्वी झाली इकडे !

**माधवः**—कां नाहीं झाली ? छत्रपति शिवाजमिहाराजांच्या वेळेपासूनचा तंजाउर वगैरे मराठ्यांच्या ताव्यांतील प्रदेश मराठा साम्राज्यांतच रहावा असे ठरलें; मदागिरी व गुरमकोंडा, हे दोन किल्ले आपल्या हातीं आले; झालेल्या खर्चा-बद्दल छत्तीस लाखाची रक्कम मिळून शिवाय हैदरनें चौदा लाख प्रमाणें दरसाल खंडणी देत जावी, असें ठरलें !

**रमाः**—महाराज, आपल्या प्राणापेक्षां हा विजय महत्वाचा आहे काय ?

**माधवः**—( न ऐकलेसें करून ) कडप्पाजवळ खर्पा व कर्नोळा येथील नवाबांचा पराभव करून सांगूं त्या अटीवर तह करण्यास आम्ही त्यांना भाग पाडिलें, बहादूरगड मिळविला आणि हैदरला निझामापासून फोडून सरहद्दी-नजीकच्या पाळेगार लोकांना पुढें कधींहि त्रास देणार नाहीं, अशी म्हसूरकराकडून हमी घेतली; असें असूनहि, आम्ही या मोहिमेंत यशश्वी झालों नाहीं, असें तूं कसें म्हणतेस ?

**रमाः**—महाराज, नाहींच झाली वरें ही स्वारी यशश्वी ! इकडे शीर सलामत राहिलें, इकडे परमेश्वरानें भरपूर आयुष्य दिलें, आणि शरीर प्रकृति धडधाकड ठेविली, तर अशा कर्नाटकसारख्या पन्नास स्वाऱ्यासुद्धां आणखी करतां येतील

आणि त्या यशस्वीहि होतील! पण महाराज, हल्लींचा प्रसंग मोठा कठीण आहे वरें! परमेश्वरच कशी काय लाज राखील ती राखो बापडा!

**माधवः**—अग, त्या दयाघन जगच्चालकाच्या आज्ञेशिवाय या क्षणभंगूर सृष्टींतील एक पानसुद्धां हालत नाहीं; त्या दीनदयाळ प्रभुची जशी इच्छा असेल तसें घडेल; त्यावर भार ठेवून तूं स्वस्थ रहा म्हणजे झालें!

**रमाः**--पण म्हटलें, महाराज, हात जोडते मी; ऐकायची होईल का माझी एक गोष्ट?-ऐकायची होईलना?-होईलना?

**माधवः**--अग, वाडवडिलांची पुण्याई, श्रेष्ठ विभूतींचें आशीर्वाद, आणि पंत-प्रधानाच्या घराण्यांतील तुझ्यासारख्या लोकोत्तर स्त्रियांचें पातिव्रत्य, ह्या तीन खांबावरच हा पेशवाईचा डळमळित डोलारा अजून तग धरून राहिला आहे वरें! साम्राज्यांत आणि साम्राज्याबाहेर तुझें नांव निघालें, कीं लहान थोर तुझ्यासंबंधानें किती आदरभाव व पूज्यबुद्धि प्रगट करतात, हें मनांत येऊन तूं जवळ नसलीस तरी सुद्धां अभिमानाच्या आनंदानें माझ्या नेत्रांतून एकसारखें प्रेमाश्रू वाहूं लागतात.

**रमाः**--इकडच्या पायाचीहि मला सर येणार नाहीं कधीं! इकडच्या पुण्याईनें माझा नांवलौकिक--

**माधवः**--आमच्या घराण्यांतील तूं साक्षात लक्ष्मी आहेस! स्त्रीच्यारूपानें आमच्या घरांत आलेली प्रत्यक्ष देवता आहेस! तुझे हेतू नेहमीं पवित्र रहाणार! तुझ्या इच्छा नेहमीं मंगल असणार; तुझें आचरण सदोदित माननीय होणार! आणि तुझा शब्द मननीय--

**रमाः**--पण म्हटलें, महाराज, राज्य-कारभारावरील लक्ष कमी करून शरीर प्रकृतीकडे अधिक लक्ष द्यायचें होईल का इकडून? होईल का? आपल्या पदरीं कर्ती माणसें नाहींत का? ऐकायचें का माझें म्हणणें? होईल का? होईल का ऐकायचें मी काय म्हणतें तें? नाहीं का चालायचें असें केलें तर? नाहीं का? नाहीं कां?

**माधवः**--अग, "छत्रपति," आणि "पेशवे," ह्या शब्दांतच अशी जादू आहे, कीं "सूत्र-चालकत्वाचा आद्य-मान" म्हणून निदान तान्हें मूल तरी गादीवर पाहिजेच पाहिजे!

**रमाः**--पण म्हटलें चार दिवस विश्रांति अन् औषधपाणी घेतल्यानंतर वरें वाटलें म्हणजे मी नको का म्हणतें आहे पुन्हां स्वतः कारभार पहायला? इतकी काळजी--

**माधवः**—अग, तुला काय सांगूं? मला...मला...माझ्या...माझ्या—

**रमाः**—महाराज !

**माधवः**—माझ्या डोळ्यापुढें भावी चित्र उभें राहतें ! किती प्रकारच्या विवंचना करण्याचें माझ्या नशिबीं आलें आहे म्हणून सांगूं तुला ? माझी ही अशी स्थिति ! नारायणाचें पोरवय ! दादासाहेबांची ती तऱ्हा ! काय हें आमच्या नशिबाचे खेळ ! !

**रमाः**—पण महाराज, धाकट्या भावोजींना—

**माधवः**—अग, आमची आई त्याला आपल्या दोघांच्या हवालीं करून गेली अन जातांना तिनें त्याला सांभाळण्याबद्दल मला तीनतीनदां बजाविलें हें मी कसा विसरेन ? सर्वांत लहान, म्हणून नानासाहेबांचें त्याच्यावर विशेष प्रेम असून त्यांनीं मला व आईला त्याची नीट जतणूक करण्याबद्दल निक्षून सांगितलें आहे, तें माझ्या आठवणींतून कसें जाईल ? प......प......पण......

**रमाः**—( घाबरून ) अगबाई, ग्लानी आली वाटतें ! ( तोंड व कपाळ पुसते; ) महाराज, सावध व्हा ! सावध व्हा ! ऐकायचें झालें का ? सावध व्हायचें झालें का ? ( त्यांच्याकडे पाहून रडूं लागते ) देवा ! असाच कायरे माझ्या संसारचा दुःखद स्थितींत शेवट होणार ! हे आई भवानी, माझें मंगळसूत्र कायम ठेवग, म्हणजे इकडच्या बरोबर हव्या तितक्या हाल आपत्तींतसुद्धां आनंदानें दिवस कंठीन बरें मी ! हे देवी दुर्गामाते, पाव बरें माझ्या नवसाला; माझा जीव ओवळतें आहे बरें मी इकडच्याच्या वरून ! देवा, सती सावित्रीच्या धांव्याला पावलास; माझाहि धांवा ऐकून येरे बाबा माझ्या साह्याला ! देशील का मला चुडेदान ! देशिलका ? ( डोळे पुसते; )

**माधवः**—( अर्धवट शुद्धींत ) पण......पण......भवितव्यता ! आनंदी-काकूशीं दादासाहेबांचें लग्न होण्याच्यापूर्वींच " ही मुलगी पायगुणाची होणार नाहीं " अशीं पूर्व चिन्हें अनुभवास आलीं ! आणि त्यामुळें हा संबंध घडवून आणूं नये, असें ठरलें ! पण काकी हजारांत देखण्या असल्यानें, " करीन तर हिच्याशींच लग्न करीन " असा दादासाहेबांनीं हट्ट धरिला, आणि त्यामुळें नाइला-जानें थोरल्या रावसाहेबांनां हा संबंध घडवून आणावा लागला ! दादासाहेब आमच्या मानेवर सुरी..........

**रमाः**—ऐकायचें झालें का ? सावध व्हायचें झालें का इकडून ? ऐकलें का मी काय म्हणतें आहे तें ? ऐकलें का ? ऐकायचें झालें का ? ( रडूं लागते. )

**माधवः**—( सावध होऊन ) काय, काय म्हणणें आहे तुझें ?

**रमाः**—महाराज, म्हटलें, इकडचाच काय तो आधार आहे वरें मला आणि धाकट्या भावोजींना ह्या जगांत ! माझी तर गोष्ट सोडाच म्हणा; मी तर अगदीं इकडच्याच पायावरोबर येणार आहे हें खास ! माझा तर अगदीं निश्चयच ठरून चुकला आहे काय तो ! पण—पण धाकट्या भावोजींवर मात्र आभाळ फाटणार हो आभाळ फाटणार ! ( डोळे पुसते ! )

**माधवः**—रडूं नकोस ! अग, मी जिवंत असतांना माझ्या लाडक्या नारायणाकडे वर मान करून नुसतें पाहण्याची सुद्धां कोणाची छाती आहे काय ? पिंजून टाकीन ! कापसासारखा पिंजून टाकीन ! पण—पण—मृत्यु–मृत्यु ! पांडवांचा नकशा उतरण्याकरितां आपलें सबंद एकजात कौरव घराणें वळी देणारा मानी कौरवेश्वर—पंडुच्या पांच पोरांना नेस्तनाबूद करण्याच्या अट्टाहासानें सर्व कौरव योद्धे लागोपाठ नाहींसे केल्यानंतर धुळीच्या शय्येवर पडला असतांनाहि आपल्या इभ्रतीखातर, आणि आपला रणयज्ञ पूर्णतेस नेण्याकरितां, अखेर अश्वत्थाम्यास मुख्य सेनापतीचे अधिकार देणारा हट्टी कौरवेश्वर–मृत्यूपुढें दीन झाला ! ! मृत्यूपुढें सर्वांना हात टेंकावे लागतात ! मृत्यूच्या नुसत्या कल्पनेनेंच तोंडावर दीनपणाची कळा येते ! हताशपणाचीं चिन्हें दिसूं लागतात ! डोळ्यापुढें भीति उभी राहते ! या मायावी—

**रमाः**—महाराज !

**माधवः**—( न ऐकलेंसें करून ) या मायावी जगाचा मी आतां काय तो फार थोड्या वेळेचा सोबती आहें, सर्व जगाला मी, आणि मला सर्व जग, आतां लवकरच अंतरणार आहे, या भावनेनें मनोविकार क्षुब्ध होतात ! अहंकाराचें पाणी होतें ! ताठा नाहींसा होऊं लागतो ! वैरभाव लयास जातो ! जिवंतपणीं डोळ्यापुढें नकोशीं वाटणारीं माणसें मरतांना डोळ्यापुढें असावींशीं वाटतात ! आणि, अन्यायी अपकाराच्या भावनेनें तींच डोळ्यासमोर दिसूंहि लागतात ! आपल्या अन्यायी, हट्टी व अमानुष कृत्यांचें सडकें चित्र, बाप व मुलगा, अशा सारख्या एक रक्ताच्या, व एक हाडामासाच्या, निकट संबंधांतहि पक्षपात, पक्षभेद, व प्रसंगीं वंशच्छेद—

**रमाः**—महाराज, महाराज, सावध व्हायचें म्हटलें. ऐकलें का; ऐकायचें झालें का ? व्हायचें झालें का सावध ? ( तोंडावरून हात फिरवीत ) म्हटलें मी बसलें आहे जवळ ! एकायचें का ? ऐकलें का ? ऐकायचें झालें का ?

**माधवः**—ये; अशी जवळ ये–माझ्या अगदीं जवळ येऊन बैस, आणि मी काय म्हणतों तें मन घट्ट करून ऐक ! ऐकतेस ना ?

**रमाः**—( घाबरून ) अगबाई, असें काय करायचें होत आहे हें इकडून ? काय झालें घाबरायला एकाएकीं ? जरा विश्रांति घ्यायची होईल का ? होईल का ? ( डोळे पुसते ).

**माधवः**—तूं मला क्षमा कर.

**रमाः**—हें काय वरें असें म्हणावें महाराज !

**माधवः**—तूं मला क्षमा कर.

**रमाः**—अशी काय वरें आज्ञा करायची होते आहे, इकडून !

**माधवः**—तूं मला क्षमा कर.

**रमाः**—अगबाई; असें काय होतें आहे हें ? असें काय म्हणायचें होतें आहे हें इकडून सारखें ? इकडच्या पायाची तरी होईल का कधीं सुद्धां माझ्याच्यानें बरोबरी ! क्षमा ती काय आणि कशाची मागायची होते आहे माझी ? होय पायच मला नेहमीं ईश्वरस्वरूपी आहेत वरें !

**माधवः**—मी तुझ्यापासून आजपर्यंत माझें दुखणें कांहींसें लपवून ठेविलें, याबद्दल तूं मला क्षमा कर ! म्हणतेस कीं नाहीं " क्षमा केली " म्हणून ? बोल.

**रमाः**—महाराज, माझा अधिकार आहे का वरें असें म्हणायचा? (डोळे पुसते.)

**माधवः**—नाहीं म्हणत; नको म्हणूस जा ! रडतेस ? रड—मोठ्यानें रड ! अगदीं—अगदीं—

**रमाः**—महाराज !

**माधवः**—( शुद्धींत ) रडूं नकोस; डोळे पूस; मन घट्ट कर, आणि मी काय सांगतों तें शांतपणानें ऐकून घे ! मी पापी आहें ! माझ्या पापामुळें मी तुला दुर्दैवी बनविलें आहे ! आणि तुझ्या दुर्दैवाबरोबरच या मराठा–साम्राज्यावर–आणि या कमनशीब पेशवाईवरहि–दुर्दैव ओढवणार आहे ! लाडके, तुला माहीतच आहे कीं मी एका भयंकर रोगानें—

**रमाः**—महाराज–महाराज—

**माधवः**—ऐक; मी जरी तुझ्याशीं बोलतांना, "माझी प्रकृति धडधाकड आहे," असें अलीकडेस तुला नेहमीं भासवीत आलों आहें, तरी–तरी माझें हें सर्व शरीर एका भयंकर रोगानें साफ पोंखरून टाकलें आहे ! माझ्या ह्या देहाला राजयक्ष्म्याची

कीड लागून–यमधर्माचा क्षयी भुंगा लागून–माझ्या इहलोकींच्या दुःखद व दुःसह जीवनयात्रेचा—

**रमाः**—महाराज, नकाहो नका, अशी अमंगल वाणीसुद्धां उच्चारूं नंका मुखांतून! म्हटलें कशाला भलतेंसलतें बोलावें आपणच होऊन! वरें व्हायचें होईल वरें का लवकरच ह्या दुखण्यांतून!

**माधवः**—नाहीं! मी आतां बोललों तें अक्षरशः खरें आहें! मी शुद्धीवर आहें! भावी भानगडी माझ्या डोळ्यासमोर दिसत आहेत. सर्व आपत्तींचा मी अगदी शांतपणानें विचार केला आहे! प्रत्यक्ष माझ्या बाळाच्या–आपल्या नारायणाच्या रक्ताचा टिळा लावूनहि दादासाहेव—

**रमाः**—( लडीवाळपणानें ) कशाला वरें असें भलतें सलतेंच बोलायचें होतें आहे वेळीं–अवेळीं?

**माधवः**—आपत्ति गळ्याशीं येऊन भिडल्यावर कशाची वेळ–अवेळ आणि शुभ–अशुभ घेऊन वसली आहेस! दिवा मालवतांना मोठा होत जातो, तशीच आमची ही हल्लींची स्थिति आहे! खऱ्या गोष्टी लपवून कोणता फायदा होणार? आणि त्या किती दिवस अंधारांत राहणार? भावी आपत्तीचें हिडिस चित्र आपल्या पुढें धडधडीत उभें असतां त्याचा प्रतिकार करण्याऐवजीं त्यावर उलट पांघरुण घालणें शहाणपणाचें होईल काय? पापाची सडकी घाण—

**रमाः**—म्हटलें इकडच्या मुत्सद्दीपणाची ख्याति जगे–जगते झालेली आहे; इकडची कर्तवगारी आलम–दुनियेस ठाऊक झालेली आहे; इकडच्या करारी स्वभावाची सर्व जगाला ओळख पटलेली आहे; इकडच्या—

**माधवः**—मग?

**रमाः**—इकडच्या सारखें रत्न–माझा अमोल ठेवा–निव्वळ सुदैवानेंच मला लाभला हें मी जाणून आहें—

**माधवः**—मग काय?

**रमाः**—पण म्हटलें, वायकांची माया वेडी, अगदीं–अगदीं वेडी असते वरें महाराज! पति हाच सर्व सुखाचा ठेवा आहे–आपला दुसरा प्राण आहे–अस्से–अस्सेंच त्यांना नेहमीं वाटत असतें वरें महाराज! पतिव्रता स्त्रियांना पतीशिवाय दुसरी एक सुद्धां जागा नाहीं वरें समाधानाला या जगांत! ( रडूं लागते. )

**माधवः**—( दुःख आंवरून ) नसेल! पण मी तरीं काय करणार? आणि माझ्या हातीं तरीं आहे काय? माझी आतां धडगत दिसत नाहीं! माझ्या सर्व

इच्छा आतां मनांतल्या मनांत राहणार! या दुखण्यांत माझा शेवट होणार! मी निर्दय आहें–कसाई आहें–तुझी मान कापणारा खाटीक आहें–तुला दगा देणारा–तुझा घात करणारा–तुला जिवंत जाळणारा मी यमधर्म आहें! माझा लोभ सोड! माझ्या पासून दूर बैस! माझ्या हाडांच्या सांपळ्याला कवटाळूं नकोस! प्रेतकळा आलेल्या व घटके दोन घटकेंत अथवा दिवसा दोन दिवसांत–प्रेत होणाऱ्या माझ्या तोंडावरून हात—

**रमा:**—महाराज, म्हटलें आज औषध घेतल्यापासून कांहीं तरी वरें वाटूं लागलें आहे का इकडे?

**माधव:**—ऐक! मध्यें बोलूं नकोस! विषय बदलूं नकोस! मला बोलायचें आहे तें सर्व एकदां बोलून टाकूं दे! जगांतील कोणत्याहि औषधानें आतां मला बरें वाटणार नाहीं! पृथ्वींतील कोणताही धन्वंतरि आतां मला बरें करूं शकणार नाहीं! मी बरा होण्याचे सर्व मानवी प्रयत्न यापुढें व्यर्थ आहेत! माझें दुखणें दिवसें-दिवस सारखें वाढत चाललें आहे! "देव देतो पण कर्म नेतें" अशी आमची सांप्रत शोचनीय स्थिति झालेली आहे! आणि माझ्या–माझ्या अस्तित्वाविषयीं तर मी कधींच अगदींच निराश बनून गेलेलों आहें!! मृत्यु—

**रमा:**—महाराज, महाराज—

**माधव:**—(न ऐकलेंसें करून) मृत्यु हाच जगाचा अखेरचा मार्ग आहे! यमाचा अजब तडाका विनआवाजी असूनहि प्राण हरण करून नेणारा आहे! मी मृत्यूला भीत नाहीं, पण–पण मला त्या मार्गाकडे फारच लवकर–सर्व आशा व मनोरथ जागच्या जागीं ठेवून–अगदीं अवेळीं जावें लागणार! म्हणून माझ्या अंतःकरणांत कालवाकालव—

**रमा:**—असें काय वरें बोलावें महाराज? (डोळे पुसते.)

**माधव:**—काय! काय! तूं पुन्हां रडूं लागलीस! मी मरण्याच्या आधीं कशाला रडतेस? मी मरतांना रड! मी मेल्यावर रड! पण आतांपासूनच तुला रड कां लागली? काय? तरीहि रडतेस; रड! मोठ्यानें रड! देवाला ऐकूं जाईल इतक्या अगदीं मोठ्यानें रड! तुमच्या सर्वांच्या नशिबीं रडण्याचे दिवस यावयाचे असले तर ते टाळण्याविषयीं ईश्वराची करुणा भाक! आणि त्याला कांहीं पाझर फुटला तर पहा! ईश्वराजवळ दयेची रडत भिक्षा माग! माझ्याजवळ रडण्यानें फायदा होणार नाहीं, आणि तुमच्या ललाटरेषेंत "रडा" अशींच अक्षरें खोदलीं

असल्यास तुम्हास जन्मभर रडत राहण्याशिवाय दुसरें गत्यंतरच राहणार नाहीं! स्वतःच्या फायद्याकरितां भाऊबंदकीच्या खुनशी देवतेस अंगारे धुपारे दाखवून जागी करूं पाहणाऱ्या कुलांगार दादासाहेब व आनंदी काकी—

**रमाः**—म्हटलें जरा स्वस्थ पडावयाचें होईल का इकडून?

**माधवः**—( तिच्या बोलण्याकडे लक्ष न देतां ) माझे समेटाचे सर्व प्रयत्न निष्फळ होणार! सलोख्याबद्दलची माझी प्रत्येक आशा निष्फळ होणार! आणि मी मेलों तरी आमचा हा गृहकलह पुढें कोणत्या थराला जाणार,-दादासाहेब व आनंदी काकी यांनीं उभारलेल्या हट्टी दुराग्रहाच्या पापी मंदिरावर ते आतां भाऊबंदकीच्या रक्तानें कोणाच्या हत्येचा कळस बसविणार—ह्या विवंचनेनें माझा दुःखी आत्मा पुण्यांतल्या पुण्यांतच—नव्हे या शनिवारच्या वाड्यांतल्या वाड्यांतच—सारखा घुटमळत राहणार!! ( भ्रमिष्ट होऊन बरळूं लागतो ) कोण रे बाबा तूं? कोण आहेस तूं? कशाला आलास? येथें कशाला आलास? काय—काय म्हणतोस तूं! कोण—कोण! पुन्हां सांग, पुन्हां सांग; काय—काय! भाऊबंदकीचें भूत! भाऊबंदकीचें भूत आहेस! आणि माझ्या मानगुटीवर बसण्यास आला आहेस! असें कां रे बाबा! काय! काय! अस्सेंच; बरें मग? पुढें काय म्हणतोस तूं! बो—

**रमाः**—महाराज! महाराज!

**माधवः**—(बरळतो) बोल—बोल—काय काय—पुन्हां बोल बघूं? मी ऐकलें नाहीं बरोबर तूं काय म्हणालास तें! बोल! बोल! मोठ्यानें बोल! काय—काय! अरे बापरे! काय म्हणतोस? मी मरणार, आणि मग तूं नारायणाचा खून करणार! ( ओरडतो ) आई, अग आई! नाना, अहो नाना! धांवा हो धांवा; अहो भूत! भूत! भाऊबंदकीचें भूत! धांवा हो धांवा!

**रमाः**—( तोंडाकडे पाहून दुःखानें ) अगबाई, भ्रम झालाग बाई भ्रम! फुटणारग बाई माझें कपाळ! तुटणार ग तुटणार बाई अखेरीस माझें मंगळसूत्र! अहो धांवा हो धांवा कुणी तरी!!! ( माधवरावसाहेबांच्या अंगावर पडते! ).

पडदा पडतो.

# प्रवेश ] अंक चवथा [ पहिला.

( आनंदीबाई व दादासाहेब प्रतिबंधांत बसलेले आहेत
असा पडदा उघडतो )

**आनंदीः**—जळ्ळें लक्षण मेल्याचें! मेल्यानें अगदीं–अगदीं बोलल्याप्रमाणें कृति कैली अं! कांहीं हरकत नाहीं ? कैद तर कैद! इथेंच राहून खितपत मरूं, पण नाहींच आपला हट्ट सोडायचा! समजलांत का ? ऐकतां अहांत का तुम्हीं मी काय म्हणतें आहे तें ?

**दादा०**—आनंदी, अग येथेंच असें खितपत मरण्यांत आपणाला काय फायदा होईल असें तुला वाटतें ? नाहीं बरें नाहीं; अजून सुद्धा सांवरून घेतां येईल अशी स्थिति आहे; म्हणून म्हणतों पुन्हां एकदां विचार करून सांगशील का, आपण काय करावें तें ?

**आनंदीः**—आतां काय ठरवायचें राहिलें आहे बाकी अजून ? म्हटलें आपल्यापासूनच शिकलें आहे बरें का मी असें वागायला!

**दादा०**—( आश्चर्यानें ) म्हणजे ?

**आनंदीः**—फारसें कांहीं नाहीं म्हणा, पण—

**दादा०**—आनंदी, मी किनई अलीकडे अलीकडे इतका निगरगट्ट आणि कोडगा बनून गेलेलों आहें, कीं मला आतां तुझ्या कोणत्याहि बोलण्याची मुळीं खंतच वाटत नाहींशी झाली आहे! खुशाल बोल तुला काय बोलायचें असेल तें; माझी तुला अगदीं पूर्ण मुभा आहे हवें तें बोलायला!

**आनंदीः**—पहा बरें! नाहीं तर मग म्हणाल, मला, तूं "असें बोललीस–अन तसें बोललीस, "–म्हणून!

**दादा०**—अग मी तुला कांहीं सुद्धां म्हणत नाहीं बरें; बोल; तुला वाटेल तें बोल. माझी अगदीं पूर्ण तयारी आहे तूं म्हणशील तें सर्व ऐकून घेण्याची!

**आनंदीः**—ठीक आहे; ऐका तर! निझामाच्या कारवाईत आपला सल्ला न पटून माधव, त्र्यंबकराव मामाच्या मसलतीप्रमाणें वागला, यामुळें भर दरबारांत

आपला अपमान झाला असें समजून पेशवाईला बहिष्कार घालण्याचा मनसुबा पहिल्यानें घडविला, ते आपणच ना ?

**दादा०**—होय, मीच; पण तुझ्या सांगण्यावरून !

**आनंदीः**—सखारामबापू, व भाऊसाहेब मुतालीक वगैरे मंडळीवर भीड घालून आणि त्यांना कारभारांतून आपलें अंग काढून घेण्यास भाग पाडून माधवाला प्रत्येक ठिकाणीं अडवूं पाहण्याचा अट्टाहास केला, ते आपणच ना ?

**दादा०**—होय, पण तुझ्या म्हणण्यावरून !

**आनंदीः**—एकीची बेकी करून केलेल्या दुफळींत राज्यकर्त्या पेशव्याचा पक्ष कमताकद होऊन त्याला नाक घांसावयास लावावें, नाहीं तर त्यास नादान किंवा नेभळा ठरवावें, म्हणून सारखी धडपड केलीत, ते आपणचना ?

**दादा०**—होय, पण तुझ्या आग्रहावरून ! ( तोंड फिरवितो. )

**आनंदीः**—कांहो तोंडसें फिरविलेंत ? पुरें झाले काहो ? बोला की हो ? पटलें का माझें म्हणणें ? माझ्या सांगण्यावरून कां होईना, पण खरेंना हें माझें म्हणणें ? पटलें का ? पटलें का माझें म्हणणें ! बोला कांहो ? पटलें का हें माझें म्हणणें ?

**दादा०**—पटलें बरें आनंदी, पटलें; अगदीं—अगदीं पटलें मला तुझें म्हणणें ! पण मी तुला आतां खऱ्या मनोभावानें सांगतों कीं, ती माझी चूक होती ! त्यावद्दल मला पश्चात्ताप होत आहे, आणि म्हणूनच, आतां पुन्हां तुझ्या नादीं लागून असल्या निंद्य आचरणास पुन्हां प्रवृत्त व्हावयाचें नाहीं, असा माझा पूर्ण निश्चय झाला आहे !

**आनंदीः**—पण त्या मेल्या माधवानें आपली इतकी शोभा केली—इतकें निपटाऱ्यासारखें करून टाकलें—तरी सुद्धां तुमच्या मनांत त्याबद्दल थोडासा सुद्धां पीळ उत्पन्न होत नाहीं हें आश्चर्य नाहीं काय ? पुरुषार्थाचें मूळ अशाच वागण्यांत आहे काय ?

**दादा०**—अग, मीच जर आजपर्यंत पायाशुद्ध वागलों असतों, तर हल्लींच्या सारखा प्रसंग आपणावर कधीं तरी आला असता काय ? त्या माधवाची काय विशाद होती कीं, तो पायरी सोडून आपल्याशीं वागतां ? पण आपलाच दाम खोटा तेथें परक्याशीं झगडा तरी कसा करायचा आणि करून उपयोग तरी काय होणार आहे !

**आनंदीः**—पुरुषार्थाच्या तेजाचें हेंच लक्षण आहे काय ? अपमानाची जाणीव होण्याला अक्कल असली तरी अस्सल पाणीदारपणाहि अंगांत मुरलेला असावा लागतो ! समजलें का ? " पेशव्याचे कैदी " " पेशव्याचे कैदी " शरम-शरम हवी तुम्हाला या गोष्टीची !

**दादाः**०—मी काय करणार ! मी काय करूं ?

**आनंदीः**—मीं काय करूं ! हातांत बांगड्या भरा बांगडया ! बायकोच्या जन्मास आलां असतांत तर बरें झालें असतें, आणि असे निराशेचे दीनदुबळ्यांचे रडके उद्‌गार तुम्हास कदाचित्‌ शोभले असते ! तुमच्याहून मी शतपट बरी ! म्हणे मी काय करूं ! बांगडया भरा बांगडया !

**दादा०**—( रागानें ) आनंदी, तूं फार फार बेफाम होत चालली आहेस बरें का अलीकडेस ? तुझ्या तोंडाला आताशां मुळींसुद्धां धरबंध राहिला नाहीं आहे बरें का ? कोणाला ग तूं अशी टाकून बोलतेस ? समजते आहेस कोण तूं स्वतःला आपल्या मनांत ? आणि तुझी किंमत तरी काय आहे माझ्यापुढें ? लाज नाहीं वाटत इतकें चवचालपणानें बोलायला !

**आनंदीः**—म्हटलें, आपणच आणली आहे बरें का ही अशी निर्लज्ज होण्याची वेळ !

**दादा०**—बरें, बरें; बस्स, तोंड अटोप; पुरे कर तुझें शहाणपण ! समजली तुझ्यांत कितीशी अक्कल आहे ती ! तुझ्या मानानें तो माधव किती तरी पटीनें बरा म्हणायचा कीं, तो निदान असें तुझ्यासारखें कधीं टाकून तरी बोलला नाहीं मला आजपर्यंत ! दुर्मत घेतेस काय अशी माझी नेहमीं; कांहीं शंका नाहीं ! माझा माधवच तुझ्याहून शतपटीनें चांगला ! !

**आनंदीः**—पाहिलेंत ! त्या माधवाचा असा नेहमीं कळवळा दाखवायचा होतो म्हणूनच मलाहि नेहमीं आपणाला हें असें मुद्दाम बोलावें लागतें समजलांत ? चांगला म्हणूनच येथली हवा खावी लागते आहे वाटतें ही आपणाला ?

**दादा०**—अग, प्रत्येक बाबतींत हार म्हणून घ्यावयाचीच नाहीं, अशाच हट्टी निश्चयानें जर आपण आजपर्यंत वागत आलों, तर त्यानें तरी काय करायचें ? त्याचा अगदीं-अगदीं नाइलाजच जर आपण केला तर तो तरी कसा वागणार

सन्मानानें आपल्याशीं ? त्यानें आजपर्यंत अगदीं-अगदीं शिकस्त केली आहे आपल्याकडून आम्हाला शुद्धीवर आणण्याची! पराकाष्ठा झाली आहे त्याची!

**आनंदी:**—तुमच्यापुढें डोकें आपटून जीव देईन माझा समजलांत पुन्हां हें असलें कांहीं तरीं भरकटत सुटलांत तर! तुमचे घटकेंत तीन रंग होत असतात नेहमीं! "एकना धड आणि भाराभर चिंध्या" असा चालला आहे अलीकडे तुमचा जन्म फुकट. "माझा माधव, माझा माधव," असा सारखा जप चालला आहे जप त्याच्या नांवाचा! एकदां हातांत आतां जपमाळ घ्या आणि करा त्याच्या नांवाचीं पारायणें, म्हणजे होईल सार्थक एकदाचें जन्मास आलांत त्याचें!

**दादा०**—अग जपमाळच घेण्याचें शेवटीं नशिबीं येणार आहे समजलीस!

**आनंदी:**—अहो जा; काय मगदूर आहे जपमाळ हातांत येईल? पण माझें मुळीं कांहीं चालूंच द्यायचें नाहीं मग मी तरी काय करणार? मी बायको असून बरी, पण तुम्ही पुरुष असून सुद्धां कांहीं उपयोगाचे नाहीं, असेंच म्हणणें भाग झालें आहे मला आतांशी! मी आपणाकरितां इतकी धडपड करतें! पण येतें आहे का कांहीं लक्षांत? काहो, कांहीं मानापनाची तरी जाणीव आहे का आपणाला?

**दादा०**—आहे!

**आनंदी:**—कारागृहवासांतील हल्लींच्या स्थितीची?

**दादा०**—आहे!

**आनंदी:**—मग?

**दादा०**—काय?

**आनंदी:**—मी सांगेन तें निदान ऐकून घेण्याची तरी इच्छा?

**दादा०**—नाहीं-आहे!

**आनंदी:**—मग मी मघांचे माझे तिखट शब्द परत घेतें.

**दादा०**—आनंदी!

**आनंदी:**—काय?

**दादा०**—तुझें म्हणणें काय आहे?

**आनंदी**—आपला निश्चय काय आहे?

**दादा०**—माझा अजून कोणताच निश्चय कायम होत नाहीं!

**आनंदी:**—निश्चय कायम करा!

**दादा०**—होत नाहीं!

आनंदी:—सांगेन तें ऐकाल काय ?

दादा०—ऐकेन-नाहीं. ऐकेन, ऐकतो !

आनंदी:—वचन द्या !

दादा०—शब्दावर भरवंसा ठेव !

आनंदी:—वचन द्या !

दादा०—पण तूं कांहीं भलतेंसलतेंच करायला सांगितलेंस तर ?

आनंदी०—सांगणार नाहीं !

दादा०—तुझें म्हणणें योग्य असेल तर हें घे वचन. ( वचन देतो. )

आनंदी:—कशीहि तजवीज करून येथून सुटून जाण्याची पहिल्यानें तजवीज करा !

दादा०—कशी ?

आनंदी:—किल्लेदाराकडे संधान बांधा आ—

दादा०—किल्लेदाराच्या हाडामासांत अस्सल इमानीपणा आहे !

आनंदी:—वः हें तर फारच चांगलें; त्यामुळें तर आपलें खात्रीनेंच काम फत्ते होईल !

दादा०—कसें ?

आनंदी:—हाडामासांत दवलेलें इमान बाहेर फुटून निघूं नये, आणि त्याची आंतल्याआंतच भळचेपी व्हावी, म्हणून किल्लेदाराच्या हाडामासांवर आपण सोन्या-च्या जाड पत्रा मढवून टाकूं !

दादा०—आणखीं ?

आनंदी:—आणखीं येथून सुटल्यावर शिंदेहोळकरांची मदत घेऊन—

दादा०—तुझ्या लक्षांत कसें रहात नाहीं ? ते आपणांस मदत देणार नाहींत !

आनंदी:—भोंसले व गायकवाड यांनां पटवून—

दादा०—पुन्हांहि विसरलीस ! ते माधवाच्या विरुद्ध जाणार नाहींत !

आनंदी:—हैदर, निझामाची, मदत घेऊन—

दादा०—पुन्हांही चुकलीस ! ते आपणास मदत करणार नाहींत !

आनंदी:—मुंबईकर, अथवा गोंवेकर फिरंग्याची मदत घेऊन—

दादा०—काय करूं ?

आनंदी:—माधवाला जमिनदोस्त करा !

दादा०--आनंदी, मी पहिल्यानें वचन देऊन फसलों असेंच मला आतां वाटूं लागलें आहे ! तथापि तुझें सांगणें अयोग्य असल्यास त्याप्रमाणें वागणार नाहीं असेंहि तुला मी प्रथमच स्पष्ट बजावलें आहे. शिवाय तुझी ही मसलत अत्यंत घातक होणारी आहे--

**आनंदी:**— ( रागानें ) काय ?

**दादा०**--तरी पण मला आतां या गोष्टीचा पुन्हां एकदां शांतपणें विचार करूं दे !

**आनंदी:**--करा करा बरें ! अगदीं-अगदीं शांतपणानें विचार करा ! पण काय हो, आज बापू येणार आहेत म्हणे आपल्या भेटीला ?

**दादा०**--होय; येणार आहेत.

**आनंदी:**—मग त्यांनांहि हाच शांतिपाठ म्हणून दाखवायचा असेल नाहीं ?

**दादा०**—काय घडेल तें खरें त्यावेळीं ?

**आनंदी:**—पहा बरें पुन्हां बजावतें ! नाहीं तर करून ठेवाल घाण कुठें तरी, आणि शेवटीं निस्तारायची वेळ येईल मला !

**दादा०**—(रागानें) आनंदी, तूं पुन्हां आपली पायरी सोडून बोलूं लागलीस ! पण याचा परिणाम एखादे वेळीं फार-फार भयंकर होईल बरें ! धन्याच्या मेहेरबानीनें लाडावलेल्या व त्याच्याच निव्वळ आश्रयानें तुकडे मोडणाऱ्या कुत्रीला जसा खोटा अहंकार उत्पन्न होतो, तसाच तुलाही—( इतक्यांत सखारामबापू भेटीस आल्याची वर्दी येते; दादासाहेब "ठीक आहे येऊंदे त्यांनां," असें सांगतात; बापू येतात. )

**बापू:**—(स्वागत) देवाची लीला अगाध आहे ! हरहर ! काय ही दादासाहेबांची स्थिति ! फाजील लाडानें शेंफारलेल्या बायकोच्या नादानें वागणारा नादान नवरा असाच कधींना कधीं तरी तोंडघशीं पडणार ! बायकोचे फाजील चोचले पुरवून तिला आपल्या डोक्यावर खुषीनें बसवून घेणारा नवरा, तिची लहर फिरली कीं तिच्याच भस्मासुरी हाताच्या कठोर करणीनें नामशेष होणार ! पहिल्यापासून योग्य मर्यादेंत न ठेवतां बायकोचें अस्ताव्यस्त स्तोम माजवून तिला नेहमीं आपल्या मस्तकावर नाचूं देणारा अधाशी नवरा, तिच्या ठाकाठिकींत चुकला कीं त्याच लातेनें भिरकाविला जाणार ! काळ नष्ट आला ! दादासाहेबांसारखा तेजस्वी हिरा कवडीमोल झाला ! आपला बदलौकिक करून घेतला ! पेशवाईची अपकीर्ति केली ! आणि साम्राज्याचा

आब घालविला ! ( पुढें होऊन दादासाहेबांस नमस्कार करतो; दादासाहेब नमस्कार घेऊन " या बापू या, बसा बापू बसा, " असें म्हणतात; बापू बसतात; )

**आनंदी:**—( डोळ्यास पाणी आणून ) बापू, अहो बापू ! आम्हाला कोणत्या स्थितींत या माधवानें आणून टाकलें आहे हें आपण पाहिलें काय ? माधवाचें आमच्याशीं हें असें वागणें योग्य आहे असें तुम्हाला तरीं वाटतें का हो बापू ?

**बापू:**—बाईसाहेब, आपणां उभयतांनांहि ह्या स्थितींत पाहून कोणाला तरी चांगलें वाटेल काय ? त्यांतून माझा तर पहिल्यापासून आपणाकडे ओढा, त्यामुळें निदान मला तरी कसें बरें हें चांगलें वाटेल ? पण मी तरी काय करूं ? आपणाला जर मुळीं आपला दुराग्रहच सोडायचा नाहीं तर कोणीही झालें तरी काय करूं शकणार आहे ह्या बाबतींत ?

**आनंदी:**—पण बापू, ह्या माधवानें निदान-निदान आमचे हे असले सोहाळे तरी करायचे नव्हते हो ! इतक्या सातापाहाऱ्यांत आम्हाला अशा बंदोबस्तानें ठेवणें त्याला शोभलें काहो बापू ?

**दादा०**—त्याचें आजपर्यंतचें सर्व आचरण अगदीं न्यायाचेंच आहे का हो बापू !

**बापू:**—दादासाहेब—

**दादा०**—मी भोळा व बाईलवुद्ध आहें अशी टिमकी-नव्हे नगारा, कोणीं वाजविला ? कैदी होण्याचा खडतर प्रसंग माझ्यावर कोणीं आणला ? मी तुरुंगांत खितपत मरावें अशी माझी अत्यंत हीन दशा कोणीं केली ? सुतळीच्या एका तुकड्यावरही माझी मालकी चालू नये, असा दुर्धर प्रसंग माझ्यावर कोणीं आणिला ?

**बापू:**—आपण ! आपण स्वतः ! ! आपण स्वतःच दादासाहेब ! ! !

**दादा०**—मग कशाला तुम्ही इकडेस येण्याची तसदी घेतलीत ?

**बापू**—आपल्या हल्लींच्या स्थितींत आपणास अंशतः तरी उपयोगीं पडावें म्हणून!

**दादा०**—( टोंचून ) आपण घेतलेल्या तसदीबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें.

**बापू:**—दादासाहेब, असें मला तरी निदान आपण टोंचून बोलायला नको होतें ! आपण हल्लीं ज्या स्थितींत अहांत त्या परिस्थितींत आपल्या मनोवृत्ति नाजूक होणें स्वाभाविक आहे, पण त्यांतहि मनुष्य न ओळखण्या इतक्या—

दादा०—बापू, मी अलीकडे अगदीं कावून गेलों असल्यानें मी काय बोललों, आणि बोलतों, या गोष्टीचें मला मुळीं भानच रहात नाहींसें झालें आहे! पण तुम्ही त्याबद्दल कांहीं सुद्धां मनांत आणूं नका बरें बापू? माझ्या ह्या स्थितींत मला नुसती शाब्दिक सहानुभूति दाखविणेंहि मोठ्या धोक्याचें व धाडसाचें आहे! आणि नसती कळ नळीं बसवून घेण्याचा कांटेरी मोठेपणा दाखविण्याला आपणाशिवाय इतरांजवळ खरोखर मनोधैर्याचा आभाव आहे—

बापूः—आणि म्हणूनच मी आपणाकडेस पुन्हां याचना करण्यास आलेलों आहें!

दादाः—काय?

बापूः—आपण श्रीमंत रावसाहेबांशीं समेट करा!

दादा०:—आणखी?

बापूः—सलोख्यानें वागा!

दादा०:—कोणत्या अटीवर?

बापूः—कोणतीहि अट न घालतां!

दादा०:—म्हणजे?

आनंदीः—म्हणजे घातल्या तुकड्यावर, आणि दिल्या वस्त्रावर!

दादा०:—असेंच कीं नाहीं बापू!

बापूः—नाहीं.

दादा०:—मग?

बापूः—आज्ञा कराल तशा इतमामावर, व इच्छा दर्शवाल तशा ऐश्वर्यावर!

आनंदीः—अगदीं खोटें आहे!

बापूः—अक्षरशः खरें आहे!

दादा०:—मी ही गोष्ट कालत्रयींहि मान्य करणार नाहीं!

आनंदीः—मेलेल्या अन्नावर जगत राहण्याची आमची बिलकुल इच्छा नाहीं!

बापूः—विचार करा, दादासाहेब विचार करा!

आनंदीः—अहो जा! कसला हो विचार करायला सांगतां अहांत आम्हाला? म्हणे "मी तुमच्या पक्षाचा आहे आणि माझा ओढा तुमच्याकडेस आहे;" आहे, खराच आहे! दिसतोच आहे हा अगदीं उघड उघड! बापू, तुम्हाला राग येईल आतां स्पष्ट बोललें तर! पण तुम्ही-तुम्ही सुद्धां त्या माधवाच्याच पक्षाचे अहांत अशी

माझी पूर्ण खात्री झाली आहे आतां ! तुम्हाला आठवतें काहो बापू, "माधवाची चूक आहे" असें एकदां तरी म्हटल्याचें ?

**बापू:**—बाईसाहेब, मेहरबानी करून मला दादासाहेबांशीं बोलूं द्याल काय ?

**आनंदी:**—अहो त्यांच्याशीं कशाला बोलतां ? माझ्याशींच बोला ना तुम्हाला काय बोलायचें आहे तें; भुरळ घालतां कीं काय त्यांनां गोड गोड बोलून ?

**बापू:**—दादासाहेबांनां भुरळ घालून त्यांच्यापासून मला काय मिळवावयाचें आहे ? बाईसाहेब ! आपणामुळेंच दादासाहेबांवर हा प्रसंग ओढवला आहे ! जिथें तिथें आपलेंच घोडें मध्यें ढकलण्याच्या तुमच्या ह्या अगांतुकी व अन्यायी घातुक संवईमुळेंच पेशव्यांच्या घराण्यांतील भाऊबंदकीच्या खेळ-खंडोबांनां ऊत आला आहे ! तुमच्यामुळेंच मराठेशाहींत प्रत्येक प्रकारची आगलावी भानगड उत्पन्न झाली आहे ! आणि तुमच्या—निव्वळ तुमच्यामुळेंच—तुमच्या असुरी राज्य-तृष्णेमुळें, तुमच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या सैतानी नाचरंगामुळें, आणि तुम्ही—तुम्ही—तुमच्यासारखा बनावटी बदसल्लागार मिळाल्यामुळेंच एखाद्या बदमाषा-प्रमाणें कारागृहांतील खडतर व कष्टमय आयुष्य कंठण्याचें दादासाहेबांच्या नशिबीं आलेलें आहे ! दादासाहेब, विचार करा ! अजूनही विचार करा ! भर पुरांत उडी टाकण्यास उत्तेजन देणारे जगांत पुष्कळ आहेत ! पण बुडूं लागल्यास आपला जीव धोक्यांत घालून त्याला हात देणारा विरळाच !

**आनंदी:**—बरें, बरें, आम्हाला जेव्हां बुडण्याची वेळ येईल, तेव्हां आम्ही तुम्हालाच हांक मारूं, आणि मगच त्यावेळीं तुम्हीं आम्हाला हात द्या बरें का ?

**बापू:**—दादासाहेब, आपण एकंदर परिस्थिति लक्षांत आणा ! श्रीमंत राव-साहेब हल्लीं बरेच आजारी आहेत; त्यामुळें आपल्या ह्या दुराग्रहानें अशा स्थितींत त्यांना किती दुःख होईल याची आपण कल्पना करा ! श्रीमंत नानासाहेबांनां अखेर-च्या वेळीं दिलेल्या वचनाची आठवण ठेवा ! "मी आपल्या मुलांनां अंतर देणार नाहीं" ह्या आपल्या वचनाला हरताळ फांसूं नका ! श्रीमंत नानासाहेबांचा प्राण घुटमळत असतां तुम्ही दिलेल्या शब्दामुळें त्यांनीं तुमच्यावर विश्वास ठेवून तो शांत-पणें सोडला, हा प्रसंग लक्षांत आणून मृत मनुष्याच्या अखेरच्या इच्छेचा दग्यानें विश्वासघात करूं नका ! श्रीमंत नानासाहेब आणि आपण, पाठीस पाठ लावून आलेले सख्खे भाऊ आहांत, एकाच रक्ताचे, व हाडामासाचे आहांत, ही गोष्ट लक्षांत घेऊन........

**दादा०**—पुरे, बापू पुरे ! तुम्ही सांगाल त्याप्रमाणें वागण्यास मी तयार आहें; अखेर कांहीं झालें तरी नानासाहेबांचीं मुलें तीं माझींच मुलें आहेत ! माधव आजारी असतांना त्याच्या मनाला माझ्यामुळें यत्किंचितहि क्लेश न व्हावेत अशी माझी मनापासून इच्छा आहे, आणि त्याच्या इच्छेकरितां मी हवें तें करण्यास तयार आहें ! जा, बापू जा ! आणि माझ्या माधवास सांगा कीं मी तुझ्या इच्छे-प्रमाणें वागण्यास तयार आहें; ईश्वरकृपेनें तुला लवकर आराम होवो, अशी माझी इच्छा आहे, आणि तुझ्या मनोवृत्ति तिळभरहि दुखावल्या न जाव्या अशी माझी मनापासून भावना असल्यामुळें, तूं बरा होईपर्यंत मी ह्या प्रतिबंधांतच राहण्यारा आनंदानें तयार आहें ! बापू, माझ्या पापक्षालनाकरितां मला अजून पुष्कळ सांगावयाचें होतें, पण नको आतां ! ही वेळ नाहीं तुम्हांस येथें अधिक वेळ बसवून ठेवण्याची ! जा, बापू, जा; त्याला जपा ! त्याची काळजी घ्या ! त्याला धीर द्या ! आणि त्याचें प्रकृतिमान मला नेहेमीं कळविण्याची खबरदारी घ्या ! जा, बापू जा ! उठा; जा; लवकर जा ! एक शब्द सुद्धां इथें बोलण्यांत वेळ घालवूं नका आतां; जा, बापू जा !

**बापू**—( उठून नमस्कार करून ) ठीक आहे दादासाहेब; घेतों तर मग मी आपली आज्ञा. ( जातात. )

**आनंदी**—तुमचें जळ्ळें लक्षण तें ! ठीक केलेंत ! अगदीं ठीक केलेंत ! अस्सें-अस्सेंच करावें ! चांगलें–फार चांगलें केलेंत ! अस्सें–अस्सेंच वागावें बरें, म्हणजे अंगदीं हटकून हातांत नरोटी येईल नरोटी ! ( इतक्यांत किल्लेदार प्रवेश करतो. )

**किल्लेदार**—( नमस्कार करून ) श्रीमंतरावसाहेब पेशव्यांची प्रकृति बेताल झाल्यानें स्वारींच्या इच्छेप्रमाणें त्यांनां थेऊर येथें श्रीगजानन महाराजांचे सन्निध नेऊन ठेवण्यांत आलें आहे ! श्रीमंतांचें ठीक चिन्ह दिसत नसल्यानें आपणास ताव-डतोब बंधमुक्त करून थेऊरला रवाना होण्याची विनंति करण्याविषयीं मला आज्ञा झाली आहे; तरी आपण होईल तितकें लवकर जाऊन श्रीमंतास भेटण्याची कृपा करावी; रजा घेतों मी आपली दादासाहेब; ( नस्मकार करून जातो )

**आनंदी**—बरें झालें मरतो तर ! मर म्हणावें अगदीं लौकर मर ! होईल तितक्या जलदीनें मर ! आतां लागली का मेल्या आमची गरज अंतकाळ जवळ आला तेव्हां ? तोंड सुद्धां पाहूं नका त्या कार्ट्याचें !

**दादा०:**—अरेरे! आनंदी, प्रत्यक्ष वैरी सुद्धां अशावेळीं वैरभाव विसरून जातो! "जावें तोरणीं कीं जावें मरणीं" असें वागण्याचा सांप्रदाय आहे; "विवाह" आणि "मृत्यु" ह्या दोन गोष्टी मानवी आयुष्यांत अत्यंत झपाट्यानें स्थित्यंतर घडवून आणणाऱ्या आणि मानवी प्राण्यांच्या कोमल मनोवृत्तीस हेलकावे देणाऱ्या आहेत! पण त्यांतल्या त्यांत "मृत्यु" हा मानव जातींत मूळभूत असलेल्या अत्यंत नाजुक मनोविकारांनां जिवंत करून चलन देणारा धन्वंतरी असल्यामुळें जातिवंत दुष्मन् सुद्धां आपल्या कट्टया प्रतिस्पर्ध्याच्या स्मशानयात्रेस हजर राहून त्याला अखेरचा मान सन्मान देत असतो!! पण तूं इतकी उफराट्या काळजाची आहेस, कीं गेल्या-विसरल्या गोष्टींचीही आठवण उकरून काढून तेजोभंग करणाऱ्या शब्दानें आपल्या मनाचा नीचपणा प्रगट करण्याला तुला उलटयाच वेळीं चेव येतो!! अग, मृत्यूच्या दाराशीं पडलेल्या पोरक्या माधवाशीं आतां कशाचें वैर करवयाचें? तुझी वाचा आम्हास भोंवणार! तूं आमच्या मुळावर आली आहेस! तुझ्या दुष्टपणाचा कळस झाला! तुझी अभद्र वाणी खरी झाली! तुझ्या विषारी वाणीचें जहर आम्हां सर्वांस बाधणार! अशानें आम्हास कसे चांगले दिवस यावेत; ?

**आनंदी:**—येतील–येतील–खात्रीनें येतील.

**दादा०**—केव्हां ?

**आनंदी:**—पेशव्यांच्या वडील घराण्याचा निर्वंश होईल तेव्हां!

**दादा०**—हरहर! आग लागो तुझ्या ह्या राक्षसी तोंडाला, आणि असली अभद्र व अनुचित वाणी उच्चारणाऱ्या तुझ्या जिभेला! पेशव्यांच्या घराण्यांत ही गारगोटी कशी येऊन पडली! अधःपातास कारणीभूत होणारी ही कलिमूर्ती आमच्याच घरांत कशी पैदा झाली! स्त्रीचारित्र्याच्या असुरी उन्मादाची आणि अढळ अशा कठोर मनोवृत्तीची सुंदर स्वरूपाची ही महामाया माझ्याच पदरीं कशी पडली! आपल्या अप्रतिम सौंदर्यास वळी पडून उल्लू बनविल्यावर आपल्याच बरोबर आणि आपण सांगूं तसाच खडा नाच घालण्यास प्रवृत्त करून अखेर आपल्या डोक्यावर ठेविलेल्या स्वतःच्या हातानेंच मूठमाती घेण्यास भाग पडणारी ही मायावी स्वरूपाची "मोहिनी" माझ्याच नशिबीं कशी आली! आम्हांस यापुढें सुखाचे दिवस केव्हां......

**आनंदी:**—पेशव्यांच्या वडील घराण्याचा निर्वंश कराल तेव्हां!

**दादा०**—तोंड आटोप; तोंड बंद कर; तोंड एकदम बंद करतेस कीं नाहीं ! जा, नीघ, नीघ येथून; तोंड काळें कर माझ्या समोरून; परमेश्वरा ! काय ही आमची स्थिति ! मानवी प्रवृत्तीची केवढी ही अधोगति ! ईश्वर तरी आमची अशा स्थितींत कशी कींव करणार! छान–अगदीं छान काळें फासून घेते आहेस तूं आपल्या तोंडाला ! माझ्या माधवावरची तूंच कां मरत नाहींस ! तोंड काळें कर माझ्या समोरून ! माझा माधव—मी जातोंच आतां त्या—

**आनंदी०**—( त्यांस अडवून ) पण—

**दादा०**—नाहीं ! मी तुझें यापुढें अगदीं–अगदीं सुद्धां ऐकणार नाहीं ! वस्स, जाणार ! जाऊन माझ्या माधवाला भेटणार ! आणि त्याची माफी मागून आपापसांत भांडलों तरीहि आम्ही अखेर एकच आहोंत, असें मी त्याप्रमाणें वागून जगाला दाखविणार ! ( आनंदीबाई त्याला अडविते, तिला एकीकडे लोटून ) खबरदार पुढें आलीस तर ! माझ्या जाण्याला अडथळा केलास, तर तुझे तुकडे तुकडे करीन ! ( आकाशाकडे पाहून ) परमेश्वरा ! माझ्या माधवाला आयुष्य दे ! त्याची माझी भेट होऊं दे ! मला त्याच्याशीं दोन दिलाशाचे गोड शब्द बोलूं दे ! आणि तो या दुखण्यांतून बरा होऊं दे ! माजी पेशवा नानासाहेब यांची हीं दोन दुर्दैवी मुलें–माझ्या सख्या वडील भावाचीं माधव व नारायण हीं दोन पोरकीं अपत्यें–त्यानें अखेरच्या वेळीं माझ्या दिमतींत सोंपविलीं, आणि मीहि " त्यांचें प्राणापलीकडे जतन करीन " असें त्याला वचन दिलें ! तें वचन मला पाळलें पाहिजे. त्याकरितां मला पेशवाई न मिळाली,–आमच्या वंशजास ती भोगावयास न सांपडली–तरी बेहेत्तर ! पण एकाचा प्राण जाण्यानें, अथवा दुसऱ्याचा घेण्यानें, रिकाम्या होणाऱ्या–आणि पुतण्याच्या रक्तानें लाल करणाऱ्या–रुधिरप्रिय वासनेनें विटाळल्या जाणाऱ्या गादीवर बसून अधिकारवैभवाचा उपभोग घेण्याची सैतानी हांव मी कधींहि बाळगणार नाहीं ! इतकेंच नव्हे, तर माझ्या ह्या दोन्हीं मुलांच्या प्राणाला तर काय, पण त्यांच्या प्रत्यक्ष केंसालाहि यत्किंचित् धक्का लागण्याची मला नुसती शंका आल्यास सुद्धां त्याबद्दलचा सूड घेण्याकरितां आकाशपाताळ एक केल्याशिवाय मी कधींहि रहाणार नाहीं ! !

( पडदा पडतो. )

# प्रवेश ] अंक चवथा [ दुसरा.

( रखमाबाई रागावून उभी आहे, व विठ्ठलशास्त्री तिच्याकडे पहात आहे, असा पडदा उघडतो. )

**विठ्ठलः**—अरे वाहवारे वाहवा ! आपणच ढोंग करावें आणि तें उमगल्या-बद्दल आपणच हें असें पुन्हां तोबऱ्यासारखें तोंड फुगवून बसावें ! खासा न्याय आहे नी काय बेटा; करून सवरून पुन्हां आपली शिरजोर ती शिरजोरच !

**रखमाः**—मी किनई आतां एक शब्द सुद्धां अधिक बोलायची नाहीं असा नियम केला आहे बरें का ?

**विठ्ठलः**—बरोबर, अगदीं बरोबर; अस्साच नियम केला पाहिजे निदान तुझ्या सारख्यांनीं तरी !

**रखमाः**—पण आपणापुढें माझा नियम टिकेल तेव्हां ना ?

**विठ्ठलः**—अग पण मी आजपासून काय नियम केला आहे तो तूं कुठें ऐकला आहेस ?

**रखमाः**-सगळें ऐकलें आहे मी; आतां कांहीं सुद्धां बाकी राहिलें नाहीं ऐकायचें !

**विठ्ठलः**—अग गम्मत आहे गम्मत ! खूषच होशील ऐकशील तर.

**रखमाः**—कांहीं जरूर नाहीं मला त्या गमतीची ! पुरली आहे माझी सगळी हौस पुरली आहे ! गम्मतच पहात आलें आहें मी नशिबाची आजपर्यंत !

**विठ्ठलः**—बघ, बघ, मग सांगणार नाहीं बरें का ?

**रखमाः**—बरें, बरें, नका सांगूं !

**विठ्ठलः**—मी आजपासून असा नियम करणार होतों कीं, जे आहेत्ते आपण घरांत नेहमीं सलोख्यानें वागावें, आपल्या कुटुंबाचें ऐकत जावें, आणि कधींही भांडणतंटा न करितां आपल्या कुटुंबाला सदोदित सुखांत ठेवण्या-करितां—आपल्या जिवाचें रान करावें लागलें तरी बेहेत्तर—पण प्रयत्न करीत जावा; तथापि आमचा हा नियम ऐकण्याची सुद्धां आमच्या कुटुंबास इच्छा नसल्यानें—

**रखमा:**—अहो पण मी-मी ऐकतें आहेना आपला काय नियम आहे तो! ( हंसत ) खरें का आपण असा नियम केला आहे? ( लडिवाळपणानें जवळ जात जात ) खरेंच का गडे आपण आतां म्हणालांत तें?

**विठ्ठल:**—( स्वगत ) वर्फ वितळूं लागलें वरें का. ( उघड ) अग हो; अगदीं अगदीं खरें आहे वरें; ये अशी अगदीं-अगदीं माझ्याजवळ ये; ( तिच्या पाठीवर हात फिरवीत ) हें पहा, तुला सांगूं का—

**रखमा:**—( हात झिडकारून लांब होऊन ) इश्श मेलें; लांवून नाहीं वोलतां येत वाटतें?

**विठ्ठल:**—अगदीं माशीसुद्धां अंगावर ठरूं देऊं नकोस वरें का? अग वोलतां आलें तरी आठवलें पाहिजे ना काय वोलावयाचें तें? वरें, माझ्याजवळ तरी निदान येऊन उभी राहशील कीं नाहीं? ये; अशी जवळ ये; ( जवळ जाते ) माझ्या आठ वर्णीला आतां पाझर फुटणार हें खास! अग हें पहा, तूं अशी ही माझ्याजवळ येऊन उभी राहिलीस म्हणजे "चौदा विद्या" आणि "चौसष्ट कळा" कशा मूर्तिमंत माझ्या डोळ्यासमोर दिसूं लागतात, आणि अंगांत कवित्वाचा संचार होऊन तुझे गुणानुवाद वर्णन करण्याची एकदम स्फूर्ति होते!

**रखमा:**—कांहीं तरीच मेलें; कशाचे काय जण माझे गुणानुवाद गायचे!

**विठ्ठल:**—अग, अग, इतकी मुरकूं नकोस! ये, जवळ ये; (जवळ जाते) अग, काय सांगूंग तुला; हें पहा, तूं खरोखर आहेसच वरें तशी गुणानुवाद गाण्यासारखी! लाडके ऐक; मी जे आहेत्ते कालाचे ठायीं आतां तुझ्या गुणानुवादाचें वर्णन करण्यास प्रारंभ करतों, तो तूं एकचित्तें करून जें आहेत्तें श्रवण कर. ( जोरानें खांकरतो ) ऐकलेंस?

**रखमा:**—हें काय? हें तर आपण खोंकलांत!

**विठ्ठल:**—खोकलों नाहीं खांकरलों; तुला समजत नाहीं म्हणतों तें हेंच! अग, वोलण्यापूर्वी पहिल्यानें घशाची नळी खांकरून-खोंकरून अशी साफ केलेली असली कीं, घशाच्या पडद्यांतून वाहेर येणारा आवाज कसा पण अगदीं खणखणित होऊन जातो म्हणून सांगूं तुला! झाला काग माझा आवाज अगदीं खणखणित! का करूं पुन्हां एकदां घशाची नळी साफ!

**रखमाः**—नको, नको; कांहीं नको; अगदीं खणखाणित झाला आहे आपला आवाज; ऐकूंद्या, ऐकूंद्या कीं एकदां आपलें काय कवित्व आहे तें ?

**विठ्ठलः**—अग, ह्या माझ्या कवित्वांत मी तुझ्यावर असा कांहीं स्तुतीचा वर्षाव करणार आहें कीं गुदगुल्याच होऊं लागतील तुला मनांतल्या मनांत ऐकल्यावरोबर !

**रखमाः**—अग वाई, खरें कीं काय ?

**विठ्ठलः**—अग हो खरें नाहीं तर ! मी आतांशा तुझ्याशीं कधीं तरी खोटें बोललों आहे बरें ?

**रखमाः**—मी चुकलें म्हणतें, मग तर झालेंना? हात जोडूं का आपल्यापुढें ?

**विठ्ठलः**—अग नकोग; अरे हो विसरलोंच शिंचें ! काय बरें कवित्व करणार होतों मी ? ( तिच्याकडे पहात ) हं; थांव, अग, अग, तोंड फिरवूं नकोस; येऊं लागलें वघ होऱ्यांत ! अग पण, वघ, वघ, आठवणीच्या शोधांत एक नवाच शोध एकदम लागून गेला आहे आत्तांच मला ! अहाहा ! काय पण शोध पण शोध !

**रखमाः**—काय तो ?

**विठ्ठलः**—काग, आपणाला कांहीं गोष्टीची वेळेवर आठवण व्हावी म्हणून आपल्यांत एखाद्या वस्त्राला "आठवण गांठ" मारण्याची चाल आहे, नाहींग ?

**रखमाः**—होय अशी चाल आहे खरी; मग ?

**विठ्ठलः**—पण मी म्हणतों, ह्या माझ्या नव्या शोधाची साधी, सोपी व अधिक सुखकर युक्ति कां अमलांत आणूं नये ?

**रखमाः**—कोणती ती ?

**विठ्ठलः**—वस्त्राच्या निर्जीव गांठीपेक्षां लग्नाचीसजीव गांठच अधिक गुणावह व सुखावह नाहीं काय ?

**रखमाः**—म्हणजे ?

**विठ्ठलः**—म्हणजे वायकोला एखाद्या गोष्टीची आठवण होत नसली कीं, तिनें नवऱ्याच्या चेहऱ्याकडेस पहात रहावें, आणि नवऱ्याला एखाद्या गोष्टीची आठवण व्हावी लागली कीं, त्यानें वायकोच्या मुखड्याकडे टक लावावी, म्हणजे लागलींच शंकराच्या मस्तकांतून ज्याप्रमाणें गंगा निघाली, त्याप्रमाणें

स्त्रीपुरुषांच्या मस्तकांतून विसरलेल्या आठवणींचा प्रवाह " धो धो " करीत पायावर लोटांगणें घालूं लागतो ! शिवाय लग्नाच्या सजीव गांठीनें बद्ध झालेल्या स्त्रीपुरुषांनीं एकसारखें टक लावून परस्परांकडे पहात रहाण्यांत जी एक प्रकारची लवचीक लज्जत उत्पन्न होते, तशी मजा थोडीच वस्त्राच्या निर्जीव गांठीकडेस पाहून उत्पन्न होणार आहे ? का आहे कीं नाहीं हा अपूर्व शोध ?

**रखमाः**—( लाजेनें तोंड फिरवीत ) इश्श !

**विठ्ठलः**—असे एखाद्या मखरांतल्या मुलीसारखे मुरके ग काय घेत असतेस तूं अशी नेहमीं ?

**रखमाः**—आपल्यासारखी मी कुठें इतकी लाजलज्जा ठेविली आहे अजून गुंडाळून !

**विठ्ठलः**—अग, लाजलज्जा इतकी का लवचीक आहे असें तुला वाटतें, कीं ती आपली हवी तेव्हां गुंडाळून तिची घडी घालून ठेवितां येईल ?

**रखमाः**—पण कांहीं मेला ताळमेळ नको वाटतें ठेवायला माणसानें ! मेली सदानकदा आपली तीन् तीच रड ! म्हातारचळ लागेल बरें का अशानें म्हातारचळ !

**विठ्ठलः**—पाहिलेंस; तुला मी जें समजत नाहीं म्हणून म्हणतों तें हेंच ! अग, अशा नादानें म्हातारचळ लागत नाहीं, पण लागला असल्यास जातो, आणि लागायचा असल्यास एकदम थांबून जातो.

**रखमाः**—जाऊं का मी येथून आपल्या समोरून कशी ती एकदाची !

**विठ्ठलः**—असें ग काय एखाद्या नव्या नवरीसारखें बिचकत असतेस तूं नेहमीं !

**रखमाः**—पुरे–पुरे झाला आतां हा पांचटपणा ! एखाद्या आशाळभुतासारखें माझ्या तोंडाकडे हो काय सारखे पहात राहिले आहांत ?

**विठ्ठलः**—अरे, अरे, अग, गप बस, गप बस; बघ, डोक्यांत आलेलें डोक्यांतून जाईल; पण काग तुझी फार तारीफ केली,–तुझ्या डोक्यावर मी सारखा स्तुतीचा वर्षाव केला तर तूं पुन्हां पूर्वपदावर तर नाहींना येणार ? हो नाहीं तर आपलें असें व्हायचें कीं कोणीकडून झक मारली आणि तुझी स्तुति केली !

**रखमाः**—इतकी का मी वेडी आहे तसें वागायला ?

**विठ्ठलः**—तूं तशी शहाणी आहेसग. ( जवळ जातो. ती झिडकारते ) अग तसें नव्हे ग, मला आपली शंका आली म्हणून विचारलें बरें.

**रखमाः**—अगदीं मुळ्ळीं तशी शंका ठेवूं नका मनांत! म्हटलें म्हणावयाचें होतें ना गडे आपण काय कवित्व केलें आहे तें;

**विठ्ठलः**—अरे हो, पण काय करावें बुवा, झाला लेंकाचा पुन्हां घोंटाळा!

**रखमाः**—काय, काय झालें काय इतक्यांतल्या इतक्यांत ?

**विठ्ठलः**—अग पहिला शोध खालीं बसला, तर दुसरी शंका उभी राहिली!

**रखमाः**—काय शंका आली आपणाला ?

**विठ्ठलः**—हें पहा, आपल्यांत नवरावायकोनीं परस्परांचीं राजरोस नांवें घेऊन बोलण्याचा अथवा हांक मारण्याचा परिपाठ नाहीं, पण मी सुधारणेच्या नटव्या दृष्टीनें माझ्या कवित्वांत आपल्या उभयतांच्या नांवाचा जे आहेत्ते सारखा ठांसून उपयोग करणार आहें; पण न जाणो तुला तें बेटें आवडलें नाहीं तर उगाच पुन्हां नसती कटकट सुरू व्हावयाची! बोल; तुला पसंत आहे कीं नाहीं ?

**रखमाः**—मला कांहीं हें बिलकुल पसंत नाहीं; आपल्या वाडवडिलांनीं पाडून ठेविलेल्या मर्यादशील चालीरीतीच मला अधिक पसंत व माननीय वाटतात!

**विठ्ठलः**—अग हा सुधारणेचा काळ आहे, हें तूं अगदींच कसें विसरतेस ? आम्हालाही थोडासा हातभार लाविलाच पाहिजे ह्या काळांतील सुधारणांना!

**रखमाः**—पण त्याबरोबरच आम्हालाहि आमचा पायभार लावून सुधारणेचे फाजील चोजले दाबून टाकले पाहिजेत बरें का जेथल्या तेथेंच.

**विठ्ठलः**—बस्स तें कांहीं नाहीं; माझी ही चालरीत तुला पसंत असेल तरच मी माझें कवित्व बाहेर काढणार! बोल तुला पसंत आहे कीं नाहीं ?

**रखमाः**—आपण जें जें म्हणाल आणि कराल तें तें सर्व मला अगदीं—अगदीं पसंत आहे.

**विठ्ठलः**—मग ऐक आतां माझें कवित्व; ( हातवारे करीत ) जे आहेत्ते कालाचें ठायीं सूत शौनकाप्रत कथन करते झाले—

**रखमाः**—अहो, हे सूत शौनक आपल्या फार पूर्वीच्या काळांत होऊन गेले आहेत हो!

**विठ्ठलः**—असूंदे; असूंदे; या युगांत मीं खेंचून आणलें आहे त्यांना ! तुला ऐकायचें आहे कीं नाहीं माझें कवित्व ? बोल; तोंडाला खीळ घालून उघड्या कानानें ऐकावयाचें असेल तरच म्हणतों; बोल; आहे का तुला कबूल ?

**रखमाः**—आहे; चालूं द्या !

**विठ्ठलः**—( खांकरून हातवारे करीत ) ऐक तर; जे आहेत्ते कालाचे ठायीं सूत शौनकाप्रत धर्मारण्यांत जी कथा कथन करते झाले, तीच कथा जे आहेत्ते आतां या कलि-युगाचे ठायीं श्रवणमननयोग्य असल्यानें निरूपणरुपानें–जे आहेत्ते ओंवीबद्ध कवितारूपानें–कथन करण्यांत येत आहे; ती अशी कीं, जे आहेत्ते कालाचे ठायीं:—

**एक होती रखमाबाई ॥ ती नवऱ्याला कच्चा खाई ॥**
**तिच्या पडतां पडतां पायीं ॥ विठ्ठलशास्त्री कष्टला ॥**

( रखमाबाई तोंड गोरेमोरें करून दूर जाते तिच्याजवळ जाऊन ) कांग, जवळ कां उभी राहात नाहींस माझ्या, मी सांगितल्याप्रमाणें ? असें तोंड गोरेंमोरें करायला काय झालें आहेग उगीचच्या उगीच. ये जवळ माझी कशी गुणाची सोनकुली ती !

**रखमाः**—येत नाहीं जा !

**विठ्ठलः**—अग वागवा; येत नाहीं म्हणजे ? माझें सगळें कवित्व ऐकलें पाहिजे आतां तुला; ( जवळ आणून उभी करून ) अग पुढें तर ऐक !

**रोज भांडे रखमाबाई ॥ आणि नवऱ्याशीं डबघाई ॥**
**विठ्ठल शास्त्री म्हणे आई आई ॥ सोडीव हिच्या त्रासांतुनी ॥**

( रखमाबाई विठ्ठलशास्त्र्याच्या तोंडावरून हात ओंवाळते, व तोंडानें "अॅह्यह्यह्य ! खरें आहे अगदीं खरें आहे" असें म्हणते. तिच्या बोलण्याकडे लक्ष न देतां )

**तरी परमेश्वरा दया येइना ॥ विठ्ठल शास्त्र्याचा त्रास चुकेना ॥**
**रखमाबाईस मृत्यू येईना ॥ जिवंत डाकीण भासतसे ॥**

**रखमाः**—( रागानें ) ऐकलें, ऐकलें; पुरे आतां; ( वेडावीत व दूर जात ) पुरे; पुरे–वरें; चाळण धरावी लागेल खालीं—

**विठ्ठलः**—( तिच्या जवळ जात ) पाहिलेंस तुला समजत नाहीं म्हणतों तें हेंच; अग ह्याला विरोधीभक्ति म्हणतात बरें कां विरोधीभक्ति !

**रखमाः**—हाच लाभ मिळवायचा ना अशा विरोधी भक्तीपासून ?

**विठ्ठलः**—पाहिलेंस, पुन्हा चूक केलीस ! अग, एखाद्या अप्रसिद्ध व फाटक्या व्यक्तीला जगापुढें आणून त्याचें फाजील स्तोम माजवायचें असलें म्हणजे याच शिष्टसंमत मार्गाचें अवलंबन करावें लागतें बरें कां ? अग अशा विरोधीभक्तीनें कां होईना, आपले फाजील देव्हारे माजविले जावे म्हणून पुष्कळांची सारखी धडपड चाललेली असते धडपड !

**रखमाः**—आपल्याला गरिबाला हवे आहेत कशाला हे असले अनिवार ढंग ! इतकें सव्यापसव्य करायला सांगितलें आहे कुणी आपणाला ? माझें हें असले फाजील स्तोमही माजवूं नका, आणि माझ्यावर ही असली विरोधी भक्तिहि करूं नका !

**विठ्ठलः**—बरें बुवा राहिलें; चूक झाली ! तुझ्यावर आतां सरळ प्रेम करतों मग तर झालें ना ? ( जवळ जातो. )

**रखमाः**—हं दुरून दुरून; तेथूनच बोला; तथेंच बरें शोभतां आपण—

**विठ्ठलः**—अग पण तूं नाहींना तेथें शोभत ! ( तिला जवळ आणून तिच्या भांगाचे केंस सारखें करतो. ) नाकीं नव आलें माझ्या, तुझी समजूत पाडतां-पाडतां ! तुला आतांशा दर पाळीला मखर लागूं लागलें काग ?

**रखमाः**—( त्याला झिडकारून ) इश्श, जळलें मेलें आपलें—

( इतक्यांत सुंदरी “ सासत्री बोवा; सास्तूरी बावा ” म्हणून ओरडते व पुढें येते. )

**सुंदरीः**—सासत्री बावा, रावसाव पेसवाम्नी गून पडाया व्होव म्हूनशनी अनसटाणा पार्यां दादासाव तुमाम्नी बोलावत्याती है; चलाकी बिगीबिगी.

**विठ्ठलः**—शिंची जेव्हां तेव्हां अशाच वेळीं येते इथें मरायला ! ( उघड ) बरें बरें; येतों जा; निघ येथून !

**सुंदरीः**—( स्वगत ) आग झालीया आग जनू देहाची ! ( त्याच्याकडे पाहून ) अर माझ्या बाप्पा, अक्शी ताल सोडलाय न काय भटान; मरतुया जनु अस्तुरी पार्यां; ( उघड ) चालान बिगी बिगी सासत्री बावा !

**विठ्ठलः**—अग तुला येथून नीघ म्हणून सांगितलें असून तूं अजून इथेंच उभी आहेस ! जातेस का नाहीं, का घालूं दोन लाता कमरेंत !

**सुंदरीः**—माझ्या गरिबावर कशा पायीं रागावतां वरें सासत्रीबाबा; ( रख-वाईस ) काबो रकमाबाय, तुमास्नी कशापाय इक्ता घुस्सा चढला है हो; अक्शी मारक्या म्हसराबानीच जनू पातान काय सासत्रींबाबाकड !

**विठ्ठलः**—काय फाजील आहे हो ही चटक भवानी; ( तिच्याकडे पाहून ) तुला काय करायचें आहेग आमच्या घरांतील उठाठेवी करून ? निघतेस कीं नाहीं ? का घालूं दोन लाथा खरोखरच कमरेंत !

**सुंदरीः**—पन काबो सासत्रीबाबा, बायकोच्या लाता ग्वाड का पुरसाच्या हो !

**विठ्ठलः**—( खेंकसत ) तुला खेंटराच्या पुजेशिवाय कसचें चांगलें वाटणार ? निघ येथून; खबरदार पुन्हा आलीस तर; अग चामुंडे नीघ; नीघ; निघ येथून ! ( तिला घालवितो. )

**रखमाः**—पुरे झाली मेली आतां ही गम्मत; काय ? रावसाहेब पेशवे खरो-खरीच का इतके आजारी आहेत ? हर हर ! कसें हो होणार पुढें ?

**विठ्ठलः**—अग तुला काय सांगूं ? या गंडांतरांतून रावसाहेब पेशवे निभा-वतील तरच भाग्य वरें ! लाडके चल; आपण ही आतां श्रीमंतांनां आराम पडावा म्हणून त्या दयाघन परमेश्वराचीं अनन्यभावानें करुणा भाकूं; पण—पण त्यापूर्वीं एक वारिकसा, मु—( ती सुरकते, पडदा पडतो )

# प्रवेश ] अंक चौथा [ तिसरा.

( नाना व सखारामबापू बसलेले आहेत असा पडदा उघडतो. )

**नाना:**—बापू, आपण कांहीं ही म्हणा, पण इतराच्यानें हें प्रकरण कधीं सुद्धां इतक्या समाधानकारक रीतीनें निभावलें नसतें हें खास !

**बापू:**—नाना, मी काय तो निमित्तमात्र कारण आहें, हा समेट घडवून आणण्याला ! खरें म्हटलें म्हणजे रावसाहेब पेशव्यांचा खरा प्रयत्न व त्यांची पुण्याई थोर, म्हणूनच दादासाहेब शुद्धीवर आले !

**नाना०:**—बापू , काय असेल तें असो, अलीकडे मला कांहीं सुद्धां सुचत नाहींसेंच झालेलें आहे; कोणतेंहि व कसेंहि महत्त्वाचें काम हातीं घ्या, मुळीं लक्षच लागत नाहीं त्याच्याकडे !

**बापू:**—नाना, माझीसुद्धां तीच स्थिति झाली आहे; ज्यांच्या जिवावर उड्या मारावयाच्या तेच जर आसन्नमृत्यूच्या स्थितींत पडलेले आहेत तर आपणाला तरी कसें बरें चांगलें वाटणार ?

**नाना:**—पण बापू , पुढें कसें होणार ? रावसाहेब पेशवे ह्या दुखण्यांतून सुरक्षित बाहेर पडावेत अशी आपली सर्वांची इच्छा आहे; पण हल्लींच्या एकंदर लक्षणांवरून तुम्ही कांहींहि म्हणा, मला तर कांहीं हें चिन्ह ठीक दिसत नाहीं ! म्हणून म्हणतों बापू , पुढें कसें हो होणार ?

**बापू:**—नाना, तुमच्या किंवा माझ्या काळजी करण्याचा काय उपयोग होणार ? प्रसंग येईल तसा शक्य तो प्रयत्न करणें, व मार्ग काढणें, एवढेंच काय तें आपणाला अशा स्थितींत करतां येण्यासारखें आहे. तथापि एवढी गोष्ट मात्र सत्य आहे कीं दादासाहेबांनां झालेला पश्चात्ताप खरी वेळ निघून गेल्यावरच झालेला आहे !

**नाना:**—पण मला नाहीं वाटत दादासाहेबांनां खरा टिकाऊ पश्चात्ताप झाला असेल असें ! त्यांचें हें क्षणभंगुर वैराग्य असावें असें माझें मत आहे; बाईसाहेबांनीं

कानाला चाप लावून ते लांब केले कीं, लागतील बुवासाहेब चमकून पुन्हां लागलेच्च सैरावैरा उधळायला आणि दुगाण्या झाडायला !

**बापूः**—दादासाहेब पुन्हां उधळून दुगाण्या झाडण्याचा प्रयत्न करतील तर तेच त्यांच्या कर्माचीं फळें भोगतील ! नाना, दादासाहेबांच्या ह्या चाळ्यामुळें धाकट्या रावसाहेबांच्या नशिबीं जिवंतपणीं तर सुख नाहींच, पण मरतांना मृत्युहि सुखाचा नाहीं !

**नानाः**—बापू, जन्मापासूनच रावसाहेब पेशवे अभागी आहेत ! आतां कांहीं सुखाचे दिवस दिसतील असें वाटत होतें तोंच आमचें भवितव्य पुढें उभें राहिलें ! आणि रावसाहेब ह्या दुखण्यांतून हातीं कसे लागतात हीच जबरदस्त काळजी उत्पन्न झाली ! अरेरे, पहिली तिशी हो बापू पहिली तिशी ! श्रीमंतांनां एखादा जरी मुलगा असता तरी सुद्धां दुःखांत सुख मानून घेण्याला जागा राहिली असती हो बापू ! ( डोळे पुसतात. )

**बापूः**—नाना, असें अश्रु ढाळीत बसण्याची ही वेळ नव्हे ! हिंमत काय सोडतां ? येऊं नये तो प्रसंग आला, तर त्याला तुमच्यासारख्या कर्त्या पुरुषानें हिंमतीनें तोंड नको का द्यायला ?

**नानाः**—बापू, मी तुम्हाला कधींचें कांहीं विचारीन विचारीन, म्हणून म्हणतों आहें, पण आपणाला कदाचित् तें बरें वाटणार नाहीं, अशी शंका येऊन मन पुन्हां माघार घेतें; आपण रागावणार नाहीं असें जर मला खऱ्या प्रेमभावानें सांगत असाल, तरच मी आपणाशीं स्पष्टपणें बोलून, कांहीं नाजुक बाबतीचा शहानिशा करून घेणार आहें.

**बापूः**—नाना, दुसऱ्यांच्या राग-लोभाकडे लक्ष देत बसण्याची का ही वेळ आहे ? मोठ्या दुःखाची गोष्ट आहे कीं तुम्हाला माझ्या स्वभावाची अजूनही नीटशी पारख होऊं नये अथवा माझ्या संबंधानें आपण इतकें साशंक रहावें ! नाना, काय विचारणार अहांत आपण मला ?

**नानाः**—एवढेंच कीं, आपण कोणाच्या पक्षाचे अहांत ?

**बापूः**—पण नाना, अशी शंकाच मुळीं तुमच्या मनांत आली ती कां म्हणून ?

**नानाः**—कां म्हणून म्हणजे ? रावसाहेब माधवराव पेशव्यांच्या मागें "श्रीमंत नारायणरावसाहेब, पेशवे व्हावे, दादासाहेब, पेशवे व्हावे;" या प्रश्नाचा निकाल आपल्या सारख्या मुत्सद्यांच्या मतावर व मागणीवरच बहुतांशीं अवलंबून आहे म्हणून !

**बापूः**—नाना, पेशवाईच्या ह्या पक्षभेदाच्या भानगडींत भाग घेण्याचें मी पूर्वींपासूनच टाळीत आलों, ही गोष्ट तुम्हास माहीत आहेच ! तथापि तुमच्या समाधानाकरितां आतांच स्पष्ट सांगतों कीं मी सत्पक्ष केव्हांहि सोडणार नाहीं.

**नानाः**—बापू, कृपा करून याहून अधिक सरळ बोलाल काय ?

**बापूः**—नाना, मेहेरबानी करून आपणच मला आधीं सांगा कीं दादा साहेबांकडे माझा ओढा असला तरीही मी न्यायान्यायाची व नीतिअनीतीची क्षिति न बाळगतां त्यांच्याच पक्षाला नेहमी चिकटून राहीन, असें आपणाला वाटलें तरी कसें ?

**नानाः**—कोणाची बुद्धि केव्हां कशी फिरेल याचा काय नियम सांगता येईल बापू ? फार लांब जायला नको ! सध्यांचा चालू विषय—ह्मणजे दादासाहेबांचें प्रत्यक्ष उदाहरण आहेच कीं आपल्यासमोर !

**बापूः**—ठीक आहे; नाना, तुमच्या इच्छेप्रमाणें कां होईना, मी तुम्हास अगदीं सरळ व स्पष्ट रीतीनें असें अभिवचन देतों कीं, "मी रावसाहेब पेशव्याचा सत्पक्ष केव्हाहि सोडणार नाहीं; आणि दादासाहेब जर अन्यायानें पेशवाई आपल्या घरांत व वंशपरंपरेनें घरांत उतरविण्याची अन्यायी हांव धरतील तर त्यांच्या त्या संबंधींच्या खटपटींत मी भाग तर घेणार नाहींच, पण तसे त्यांचे प्रत्येक प्रयत्न ह्याणून पाडण्याकरितां माझ्याच्यानें होण्यासारखी असेल ती योग्य धडपडहि केल्यावांचून राहणार नाहीं." नाना, फिटला का तुमचा संशय आतां, मी कोणत्या पक्षाचा आहे त्या बद्दलचा !

**नानाः**—फिटला बरें बापू फिटला ! पण मला वाटतें, बापू, या पुढें प्रसंग पडल्यास आपण कसें वागावें या बद्दल ही आतांच वाटाघाट करून ठेवावी.

**बापूः**—मला नाहीं वाटत आतांच वाटाघाट करून ठेविल्यापासून कांहीं विशेषसा फायदा होईल असें !.

**नानाः**—कारण ?

**बापूः**—कारण राजकारणाच्या तांडवांत केव्हां, कोठें, आणि कसा खडानाच घालावा लागेल—केव्हां कसे प्रसंग उद्भवतील आणि कोठें कसे तातडीचे आवश्यक इलाज योजावे लागतील—हें आजच खात्रीनें कसें ठरवितां येईल हो नाना ?

**नानाः**—बापू, अशा बाबतींत पहिल्यानें वाईट मनांत आणून त्या संबंधींची योजना रेखाटून ठेवावयास नको काय ? म्हणून म्हणतों वाघाच्या शिकारीची तयारी असली म्हणजे बरी !

**बापूः**—येथेंच चुकतां आहांत तुम्ही नाना ! लक्षांत ठेवा कीं, आम्हाला कोणाच्या शिकारीकरितां तयारी करावयाची नसून आमची शिकार कोणी करूं नये म्हणून तजवीज ठेवावयाची आहे.

**नानाः**—पण निदानींची एवढी गोष्ट तरी निर्विवाद आहे कीं, दादासाहेब पुढें मागें पेशवाईचीं सूत्रें आपल्या हातीं आणण्याची हांव बाळगतील !

**बापूः**—पण हांव बाळगल्यानें तीं तशीं हातीं येणार नाहींत !

**नानाः**—पण तीं हातीं यावीं म्हणून ते तसा प्रयत्न करतील !

**बापूः**—पण तशा प्रयत्नानें तेच उलट तोंडघशीं पडतील !

**नानाः**—पण कदाचित् नाहींहि पडणार !

**बापूः**—कां नाहीं पडणार ? लोभमूलक अन्यायी अपहाराच्या पापी प्रयत्नांनां परमेश्वर यश देईल असें नाना, तुम्हाला तरी वाटलें कसें, याचेंच मला राहून-राहून आश्चर्य वाटत आहे !

**नानाः**—आश्चर्य वाटणें स्वाभाविक असलें तरी सुद्धां अशीं उदाहरणें घडतांना दिसतात ना आपणाला ?

**बापूः**—दिसलीं तरी त्याचे परिणाम टिकाऊ नसतात ! नाना, कशाची वाटाघाट करायची आहे असें म्हणत होतां आपण ?

**नानाः**—मला वाटतें, आपल्या पक्षालाच प्रसंगीं कोण कोण चिकटून राहतील, आणि दादासाहेबांच्या पक्षाला कोण जाऊन मिळतील, याबद्दल आपण वाटाघाट करून ठेवावी, म्हणजे वेळ पडल्यास उपयोग होईल.

**बापूः**—ठीक आहे ! हें पहा नाना, दादासाहेब आणि मामा पेठे यांच्यामधील सततच्या कटकटी टाळून जमल्यास दादासाहेबांना संतुष्ट करावें म्हणून

जरी मामांना मागें ठेवून रावसाहेबांनीं आपणास पुढें केलें तरी त्र्यंबकराव मामांच्या अनुमतीनेंच श्रीमंतांनीं ही गोष्ट केलेली असल्यानें त्यांच्या संबंधीं तर प्रश्नच राहात नाहीं; खरें कीं नाहीं ?

**नाना**:--हें तर खरेंच ! पण त्यांच्या नांवाजण्यासारख्या कारभार चालविण्याच्या हतोटीमुळें दादासाहेबांच्या अडवणुकीच्या इच्छेचा पूर्ण हिरमोड झाल्यानें तर त्यांचा मामांवर विशेषच घुस्सा झालेला आहे !

**बापू**:--कोण भीक घालतो आहे हो दादासाहेबांच्या असल्या घुस्शाला ! बरें, रामभाऊ कानडे आणि हरिपंत फडके ?

**नाना**:--ते निःसंशय आपलेच आहेत !

**बापू**:--शिंदे, होळकर ?

**नाना**:--ते तर पहिल्या पासूनच आपले आहेत !

**बापू**:--रास्ते पटवर्धन ?

**नाना**:--ते आपल्या पक्षाचे आहेत.

**बापू**:--पागे, पुरंदरे ?

**नाना**:--ते श्रीमंत रावसाहेबांविरुद्ध कधींही जावयाचे नाहींत !

**बापू**:--गायकवाड ?

**नाना**:--त्यांच्या विषयीं शंका आहे !

**बापू**:--भोंसले ?

**नाना**:--त्यांचें सर्वच अनिश्चित आहे !

**बापू**:--हैदर ?

**नाना**:--दादासाहेबांस मदत करणार नाहीं !

**बापू**:--निझाम ?

**नाना**:--तो आमचा दोस्त आहे !

**बापू**:--मुंबईकर ?

**नाना**:--त्यांच्याविषयीं आज कांहींच सांगतां येत नाहीं !

**बापू**:--ठीक आहे नाना; गायकवाड, व भोंसले, हे मराठे सरदार आपल्या पक्षालाच नेहमीं चिकटून राहतील--निदान प्रसंगीं दादासाहेबांना मदत न करतां

तटस्थ राहतील–अशाबद्दलची मी तजवीज करतों; मुंबईकर दादासाहेबांस मदत न करतील अशा बद्दलचा बंदोबस्त आपण कलकत्तेकर लाटला लिहून करूं, शिवाय त्यावेळीं तुम्हांकडून प्रत्येक दरबाराला स्वतंत्र खलिते आपले जिकडे तिकडे रवाना झालेच पाहिजे आहेत बरें का नाना ?

**नानाः**—पण अजूनहि मला वाटतें कीं ही सर्व तजवीज अपुरी तर नाहींना ठरणार बापू ?

**बापूः**—पुन्हां सांगतों, नाना, आपण ज्या ह्या तजविजी करणार त्या दादासाहेबांशीं मुद्दाम विरोध करावा, अथवा मुद्दाम त्यांची आगळीक करावी, अशा उद्देशानें करणार नसून त्यांनीं आपण होऊन आमच्याशीं तसें वर्तन केल्यास आम्हास आमचें संरक्षण करतां यावें या उपयोगाच्या दृष्टीनेंच करणार आहोंत, हें विसरूं नका ! इतरांच्या कायदेशीर हक्कांत ढवळाढवळ करण्याची आमची बिलकुल इच्छा नाहीं ! पण त्याबरोबरच आमच्या न्यायी हक्कांत कोणी उगाच ढवळाढवळ करूं म्हणेल तर ती ही आम्ही कधीं सुद्धां सहन करणार नाहीं ! " कांट्यानें कांटा काढणें, " हा कदाचित न्यायाचा मार्ग ठरत असेल, पण कांट्याशिवाय कांटा काढणें हा नेहमींच शहाणपणाचा मार्ग म्हणून ठरलेला आहे; समजलात का नाना !

**नानाः**—बरें मग ?

**बापूः**—म्हणून दादासाहेब जोंपर्यंत सरळ वागतील, तोंपर्यंत आपणालाहि त्यांच्याशीं सरळच वागणें भाग आहे ! श्रीमंत नारायणरावसाहेब पेशव्यांचा योग्य रीतीनें प्रतिपाळ करून राज्यकारभार चालविण्याचा हक्क, नाना, तुम्हाला आम्हाला नसून तो दादासाहेबांनाच आहे हें तुम्ही कसें विसरतां ?

**नानाः**—नाहीं विसरत ! पण दादासाहेब तसें समजून वागतील अशा बद्दल काय भरंवसा ?

**बापूः**—सध्यां तरी निदान अशी नुसती शंका घेणें सुद्धां अप्रशस्त होईल ! तथापि तसा प्रसंग आलाच तर योजून ठेवलेल्या आहेतच आपण शक्य त्या तजविजी; रावसाहेब हीं कांहीं बोललेच असतील या बाबतींत आपणाजवळ ? नाना, कशी आहे हो आज श्रीमंतांची दिनचर्या !

**नानाः**—श्रीमंताच्या इच्छेप्रमाणें त्यांनां येथें श्री गजानन महाराजांचें सन्निध आणून ठेविल्यापासून कांहींहि आराम न होतां उलट प्रकृती जास्तच बेताल होत

गेली आणि हल्लीं तर अशी स्थिति आहे कीं, एकदोन दिवसहि पार पडणें कठीण! ( डोळे पुसतात. )

**बापूः**—हरहर! काय हा दुर्धर प्रसंग! हा सूर्य इतक्या लवकर अस्तास जावा ना? नष्टचर्य ओढवलें दुसरें काय? नाना, चलतांना श्रीमंतांचें दर्शन घ्यायला?

**नानाः**—चला, बापू चला! पण म्हणतों दिलेलें वचन लक्षांत राहील ना?

**बापूः**—त्याविषयीं तुम्ही अगदीं–अगदीं बेफिकीर असा. दादासाहेबांनां अन्यायानें पुण्याची पेशवाई मिळवून देण्यांत मी केव्हांहि मदतगार होणार नाहीं; उलट न मिळावी म्हणूनच मी शक्य ती खटपट करीन! दादासाहेबांनां पेशवाई मिळावयाची नाहीं, कदाचित मिळाली तरी ती केव्हांसुद्धां कायमची पचावयाची नाहीं, आणि--

( इतक्यांत झिंजा पसरलेली आनंदीबाई प्रवेश करते. )

**आनंदीः**—( दांत चावीत ) कां–कां नाहीं आम्हाला पेशवाई मिळणार आणि मिळाली तरी टिकणार? मेल्यानों! आम्ही सारखी धडपड करूं धडपड पेशवाई मिळवायला आणि ती पचावयला! त्या मेल्या माधवाचें तर मरतांनाहि तोंड पाहण्याची माझी इच्छा नाहीं! सोडा! तुम्हीहि सोडा त्या काळतोंड्याच्या जगण्याची आशा! तो क्षयी माधव–तो मरत घातलेला माधव, यावेळेपर्यंत तर पार मरूनसुद्धां गेला असेल! नसला तर मरत असेल–आतां मरेल; अगदीं निःसंशय मरणार! आणि तो मेल्यावर पेशवाईच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या त्या एकुलत्या एक वारसदार कारट्याचा–त्या निसंतान नारायणाचा खून करून तरी निदान आम्ही पुण्याचे पेशवे खास होणार! होणार!! होणार!!!

**बापूः**—गिरफ्दार—

**नानाः**—कैद—

( पडदा पडतो. )

---

# अंक पांचवा.

( स्थळः—थेऊर येथें श्रीगजानन महाराजापुढें श्रीमंत माधवराव-
साहेब पेशवे पलंगावर पडलेले आहेत, आजूबाजूस श्री०
नारायणरावसाहेब पेशवे, नाना, सखारामबापू, व इतर
दोन तीन माणसें उभीं आहेत, आणि श्रीमंत
सौ० रमाबाईसाहेब, व पार्वतीबाईसाहेब,
चिकाच्या पडद्याच्या आंत
आहेत असा पडदा
उघडतो. )

**नाना**:—असें काय बरें करावें सरकार? हें काय बरें रावसाहेब? घ्याना कां हें औषध बापू म्हणतात त्याप्रमाणें निदान आमच्या सर्वांच्या इच्छेकरितां तरी?

**माधव**:--( बळेंच हांसल्यासारखें करून ) नाना, बापू, मी औषध घेत नाहीं म्हणूनच जर तुम्हांला इतकें वाईट वाटत असलें तर घेतों बापडा तुमच्या इच्छेकरितां; मग तर झालेंना? आणा, नाना, आणा! ( औषध देतात. )

**नाना**:—सरकार, ह्या औषधानें कांहीं बरें वाटतें का आपणाला? मला वाटतें निदान एक सप्तक तरी झालें असेल हें नवें औषध सुरू करून!

**माधव**:—नाना, आतां कशाचें औषध आणि कशाचा आराम घेऊन बसलांत? माझ्या इहलोकींच्या जीवनयात्रेचा आतां लवकरच शेवट होणार! फार झालें तर मी आतां तुमचा घटके दोन घटकेचाच काय तो सोबती आहे! म्हणून म्हणतों तुम्हांला माझ्याशीं कांहीं अखेरचे दोन शब्द बोलायचे असतील तर बोलून घ्या! तुम्हींसुद्धां बरें का बापू?

**बापू**:--असें अनिष्ट बोलूं नये सरकार! लवकरच बरे व्हाल बरं आपण या दुखण्यांतून.

**माधव**:—छे! छे! आतां ह्या दुखण्यांतून मीं कशाचा बरा होतों! बापू! ह्या तुम्हाला आतां निव्वळ भ्रम आहे बरें भ्रम! नाना, तुटली हो तुटली माझ्या

आयुष्याची दोरी साफ तुटली ! नारायणा, मी जाणार रे बाबा आतां लवकरच तुला सोडून ! दादासाहेबांच्या आज्ञेंत वाग; आनंदीकाकींची मर्जी कालत्रयींही मोडूं नकोस ! नाहीं तर पहारे बाबा, तूं आपला परिणाम ! एखाद्या गळांत अडकशील आणि आपला गळा घालविशील ! ( डोळ्यांतून पाणी काढतात. )

**नारायणः**—( गहिंवरून ) दादा, तुम्ही गेल्यावर माझें कसें हो होणार ? जगांत तुमच्या मागें माझ्यावर मायेचें पांघरूण कोण हो घालील रावसाहेब ?

**माधवः**—अरे वेड्या, दादासाहेब आणि आनंदीकाकी बरें ! ( विचार करून ) पण छे ! मला नाहीं त्यांचा बिलकुल भरंवसा वाटत ! तुझा गळा कापण्याला सुद्धां मागें पुढें पहाणार नाहींत ते राज्यलोभानें ! नारायणा, बाळा नारायणा ! तुझ्यावर मायेचें पांघरूण हे माझे नाना आणि बापू घालतील. अगदीं कध्धीं-कध्धीं सुद्धां अंतर देणार नाहींत बरें का ते तुला ? ( नानाकडे वळून ) काय हो नाना, खरें कीं नाहीं ?

**नानाः**—हें काय विचारायचें आहे सरकार ! राज्यकर्त्या पेशव्याच्या घराण्यांतील प्रत्येक हक्कदार व्यक्तीला मी आजपर्यंत नेहमींच माझ्या प्राणापलीकडे जपत आलेलों आहें, आणि प्रसंगीं प्राण खर्ची घालावे लागले तरी बेहेत्तर, पण दौलतीला आणि दौलतदाराला मी केव्हांहि दख्खल पोहोंचूं देणार नाहीं, असा माझा पूर्ण निर्धार आहे ! श्रीमंतांनीं निर्धास्थ असावें ! सरकारची मी याहून अधिक काय खातरजमा करूं ?

**माधवः**—आणि तुम्हीं हो बापू ?

**बापूः**—मी प्राणांतींहि आपलें इमान बदलणार नाहीं; सरकार, माझ्यासारखे अथवा नानासारखे दहा फडणवीस निर्माण होतील, पण आपणासारखा एकच कर्तबगार पुढारी सुद्धां निर्माण होणें अत्यंत दुरापास्त आहे—

**नानाः**—आणि म्हणूनच "दहांचा मार्गदर्शक चिरायू व्हावा," अशी प्रत्येकाची इच्छा असणें स्वाभाविक आहे !

**माधवः**—नाना, तुम्ही व बापू हे तर मुळीं या दौलतीचे आधारस्तंभ आहांत ! बापू, तुम्हीहि कांहीं बोलाहो; स्तब्ध कां बसलांत ? बोला कीं; पण पहा बरें घटके दोन घटकेनें मरणाऱ्या माणसाजवळ तोंडापुरतें इमानइतबार दाखवून

मागाहून विश्वासघातानें त्याचा गळा कापलात तर वरीक बदलौकिक होईल वरें कां तुमचा सर्व जगभर !

**बापूः**—सरकार, हा प्रसंग पाहून माझी चित्तवृत्ति इतकी चमत्कारिक झाली आहे कीं काय बोलावें आणि कसें वागावें हेंच मुळीं मला यावेळीं सुचत नाहीं ! मी काय करावें अशी श्रीमंताची इच्छा आहे?

**माधवः**—म्हणा कीं, मी नारायणाला कधींहि अंतर देणार नाहीं !

**बापूः**—मी श्रीमंत नारायणरावसाहेबांना कधींहि अंतर देणार नाहीं.

**माधवः**—वचन द्या की, मी नारायणासच पुण्याचे पेशवे होण्याला मदत करीन, आणि पेशव्याच्या व पेशवाईच्या खऱ्या हक्कदार वारसाशिवाय पेशवाईचा उपभोग घेण्याचा अन्यायी प्रयत्न करणाऱ्या इतर कोणासहि मी मदत न करतां उलट त्या व्यक्तीचे सर्व बेत मोडून पाडण्यालाच मी मनापासून अविश्रांत परिश्रम करीन !

**बापूः**—मी श्रीमंतास असें वचन देतों की, मी श्रीमंत नारायणरावसाहेबांनाच पुण्याचे पेशवे होण्याला मदत करीन, आणि पेशव्याच्या व पेशवाईच्या खऱ्या हक्कदार वारसाशिवाय पेशवाईचा उपभोग घेण्याचा अन्यायी प्रयत्न करणाऱ्या इतर कोणासही मी मदत न करतां उलट त्या व्यक्तीचे सर्व बेत मोडून पाडण्यालाच मी मनापासून अविश्रांत परिश्रम करीन !

**माधवः**—माझ्या पायावर हात ठेवून शपथ घ्या कीं, मी अखेरपर्यंत इमानानें वागत राहीन, आणि माझ्या अखेरच्या वेळीं मला दिलेलें वचन मोडून व इतरांस मदतगार होऊन हक्कदार पेशव्याचा गळा कापण्याच्या विश्वासघाताचें पातक मी कालत्रयींहि करणार नाहीं !

**बापूः**—मी श्रीमंताचे पायावर हात ठेवून अशी शपथ घेतों कीं, मी अखेरपर्यंत इमानानें वागत राहीन, आणि थाकट्या रावसाहेबांस त्यांच्या अखेरच्या वेळीं दिलेलें वचन मोडून व इतरांस मदतगार होऊन हक्कदार पेशव्याचा गळा कापण्याच्या विश्वासघाताचें पातक मी कालत्रयींहि करणार नाहीं.

**माधवः**—झालें ! आतां मला तुम्हांस अधिक कांहींहि सांगण्याचें राहिलें नाहीं ! ( नारायणाकडे वळून ) नारायणा, इकडे ये; बापू इकडे या; नाना, असे

माझ्याजवळ येऊन उभे रहा; ( नारायणाचा हात बापूच्या हातांत देऊन ) बापू, याला सांभाळा; नाना, माझा नारायण अजून लहान आहे; याचें नीट जतन करा! नारायणा, तूं कांहीं काळजी करूं नकोस! माझ्या नानाच्या व बापूच्या जिवावर अगदीं–अगदीं निर्धास्थ रहा! ( हात सोडून सर्व अदवीनें उभे राहतात. )

**नानाः**--सरकार, श्रीमंत नारायणरावासंबंधानें आपण अगदीं निर्धास्थ असा! केवढा हो दुर्धर प्रसंग ओढवला आहे सरकार हा आमच्यावर आणि आमच्या ह्या दुर्दैवी साम्राज्यावर!

**माधवः**--कांहीं हरकत नाहीं; या प्रसंगालाहि तुम्ही मोठ्या नेटानें व हिंमतीनें तोंड द्या! बापू, अजून तरी दादासाहेब शुद्धीवर आले आहेत काय?

**बापूः**--सरकार, मला तरीं निदान असें वाटतें कीं, दादासाहेबांना आपल्या दुराग्रही व निंद्य कृतीचा पूर्णपणें पश्चात्ताप झाला आहे; येणार आहेत ते लौकरच श्रीमंतांची भेट घ्यायला!

**माधवः**-या कुडींत प्राण आहे तों पर्यंत तरी ते येऊन भेटोत म्हणजे झालें! बापू, अस्थीर बुद्धीच्या मनुष्याकडून मिळणारा प्रसाद जसा भयंकर तसाच त्याला होणारा पश्चात्ताप ही क्षणीकच असतो बरें! तुम्ही कांहीं हीं म्हणा, पण मला नाहीं हो दादासाहेबांचा तीळभर सुद्धां भरंवसा वाटत! नाना!

**नानाः**—सरकार!

**माधवः**—भाऊबंदकीच्या जात्यांत भरडला जाणारा हा साम्राज्याचा अवाढव्य डोलारा अशाच डळमळित स्थितींत नाचवीत फिरण्यांत आणि त्याच्या सभोंवतीं "हायदोस"चा खडानाच घालीत रडत राहण्यांत फायदा काय? दौलतीच्या नेकजात व पिढीजाद सरदारांचें काय मत आहे या बाबतींत?

**नानाः**—सरकार, सर्वांचें मत आपल्यापक्षांकडे आहे; सर्वांचा ओढा श्रीमंत नारायणरावसाहेबाकडेस आहे, आणि सर्व सरदार दौलतीचें व दौलतदारांचें संरक्षण व्हावें म्हणून प्रसंगीं प्रत्येक प्रकारची मेहनत व मदत करण्यास तयार आहेत!

**माधवः**—नाना, बापू, झाली! माझी सर्व निरवानिरव झाली! नारायण ये; असा माझ्यासमोर येऊन उभा रहा! माझ्यासारखीं अगदीं पोर वयांतच तुझ्या हातीं ह्या अवाढव्य साम्राज्याचीं अधिकार–सूत्रें येत आहेत, हें लक्षांत ठेवून

अत्यंत सावधगिरीनें वागत जा ! रयतेच्या सुखाकरितां मी केलेल्या राज्यव्यवस्थे-तील सुधारणा वाढीस लाव ! मी ठरविलेली राज्यपद्धती, वसूलपद्धती व न्याय पद्धती कायम ठेव ! रयतेच्या कल्याणाकरिता नेहमीं झटत जा ! प्रजेच्या सुखावरच राज्याची आबादी व बळकटी अवलंबून असते हें केव्हांहि विसरूं नकोस ! दौलतीं-तील अनुभवी व एकनिष्ठ सरदाराच्या सल्ला मसलतीनेंच नेहमीं वागत जा ! नारायणा !

**नारा:**—दादा !

**माधवा:**—मुत्सद्दी व कर्तबगार, दैवशाली पण तितक्याच दुःखी व दुर्दैवी, अशा कैलासवासी श्रीमंत पंतप्रधान बाळाजी बाजीराव पेशव्याचा मी मुलगा आहें, ही गोष्ट तूं नेहमीं लक्षांत ठेवून वाग, म्हणजे तूंहि त्याच्या प्रमाणेंच–आपल्या पूज्य वडिलाप्रमाणें–आमच्या वैभवशाली नानासाहेबांप्रमाणें-कीर्तीमान होशील; आ—आ—( घावरतो ) आई आई, माझे प्राण कासावीस होऊं लागले हो नाना; दादासाहेब का हो अजून आले नाहींत बापू ?

**बापू:**—( पाहून ) सरकार, हें पहा दादासाहेब आलेच ! ( दादासाहेब येतात. )

**माधवः**—( हुंवरडा फोडीत ) दादा अहो दादा ! चाललों हो चाललों बरें मी या जगांतून ! आई, आई ! ( डोळे मिटतात. )

**दादा०**--अरे, अरे, बाळा माधवा ! कायरे ही तुझी दशा ! डोळे उघड रे बाळा डोळे उघड ! मी हा येथें आहें बरें तुझ्याजवळ ! त्या नारायणाकडे तरी पहारे बाबा एकदां ! बघ बघ तो कसा केंविलवाण्यासारखा पाहतो आहे रे तुझ्याकडे !

**माधवः**—मी त्याच्याकडे. आतां दयार्द्रदृष्टीनें पाहिलें किंवा न पाहिलें तरीहि तें सारखेंच; दादासाहेब आपणच पहा बरें आतां त्याच्याकडेस दयार्द्र दृष्टीनें ! त्याला सांभाळा, आपलें लेंकरूं आहे असें समजून त्याची जतणूक करा ! दादासाहेब, आपल्या पाया पडतों; आमचे कांहीं अपराध झाले असल्यास पोटांत घाला ! आम्हाला त्याबद्दल क्षमा करा ! गतगोष्टी मनांत आणूं नका ! आनंदीकाकींची ही मी माफी मागतों असें त्यांनां सांगून नारायणाचा प्रतिपाळ करण्याविषयीं माझ्या तर्फे त्यांनां प्रार्थना करा ! नारायणा, असा दादासाहेबांजवळ उभा रहा; त्याच्या पायावर डोकें ठेव, आणि माझा प्रतिपाळ करा म्हणून त्यांची करुणा भाक ! हं: आटोप लवकर.

**नारायणः**—दादासाहेब, हें पहा मी आपल्या चरणावर माझें मस्तक ठेवितों; ( पाया पडतो व उठत ) कराल ना आपण माझा मुलासारखा प्रतिपाळ ?

**दादा०**:—करीन बरें बाळा करीन; अगदीं-अगदीं स्वतःच्या मुलाप्रमाणें प्रतिपाळ करीन.

**माधवः**—दादासाहेब, आतांचे हे आपले शब्द आपण नीट ध्यानांत ठेवून वागालना ?

**दादा०**:—वागेन बरें बाळा वागेन !

**माधवः**—ठेवूं ना आपल्या या शब्दावर पूर्ण भरंवसा ?

**दादा०**–ठेव बरें बाळा ठेव !

**माधवः**—नारायणा इकडे ये; दादासाहेब इकडे या; हा पहा मी नारायणाचा हात आपल्या हातांत देत आहे ( दादासाहेबाच्या हातांत नारायणाचा हात देतो ) शंका वाटते म्हणून आपलें पुन्हां विचारतों; या नारायणाला अंतर नाहींना देणार ?

**दादा०**—नाहीं बरें बाळा नाहीं !

**माधवः**—नाना, दौलतीवरील कर्ज ?

**नानाः**—त्याचा हवाला नाइकांनी घेतला आहे सरकार !

**माधवः**—नाना, दौलतीचें संरक्षण करण्याचें कर्ज ?

**नानाः**—त्याचा हवाला मी आणि बापूंनीं घेतला आहे सरकार !

**माधवः**—नाना, दौलतदाराचा सांभाळ करण्याचें कर्ज ?

**नानाः**—त्याची हमी दादासाहेबांनीं घेतली, असें ते म्हणत आहेत, सरकार!

**माधवः**—तुम्हीं कां नाहीं म्हणत ? नका म्हणूं बापडे ! आई, आई, माझा जीव पुन्हां कासावीस होऊं लागला हो ! नाना, माझ्याजवळ या; बापू, इकडे या; नारायणा असा जवळ ये; दादासाहेब इकडे या-( सर्वजण जवळ येऊन उभे राहतात ) हे श्री गजानन महाराजा, मी तुला आतां शेंवटचा नमस्कार करतों; नाना, मला माफ करा; बापू, कधीं काळीं एखादा कमी अधिक शब्द चुकून माझ्या तोंडून गेला असेल तर मला त्याची क्षमा करा ! दादासाहेब, मी तुमचा अपराधी असल्यास माझे अपराध पोटांत घाला ! ( कण्हूं लागतात ) आई, आई–

**नानाः**—सरकार. बोलण्याचे श्रम कशाला घेतां ?

**बापूः**—सरकार, जरा स्वस्थ पडून रहाना बरें !

**माधवः**—आहे, आतां स्वस्थच पडावयाचें आहे लवकरच ! दादासाहेब, नाना, बापू, तुम्ही सर्व एकदिलानें व एक विचारानें वागा ! नारायणाला पेशवाईवर कायम करून जसा कांहीं विपरीत प्रकार घडलाच नाहीं, अशा सुरळीत रीतीनें राज्यकारभार चालवा ! तो तरुण असल्यानें कुमार्गास न लागतां त्याचे हातून नेहमीं लोक-कल्याण होत जाईल अशा विषयीं खबरदारी घ्या ! माझ्या प्रजेस केव्हाही दुखवूं नका ! नारायणा, दादासाहेबांच्याच साह्यानें राज्यकारभार चालवीत जा ! ये असा इकडे ये ! कैलासवासी श्रीमंत रावसाहेब ! पेशव्यापासून वंश-परंपरेनें ही माझ्याकडेस आलेली आंगठी-आपल्या घराण्यांतील पेशवाईचा व पेशव्यांचा खरा हक्कदार वारस ओळखण्याची ही खूण-मी तुझ्या बोटांत घालतों; ( आंगठी बोटांत घालतो. ) सांभाळ बरें का चांगली ! नीट जप बरें का हिला ! आई, आई, मूर्छा आली हो मूर्छा आली !

**नानाः**—सरकार, सावध व्हा ! सावध व्हा !

**माधवः**—(वरळतो) बरें, बरें, मरणार तर मरणार ! मग काय तुझें म्हणणें ? काय म्हणतोस ? मला सुखानें मरण येणार नाहीं आणि मी मेलों तरी आमचा हा गृहकलह पुढें कोणत्या थराला जाणार-दादासाहेब आणि आनंदीकाकी यांनीं उभारलेल्या हट्टी दुराग्रहाच्या पापी मंदिरावर ते आतां भाऊबंदकीच्या रक्तानें कोणाच्या हत्येचा कळस बसविणार, ह्या विवंचनेनें माझा आत्मा पुण्यांतल्या पुण्यांतच-नव्हे आमच्या खुद्द शनिवारच्या वाड्यांतल्या-वाड्यांतच घुटमळत राहणार ! बरें बरें; घुटमळूंदे घुटमळला तर ! तुला काय करायचें आहे ? अरे जा; तूं काय पाहून घेणार ?

**नानाः**—सरकार, सावध व्हा; सावध व्हा.

**दादा०**—( अंगाला हात लावून ) बाळा माधवा ! सावध हो फिरे लवकर !

**माधवः**—( वरळतो ) तुम्हीच सावध व्हा लवकर; लाज नाहीं वाटत उलट मलाच सावध व्हायला सांगतां त्याची ? माझा नारायण कोठें आहे ? माझी ती-ती कोठें आहे ? अरेरे ! अग रडूं नकोस ग अशी एकसारखी ! डोळे पूस ! तुझ्याशीं लग्न करून मी तुझा गळा कापला ! नको-नको-नको येऊं ! तूं कशाला येतेस माझ्याबरोबर रहा ! येथेंच रहा आणि माझ्या नारायणाचा प्रतिपाळ कर ! काय ?

येथें नाहीं राहणार म्हणतेस ? बरें तर, नको राहूंस ! तुझ्या इच्छेस येईल त्याप्रमाणें कर; कांरे बाबा, तूं कांरे नारायणा असा एकसारखा रडतोस ? असें काय बरें करावें ? करतील बरें दादासाहेब तुझा प्रतिपाळ.

**दादा०**—करीन बरें बाळा करीन मी तुझा प्रतिपाळ. ( नारायणास कवटाळतो व सोडतो )

**माधवः**—काय, काय! आलास का बाबा पुन्हां तूं ! काय म्हणतोस ? काय ? दादासाहेबांचें हें कवटाळणें निव्वळ कांगावी-कळवळ्याचें आहे; बरें असूंदे आहे तर! पण माझे नाना आणि बापू तर नाहींना गेले कोठें ? तेच सांभाळतील माझ्या नारायणाला; नाना !

**नानाः**—मी श्रीमंत नारायणरावसाहेबांचा प्रतिपाळ करीन !

**माधवः**—बापू !

**बापूः**—मी श्रीमंत नारायणरावसाहेबांनां अंतर देणार नाहीं !

**माधवः**—दादासाहेब !

**दादा०**—मी नारायणास पुण्याचा पेशवा करून त्याचें स्वतःच्या मुलाप्रमाणें संरक्षण करीन.

**माधवः**—शपथ घ्या !

**दादा०**—शपथ घेतों !

**माधवः**—शपथ खोटी !

**दादा०**—शपथ खरी !

**माधवः**—( वरळतो ) आलास पुन्हां ! काय म्हणतोस ! नानांनीं कितीहि काळजी घेतली आणि बापूंनीं कितीहि करामत केली तरी त्याचा बेळेला काडी-इतका सुद्धां उपयोग होणार नाहीं; बरें बरें, न होऊंदे नाहीं झाला तर ! पण कां नाहीं होणार ? होईलच ! पुन्हांहि नाहीं म्हणतोस ! बरें बाबा, तुझेंच म्हणणें खरें मगतर झालेंना ? मग होणार तरी पुढें काय, तें तर सांगशील कीं नाहीं ? काय, काय, पुन्हां सांग पाहूं ? काय ? नारायणाच्या जिवाला घात होईल, आणि तोहि दादासाहेब व आनंदीकाकी या दुकलीच्या दुष्टाव्यामुळें ! छे बुवा; मला नाहीं हें तुझें म्हणणें खरें वाटत; कितीहि झालें तरी दादासाहेब व आनंदी काकी आमच्याच आहेत बरेंका अखेरीस; नाहींच होणार कधींहि असें अमंगल कृत्य त्यांच्या हातून !

**दादा०**—नाहींच होणार वरें बावा, असें अमंगल कृत्य आमच्या हातून स्वप्नांत सुद्धां !

**दादा०**—काय काय म्हणतोस ? जागेपणीच होईल ! दादासाहेब, खरें काहो हें ?

**दादा०**—नाहीं वरें बावा नाहीं.

**नानाः**—वापू काय करूं हो ! मला नाहीं वाटत श्रीमंत आतां शुद्धीवर येतील असें; अखेरची बडबड सुरू झाली ! जीभ अडथळूं लागली ! हातपाय थंड पडूं लागले ! आणि घसाहि वाजूं लागला ! ! वापू पहाहो, श्रीमंतांच्या डोळ्यांतून अश्रूधारा कशा चालल्या आहेत त्या; आपण तरीं पुढें व्हाना एकदां ?

**बापूः**—( पुढें होऊन ) श्रीमंतांची कोणती इच्छा आतां बाकीं राहिली आहे ? सरकारच्या नेत्रांतून अशा अश्रूधारा यावेळीं कां चालल्या आहेत ?

**माधवः**—( अर्धवट शुद्धीवर येऊन ) राज्य सौख्य, संसार सौख्य आणि गृह सौख्य ह्या पैकीं एकाचाहि शांतपणें उपभोग न घेतां अशा तरुण वयांतच मी या जगाला कायमचा अंतरणार म्हणून ! माझ्या मागें तिचें कसें होईल म्हणून ! माझ्या नारायणाचें आणि आपल्या साम्राज्याचें कसें होईल म्हणून ! माझ्या मागें—

**बापूः**—पण सरकार, ह्या वेळीं हे विचार—

**माधवः**—( श्रमिष्ट होत ) वरें तर चुकलों ! मला माफी करा: माफी केली असें म्हणा. म्हणतां कीं नाहीं ? नाहीं म्हणत; नाहीं म्हणत; नका म्हणूं; बोला, बोला. नाहीं बोलत, नका बोलूं. काय, नाना रडतां, रडा ? काय ! दादासाहेब तुम्हीं हंसतां ? हसण्याची का.ही वेळ आहे ? तरीहि हसताच; कशाचा हो इतका आनंद झाला आहे आपणाला दादासाहेब ? तरीहि हसताच. हसा, हसा, पण तुमचें तुम्हीं पाहून घ्या बुवा ! निदान शेवटीं तरी तुम्हाला रडावें लागेल वरें का ? वापू असे कांहो तुम्ही डोळ्यांतून पाणी काढता ? नाहीं ऐकत माझें ? नका ऐकू. नारा—

**बापूः**—सरकार, सरकार !

**माधवः**—नारायणा, असें काय वरें करावे ? पूस डोळे पूस बघूं आधीं. काय ? तूंहि माझें ऐकत नाहींस ? जा नको ऐकूं! जा बस रडत हवा तितका वेळ ! कोण ? तूं–तूं–का ?

**दादा०**—माधवा, बाळा माधवा !

**माधवः**—तूं–तूं–ही माझें ऐकत नाहींस? काय, काय करूं ! तूं ही येथें रहात नाहींस ? माझ्या बरोबर—

**नाराः**—दादा ! दादा !

**माधवः**—( कावरा बावरा होऊन ) आला हो आला पुन्हां आला ! अरे पुन्हां कां आलास बाबा ? कोण, कोण आहेस तूं ? बोल; तूं आहेस तरी कोण हेंच मला आधीं स्पष्ट सांग पाहूं ? काय म्हणतोस ? नाहीं सांगत; कां नाहीं सांगत ? बोलतोस कीं नाही ! कां नाहीं बोलत ? तूं कोण आहेस हें सांगितल्या-शिवाय मी ही नाहीं ऐकत तुझें सांगणें; जाव, निकलो; काय ? सांगतोस; सांग; कोण ? सैतान; काय ? काय ? काय म्हटलेंस पुन्हां सांग पाहूं ? काय, काय, भाऊबंदकीचें भूत; बरें मग ? कशाला आलास तूं येथें ? काय, काय करणार आहेस तूं ? काय, काय म्हणतोस ? मला मारणार, अरे जारे माकडा, तूं काय मला मारतोस ? आणि तुसें काय तोंड लागलें आहे मला मारण्याचें ! अरे मी होऊन माझें आयुष्य संपल्यानें मरत आहें; तुझ्या–तुझ्या सैतानीं जादू-टोण्यानें अथवा मूठ–मंत्रानें मरत नाहीं आहे, समजलास ? अरे, दांत काय काढीत उभा राहिला आहेस येथें ? तुला गम्मतच वाटतें आहे काय ही सगळी ! जाव, जाव; निकलो, जा येथून जा; माझ्या डोळ्या समोरून जा; नीघ येथून; नाना, नाना !

**नानाः**—सरकार, सरकार !

**माधवः**—( बरळतो ) नाहीं जात ? कां नाहीं जात ? कां म्हणून नाहीं जात ? बापू, तुम्ही तरी घालवा हो ह्या सैतानाला माझ्या दृष्टीसमोरून ?

**बापू**—सरकार, सरकार.

**माधवः**—( बरळतो ) नाहींच जात तूं ? बरें तर नको जाऊंस; मग तुझी इच्छा तरी काय आहे ? काय म्हणतोस ? ऐकलेंच पाहिजे तुझें म्हणणें ? बरें रे बरें; ऐकतों बाबा; काय, काय ? पुन्हां सांग; अरे बापरे ! पुन्हां सांग–पुन्हां सांग–काय, काय, मी मरणार आणि मग तूं नारायणाचा खून करणार ? ( घाबरून ओरडतो. ) अहो आई ! अहो नाना ! धांवा हो धांवा !

**नानाः**—सरकार, सरकार !

**बापूः**—श्रीमंत, श्रीमंत !

**दादा०**—माधवा, अरे माधवा !

**नारा:**—दादा, अहो दादा !

**माधव:**—( अर्धवट शुद्धींत ) मी चाललों ! दादासाहेब, नारायणाचा प्रतिपाळ करा ! कितीहि रंगांत असलांत तरी माझ्या विनंतीची व आपल्या वचनाची आठवण ठेवा ! नारायणा, तिला अंतर देऊं नकोस; मनुष्याचें कल्याण करणाऱ्या सर्व देवता आणि विभूति तुझें माझ्या मागें संरक्षण करोत ! आमच्या वाडवडिलांचें पुण्य तुझ्यावरील भावी आपत्ति टाळोत ! तुम्ही सर्व आनंदांत रहा ! नारायणाला अंतर देऊं नका ! नारायणा, तिला अंतर देऊं नकोस ! पार्वती काकीस सांभाळा ! माझी आई—माझ्या सरदारमंडळास दुखवूं नका; माझ्या प्रजेस नेहमीं सुखी ठेवा ! आणि—आणि कशीहि आपत्ती आली तरी वेहेत्तर पण "मराठा—मंडळ" जिवंत राहून त्याचा जयजयकार होत जाईल—आणि हिंदुस्थानच्या राजकीय क्षितिजावर "**मराठा साम्राज्य**" रूपी तारा, शांतता, सत्ता आणि सुवत्ता, यांनीं विभूषित होऊन नेहमीं प्रमुखत्वानेंच चमकत राहील——अशा विषयीं अविश्रांत परिश्रम, आणि आटोकाट प्रयत्न करण्यास केव्हांहि यत्किंचित सुद्धां हयगय करूं नका, एवढेंच माझें अखेरचें तुम्हा सर्वांजवळ पदर पसरून मागणें आहे ! ये......तों......व......रें......मी......आ......तां.....................रा............म............रा............( देहावसान होते. )

( एकदम स्त्रियांचा व पुरुषांचा रुदनस्वर सुरू होतो; श्री० नारायणराव श्रीमंताचे सन्निध जाऊन "दादा, दादा, मला अभाग्याला टाकून कसे गेलांत हो ?" असें म्हणून रडूं लागतात, इतक्यांत दुःखानें करपलेल्या, अस्ताव्यस्त पोषाखांत श्रीमंत रमाबाईसाहेब प्रवेश करितात. )

**रमा०**—अग आई ! फुटलेंग बाई माझें कपाळ ! तुटलेंग बाई माझें मंगळसूत्र अखेरीस !! आलेंच—आलेंच बरें का मी बरोबर ! धांव देवा धांव ! आणि दे थारा या अभागिणीला तुझ्या पोटांत !!! ( श्रीमंतांचे अंगावर पडतात; व बेशुद्ध होतात; पडदा पडतो. )

**समाप्त.**

विक्रीस तयार !

# हिंदुस्थानांतील ब्रिटिश-साम्राज्य.

(सर आलफ्रेड लायल यांच्या 'ब्रिटिश डोमीनियन इन इंडिया'
या पुस्तकाचें भाषान्तर, चार रंगीत नकाशांसह)

लेखकः—दत्तात्रय बाळकृष्ण करकरे.

सदरहू पुस्तकास "सह-विचारिणी सभा" वडोदें "व मराठी ग्रंथोत्तेजक कमेटी" इंदूर यांनीं बक्षीस दिलें असून तें मुंबई इलाखा व वऱ्हाड आणि मध्यप्रांताच्या शाळाधिकाऱ्यांनीं स्कूल लायब्ररी आणि बक्षिसाकरितां मंजूर केलें आहे. सदरहू पुस्तक अनेक विद्वान् मंडळीच्या मदतीनें तयार केलेलें असून त्यांस **सर भालचंद्र** यांनीं प्रस्तावना लिहिलेली आहे. शिवाय स्वतः ग्रंथकर्त्यानें विस्तृत विषयोपन्यास जोडिलेला आहे. **केसरी** व **ज्ञानप्रकाशाचा** उत्तम अभिप्राय असून बांधणी, कापडी, मजबूत व सोनेरी अक्षराची आहे. पृष्ठ संख्या ६४०; आकार डेमीं अष्ट पर्जी किंमत रुपये तीन. (टपाल हंशील शिवाय.) पुस्तकें ग्रंथकर्त्याकडे **जळगांव, ईस्ट खानदेश** येथें, अथवा **हिंद एजन्सी, माधवबाग मुंबई** यांच्याकडे विकत मिळतील.

---

## पुस्तकावर अभिप्राय;

**केसरी,** मंगळवार, तारीख २६ माहे सप्टेंबर सन १९१६ इसवी.

................भाषांतरापुरते पाहतां रा. **करकरे** यांनीं आपलें काम अत्यंत परिश्रमपूर्वक केलेलें आहे, असें म्हणावें लागतें...................मूळ **लायलसाहेबाचा** ग्रंथ वाचनीय असूनहि निवळ मराठी वाचक त्याच्या स्वारस्यास मुकत होता; म्हणून तो मराठींत भाषांतररूपानें उपलब्ध करून दिल्याबद्दल ते रा. **करकरे** यांचे ऋणीच होतील.

लोकमान्य नाटक मंडळी करीत असलेलें

सचित्र नाटक

# मराठ्यांचा आत्मयज्ञ

प्रसिद्ध कादंबरीकार श्री. **नाथमाधव** कृत.

सुंदर दहा फोटोसह.

किं. १४ आणे.

क्रु. ह. दिक्षीत कृत.

संगीत

## सुदर्शन नाटक.

सुंदर फोटोसह–**किंमत** १२ आणे.

---

**प्रसिद्ध शाहुनगरवासी नाटक मंडळीनें स्टेजवर आणिलेलें**

प्रसिद्ध कादंबरीकार **श्रीयुत नाथमाधवकृत.**

सचित्र नाटक

# जातिवंत मराठा वीर

प्रस्तुत नाटकांत प्रसिद्ध नट श्री. **गणपतराव जोशी** यांचा फुलसाईजचा फोटो दिला असून इतर सुंदर **सहा फोटो** दिले आहेत. नाटक हास्य व वीर रसयुक्त सुंदर लिहिलेलें आहे. **किंमत १२ आणे.** पो. व व्ही. पी. खर्च निराळा.

ह्याशिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें आमच्याकडे विकत मिळतात.

**हिंद एजन्सी** माधवबाग, मुंबई.

## श्रीयुत नाथमाधव

यांचें

कोणतेंही कथानक वाचित असतां पुस्तक वाचून झाल्याशिवाय खालीं ठेववत नाहीं असा **हिंदएजन्सीच्या** ६०० आश्रयदात्यांस व **विविध-विषय ग्रंथमालेच्या** ८०० आश्रयदात्यांस पूर्ण अनुभव आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ श्रीशिवाजी महाराजांचें आरमार | १। | ९ दोन भावंडें | ०।। |
| २ बंगाल्यांतील पहिलें गुप्तमंडळ | ०।।।० | १० सुहासिनी सचित्र | १ |
| ३ तरुण रजपुत सरदार सचित्र | ०।।।० | ११ प्रेमसूड | ८=।। |
| [illegible]द्रसिंग नाटक सचित्र | ०।।० | १२ वीरधवल | २।। |
| ५ रायक्लब अथवा सोनेरी टोळी | १।। | १३ विमलेची ग्रहदशा | १। |
| ६ परवांची गोष्ट अथवा जग हें असेंच | ०।।।० | १४ रात्रीची मौज | ८- |
| ७ देशमुखवाडी | १। | १५ दैवाचे खेळ | ०।।।० |
| ८ ग्रहदशेचा फेरा | ०।।।० | १६ विहंगवृंद सचित्र | ६ |

याच प्रसिद्ध कादंबरीकाराच्या लेखणींतून लवकरच बाहेर येणारें

### नवीन सचित्र नाटक

# श्री शिवाजीमहाराजांचा

# लोकसंग्रह

२५७

म्यानेजर—हिंद एजन्सी माधवबाग, मुंबई.